१०३ शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• पुणे, बुधवार १० डिसेंबर, २०२५ • वर्ष-५, अंक-८२, पाने-८, किंमत : ₹ ६
• R.N.I.No-MAHMAR/2021/81075 • Vol.- 5, Issue - 82, Marathi - Daily - Pune, 10 December, 2025 Page- 8 Price- Rs. 6/-
24x7 : www.navakal.in • संपादक- रोहित रमाकांत पांडे Email- contact@navakal.in

नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!
'SHARE MARKET GURU' चा कोट्यवधींचा घोटाळा!
navakal.in
@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews

# महाराष्ट्रातील भ्रष्टाचार उघड! व्हिडिओ, फोटो व्हायरल
# महेंद्र दळवी आणि नोटा! काम न करता मोबदला

**नागपूर - महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवणारे दोन व्हिडिओ आज प्रसिद्ध झाले. त्याचबरोबर एक धक्कादायक फोटोही व्हायरल झाला. उबाठाचे नेते अंबादास दानवे यांनी शिंदे यांच्या शिवसेनेचे अलिबागचे आमदार महेंद्र दळवी यांचा नोटांच्या बंडलांसह असलेला व्हिडिओ सार्वजनिक केला. तर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी लाचखोरीचे पैसे घेऊन कार्यालयाच्या ड्रॉवरमध्ये ती पैशाची पुडकी ठेवतानाचा व्हिडिओ जारी केला. या दोन्ही व्हिडिओंमुळे सरकारचा भ्रष्ट कारभार पुन्हा एकदा पुराव्यासहित उघडकीस आला असल्याचा दावा दानवे आणि देशपांडे यांनी केला. त्याचवेळी सरकारमध्ये भ्रष्टाचार सुरू आहे हे जणू अधोरेखित करीत मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नागपूर शहरात विभागीय आयुक्त कार्यालयात महसूल अप्पर आयुक्त राजेश खवले यांनी त्यांच्या टेबलवर 'मी माझ्या पगारात समाधानी आहे' अशी पाटी ठेवल्याचा बोर्ड लावल्याचा फोटो व्हायरल झाला. आज एवढे आरोप होऊनही जणू काही झालेच नाही, अशा रीतीने विधिमंडळ अधिवेशनाचे कामकाज चालू राहिले. सरकारी नोकरांपासून नेत्यांपर्यंत सगळ्यांकडून भ्रष्टाचाराच्या खोक्यांचे हे उघड आणि निर्लज्ज प्रदर्शन धक्कादायक आहे. पण त्यानंतरही सरकार काही उत्तर देत नाही आणि विरोधक तो विषय रेटत नाहीत हे चित्र आणखी भयानक होते.**


## १० कंत्राटदारांवर फुकट खैरात
## बांधकाम खात्यावर संदीप देशपांडेंचा आरोप

**मनसे** नेते संदीप देशपांडेंनी आज पत्रकार परिषद घेऊन सार्वजनिक बांधकाम खात्याच्या हाफकिन शाखेतील (पीडब्ल्यूडी) भ्रष्टाचाराची पोलखोल केली. त्याचा व्हिडिओ पोस्ट करून खळबळ माजवली. या व्हिडिओत या खात्याचा एक अभियंता पीडब्ल्यूडीच्या कार्यालयातच उघडपणे कंत्राटदाराकडून पैसे घेताना दिसत आहे. पैसे घेऊन ते तिथेच ड्रॉवरमध्ये त्याने ठेवले. याच व्हिडिओत देशपांडे यांनी पीडब्ल्यूडीने १० कंत्राटदारांना काम न करता पैसे दिल्याचा आरोपही केला आहे. हा या प्रकरणाचा पहिला व्हिडिओ असून, उद्या दुसरा आणि परवा तिसरा व्हिडिओ दाखवणार असल्याचे देशपांडे यांनी सांगितले.

संदीप देशपांडे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन हा धक्कादायक खुलासा केला. ते म्हणाले की, सार्वजनिक बांधकाम खात्यातील अभियंता लेटर ऑफ क्रेडिटच्या नावाखाली पैसे घेत असतानाचा हा व्हिडिओ आहे. या खात्यासाठी शासनाकडून येणाऱ्या निधीची टक्केवारी आधीच कंत्राटदारांकडून गोळा केली जाते. एलोसीच्या टक्केवारीतील २ लाख ८० हजाराची » पान ७ वर

### मी पगारावर समाधानी

सरकार भ्रष्ट आहे यावर आज आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यानेच शिक्कामोर्तब केले. नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयात महसूल अप्पर आयुक्त राजेश खवले यांनी त्यांच्या टेबलवर बोर्ड लावला आहे. त्यावर लिहिले आहे 'मी माझ्या पगारावर समाधानी आहे'. खवले यांची ही भूमिका आणि त्यांनी लिहिलेला बोर्ड याचे कौतुक होत आहे. मात्र त्यांच्या या बोर्डचा अर्थ सरकारमध्ये भ्रष्टाचार सुरू आहे आणि त्यांना त्यात सहभागी व्हायचे नाही असा होतो. यामुळे त्यांनी असा बोर्ड लिहून सरकारची इज्जत वेशीवर टांगली आहे. याबाबत त्यांच्यावर कारवाई होणार का हा प्रश्न आहे.




## आमदार महेंद्र दळवींकडे नोटांची बंडले
## अंबादास दानवेंनी व्हिडिओ पोस्ट केला

**उबाठा** नेते अंबादास दानवे यांनी आज मोठा कॅश बॉम्बच टाकला. शिवसेना शिंदे गटाचे अलिबागचे आमदार महेंद्र दळवी हे नोटांच्या बंडलासह दिसत असतानाचा व्हिडिओ एक्सवर पोस्ट केला. हे आमदार कोण आहेत आणि पैशांच्या गड्ड्यांसह काय करत आहेत? असा सवाल त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना केला. दानवेंनी आमदाराचे नाव सुरुवातीला घेतले नाही. मात्र नंतर ते दळवी आहेत असे सांगितले. त्यामुळे नागपुरात हिवाळी अधिवेशन सुरू असताना राज्यात राजकारण तापले. पण या व्हिडिओचीही अधिवेशनात चर्चा झाली नाही.



विरोधकांनी हा व्हिडिओ सत्ताधाऱ्यांच्या भ्रष्टाचाराचे उदाहरण असल्याचा आरोप केला, तर शिंदे गट आणि भाजपा नेत्यांनी यावर प्रतिक्रिया देताना तो एआयच्या मदतीने बनवल्याचे म्हणत दानवे यांच्यावरच पलटवार केला आहे.

उबाठा नेते अंबादास दानवे यांनी आज पत्रकार परिषद घेऊन गौप्यस्फोट केला की, नोटांच्या बॅगा भरलेला व्हिडिओ घरातलाच आहे. कदाचित त्यांना नोटा नंतर द्यायच्या असतील म्हणून दाखवल्या जात आहेत. सध्या सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी कशा पद्धतीने सत्ता आणि संपत्तीचा हैदोस घातला आहे, हे जनतेसमोर आणण्यासाठी मी हा व्हिडिओ पोस्ट केला. दळवी यांना यावर आक्षेप असेल, तो व्हिडिओ मॉर्फ असेल तर त्यांनी पोलीस तक्रार करावी. पोलिसांनी माझी चौकशी केली तर मी त्यांना सविस्तर माहिती देईन. कोणीही आमदारकीचा राजीनामा द्यावा, यासाठी » पान ७ वर

### ती लाल टीशर्ट घातलेली व्यक्ती कोण?

दानवे यांनी सांगितले की, महेंद्र दळवी यांच्यासमोर लाल टीशर्ट घातलेली व्यक्ती दिसत आहे. ही व्यक्ती नोटा देत आहे. ती कोण हे शोधणे महत्त्वाचे आहे. एवढ्या नोटा असणारा माणूस दळवीपेक्षा मोठाच असेल. मी त्याला ओळखतो, पण त्याचा चेहरा व्हिडिओत दिसत नसल्याने मी त्याचे नाव घेणार नाही. तो कोण आहे ते पोलिसांनी शोधावे.



## नागरिक होण्यापूर्वी मतदारयादीत नाव
## सोनिया गांधी यांना कोर्टाची नोटीस

■ नवी दिल्ली

**नवी दिल्ली** मतदारसंघाच्या मतदार यादीत काँग्रेस नेत्या सोनिया गांधींचे नाव समाविष्ट १९८० मध्ये करण्यात आले. मात्र त्यावेळी त्या भारताच्या नागरिक नव्हत्या. त्या एप्रिल १९८३ मध्येच भारताच्या नागरिक झाल्या. यामध्ये काही गैरप्रकार झाला असल्याचा आरोप करणारी पुनर्विचार याचिका दिल्ली न्यायालयात दाखल झाली आहे. त्यावर सुनावणी करताना न्यायालयाने सोनिया गांधी आणि दिल्ली पोलिसांना नोटीस बजावण्याचे निर्देश दिले.



भारतीय नागरिक होण्याच्या तीन वर्षांपूर्वी मतदार यादीत नाव समाविष्ट केल्याच्या आरोपाखाली सोनिया गांधी यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदवण्याचे आदेश देण्यास अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी वैभव चौरसिया यांनी ११ सप्टेंबरला नकार दिला होता. या आदेशाला फौजदारी पुनर्विचार याचिका विकास त्रिपाठी यांनी दाखल केली आहे. या याचिकेवर दिल्ली न्यायालयासमोर आज सुनावणी झाली. या प्रकरणाची » पान ७ वर

## तुकाराम मुंढेंचा मुद्दा सभागृहात गाजला

■ नागपूर

**विधानसभेत** आज ज्येष्ठ आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांचा मुद्दा प्रचंड गाजला. महाविकास आघाडी सरकारच्या काळात त्यांनी गैरव्यवहार केल्याचा आरोप करत भाजपा आमदारांनी त्यांच्या निलंबनाची मागणी केली. या मुद्यावरून सभागृहात मोठा गोंधळ झाला.

भाजपा आमदार कृष्ण खोपडे आणि प्रवीण दटके यांनी आरोप केला की, नागपूर मनपा आयुक्त असतानाच मुंढे » पान ७ वर

## सोनम वांगचुक यांच्या मागणीला केंद्र सरकारचा न्यायालयात विरोध

■ नवी दिल्ली

**राष्ट्रीय** सुरक्षा कायद्यांतर्गत अटकेत असलेले सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी जोधपूर तुरुंगातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजर राहण्याच्या मागणीला केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात विरोध केला आहे.

वांगचुक यांची अटक बेकायदेशीर आणि त्यांच्या मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करणारी मनमानी कारवाई असल्याचा आरोप करणाऱ्या त्यांची पत्नी गीतांजली जे. अंगमो यांच्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. अंगमो यांच्या वतीने उपस्थित असलेले वरिष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी न्या. अरविंद कुमार आणि एन.व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाला सांगितले की, कार्यकर्ते तुरुंगातून व्हिडिओद्वारे उपस्थित राहू इच्छितात. यासाठी त्यांना खंडपीठाकडून परवानगी हवी आहे. मात्र, केंद्र सरकारच्या वतीने उपस्थित असलेले सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी या विनंतीला विरोध केला.

## रोहित आर्या दहशतवादी नसताना त्याचे एन्काऊंटर का केले?

■ नागपूर

**पवई** इथे रोहित आर्या या व्यक्तीने काही मुलांना ओलीस ठेवून सरकारकडे थकीत असलेले त्याचे कामाचे पैसे मागितले. मग रोहित आर्या याचा खून का करण्यात आला? असा सवाल काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी विचारला.

विधानसभेत आज लक्षवेधीवेळी रोहित आर्या प्रकरणाबाबत काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी प्रश्न मांडले. आर्याने महायुतीचे सरकार असताना स्वच्छता मॉनिटर आणि मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या प्रकल्पावर काम केले होते. त्याचे पैसे सरकारने थकवले होते. त्याने व्हिडिओ करून सांगितले की माझे पैसे द्यावे, मी दहशतवादी नाही. असे असताना रोहित आर्याचे एन्काऊंटर का करण्यात आले? पायावर » पान ७ वर

## ६.१५ लाख कोटींचे सरकारी बँकांचे कर्ज बुडीत खाती

**सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या साडेपाच वर्षांत ६.१५ लाख कोटींचे कर्ज बुडीत खाती नोंदवले आहे, अशी माहिती अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी यांनी लोकसभेत लेखी उत्तरात दिली.**

■ नवी दिल्ली

**ते म्हणाले** की, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या आकडेवारीनुसार, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी गेल्या पाच आर्थिक वर्षांत आणि चालू आर्थिक वर्षात ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत एकूण ६,१५,६४७ कोटी रुपयांचे कर्ज निर्लेखित केले आहे. रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार आणि बँकांच्या मंडळाने मंजूर केलेल्या धोरणानुसार, चार वर्षे पूर्ण झाल्यानंतर बँका एनपीए बुडीत खाती टाकतात. मात्र, कर्जदारांच्या परतफेडीच्या देणी माफ केल्या जात नाहीत.




निर्लेखित कर्जांची वसुली ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे आणि बँका विविध कायद्यांतर्गत कर्जदारांविरुद्ध सुरू केलेल्या » पान ७ वर

## अधिवेशन सोडून अजित पवार दिल्लीत

■ मुंबई

**महाराष्ट्र** विधानसभेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार अचानक अधिवेशन सोडून दिल्लीला रवाना झाले आहेत. काल अजित पवार यांनी आ. धनंजय मुंडे यांच्यासह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यानंतर पवार उद्या होणाऱ्या एका खासगी कार्यक्रमासाठी दिल्लीला रवाना झाले. सायंकाळी दिल्लीला पोहोचून कार्यक्रम पूर्ण करून रात्री उशिरा ते पुन्हा नागपूरला परतणार असल्याची माहिती आहे.



# छोट्या जाहिराती

**संपर्क करा**
**८४२२८१७४४५/८१०८११६४२३**

## पाहिजेत

मुंबईमध्ये पेशंटकेअरसाठी मुले, मुली, पुरुष, बायका पाहिजेत. पगार (24,000-75,000) **9820628009/ 9833470199** {NC253224}

मुंबईत घरकाम, कूक, मुलांची काळजी, रुग्णसेवा, यासाठी मुली/महिला पाहिजे. मोफत राहणे-खाणेची व्यवस्था, पूर्णवेळ/अर्धवेळ, चांगला पगार. **9819339480** {NC253233}

मोठ्या प्रमाणात हाऊसकीपिंग सिक्युरिटी गार्ड ऑफीसबॉय पाहिजे वसईफाटा, बोरिवली, कांदिवली, पालघर, जोगेश्वरी, वडाळा.- **8097507698** {NC253237}

डायरेक्ट भरती NGO मध्ये सर्वे साठी १०० मुले मुली पाहिजे दहावी ते पदवी ट्रेनिंग मध्ये २५०००/- नंतर ५०,०००/-राहणे प्रवास फ्री नो सेल. पनवेल **8291717196** {NC253319}

PLANTS WORLD नर्सरीसाठी माळी पाहिजेत चर्नीरोड **9920297466/ 9022094909** {NC253255}

घरकामासाठी महिला / मुली / मुले (भरपूर पगार) राहण्याची - खाण्याची सोय) **9820234040** (ठाणे) {NC253328}

नेरुळ जिमसाठी जवळपासचे Staff receiptionist पाहिजे. **9594503777** {NC253329}

दादर, माहिम, माटुंगा परिसरात सिक्युरिटीगार्डस् पाहिजेत. (८ तास) वेळेवर पगार. **8169960711/ 9930616001.** {NC253327}

## पाहिजेत

डोंबिवली (पूर्व) MIDC मध्ये रेडीमेंट गारमेंन्ट्स फॅक्टरीमध्ये फॉर्मल/पार्टीवेअर शर्ट बनविण्यासाठी कारागीर व हेल्पर आणि गारमेंन्ट्स शर्टचे बॉक्स बनविण्यासाठी महिला/पुरुष पाहिजे संपर्क- **9819830444 / 8369298344** {NC253278}

**हेल्पर्स पाहिजेत**
CST/ चर्चगेट येथील प्रिंटिंग प्रेससाठी.
**द ग्रेट आर्ट प्रिंटर्स**
२५, ऐस. ऐ. ब्रेवली रोड, युनिक हाऊस, हॉर्निमन गार्डन जवळ.
भेटा: (१० ते ५)
**M: 9869012778**

प्रिंटिंग प्रेससाठी आवश्यक आहे (कल्याण, वेस्ट)- सेंट्रल लाईनला राहाणारे- १) हेडलबर्ग SM ऑफसेट प्रिंटर आणि बॉयलर २) लॅमिनेशन मशीन ऑपरेटर ३) पंचिंग मशीन ऑपरेटर ४) पॅकिंग (लेडीज वय २६ ते ४५ पर्यंत) ५) हेल्पर. फोकस, गाला नंबर सी-१, रवारिया इंडस्ट्रियल इस्टेट, भिवंडी कोण रोड, कल्याण वेस्ट **संपर्क- 7045333202 / 9821434502** {NC253281}

सोसायट्यांच्या ऑफीसमध्ये आमच्या सर्व्हीसेसची मार्केटींगसाठी स्टाफ पाहिजे. चांगला पगार. **9082555428** {NC253254}

हेडलबर्ग SM-74 फोरकलर ऑटोप्लेट ऑफसेट मशीनसाठी बॉयलर आणि फिडरमन पाहिजेत. अंधेरी (पूर्व), साकीनाका **9820136761** {NC253267}

## पाहिजेत

दादर (प.) रीटेल स्टोरला जवळपास राहणारे वय २०-३० सेल्सगर्ल पाहिजे. ड्युटी ११-८.३०. फोन **9324305421.** {NC253261}

पाहिजेत दुकानामध्ये (माहिम-पश्चिम) पॅकींग/ क्लिनिंगसाठी महिला/मुलगी **9920086498/ 8291192348** {NC253316}

भांडुपयेथे प्रिंटिंग प्रेससाठी पुरुष हेल्पर्स पाहिजेत. वय३५ च्यावरील. **9137590722.** {NC253265}

मालाडमधील प्रिन्टींग प्रेससाठी अनुभवी डीटीपी ऑपरेटर गुजराती, मराठी, हिंदी टाईपिंग व डिझाईनिंगचे अनुभव पाहिजे व हेल्पर कम डिलीव्हरी बॉईज पाहिजे. **9892106609** {NC253294}

कांदिवली (वेस्ट) नामांकित सुई धागा कंपनीमध्ये पीस काऊंटिंग तसेच किरकोळ कामासाठी हुशार मुली पाहिजेत. (वय 20-30). संपर्कः **8976542593/ 9930737445** {NC253299}

फॅब्रिकेशन मध्ये दरवाजे, शटर, गेट, ग्रील, रूप, बनवणारे. कॉन्ट्रॅक्टर. कारागीर, हेल्पर पाहिजेत. **8652471232** {NC253314}

**घर कामा साठी बाई पाहिजे**
वांद्रे, पाली हिल येथे धूळ काढणे, मशीनमध्ये कपडे धुणे, झाडणे, बाथरूम साफ करणे आणि घासणे यासाठी बाई पाहिजे, त्यांनी पूर्वी वांद्रे येथे काम केलेले असावे.
वेळ: सकाळी 8.30 ते 11.30
वय: 30 ते 40 वर्षे, पगार दरमहा 8000 रुपये + प्रवास खर्च.
मराठी / Christian यांना प्राधान्य दिले जाईल.
संपर्क : एन.डी एस इंफोसर्व्ह, ३०१, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट , न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई : 400053
022 - 40156805 / 40237035

मरोळ, अंधेरी येथे डिलिव्हरी आणि ऑफिस कामासाठी कामगार पाहिजेत. संपर्कः **9892934566** {NC253256}

बँकेच्या रिकव्हरीसाठी मुले (Field Executives) त्वरीत पाहीजेत. संपर्क : विजय - **9930443090.** {NC253320}

२ वर्षाच्या बाळाला घरी सांभाळण्यासाठी मुलगी/बाई पाहिजे ग्रँटरोड **9867755709** {NC253312}

इमिटेशन ज्वेलरीला डायमंड/ खडे लावण्याच्या लेबर जॉब करणाऱ्यांनी संपर्क साधावा. कांदिवली पश्चिम **8369505921** {NC253207}

टु-कलर CPC. हेडलबर्ग मशीनसाठीः फिडरमेन, बोईलर, प्रिन्टर, हेल्पर पाहिजेत, ''सागर ऑफसेट'', B4G, मालाड इन्डस्ट्रीयल इस्टेट, काचपाडा, मालाड (वेस्ट)- **66998838, 9820062271** {NC253229}

स्क्रिनप्रिंटर आणि स्टॉपरमॅन पाहिजेत. जय गणेश मेटलप्रिंट गाळा नंबर : 6, बबन मिश्रा कंपाऊंड, सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव (पूर्व) - **9820382105 / 8879772701** {NC253215}

## पाहिजेत

पॉवरप्रेस ऑपरेटर आणि पॅकिंगसाठी मुले व मुली पाहिजेत. जय गणेश मेटलप्रिंट गाळा नंबर : 6, बबन मिश्रा कंपाऊंड सोनावाला क्रॉस रोड नंबर 2, गोरेगांव (पूर्व) - **9820382105 / 8879772701** {NC253216}

**पाहिजे**
**कोकिल जी**
कांदिवली (पश्चिम) मध्ये
**DTP ऑपरेटर**
किमान 5 वर्ष अनुभव आवश्यक
Coreldraw & Photoshop
**संपर्क : 9819228844**

अंधेरी पूर्व येथील एका नामांकित हॉस्पिटलकरिता अनुभवी आयाबाई व वॉर्डबॉय पाहिजेत. 8 तास ड्युटी पगार 15000 व 12 तास ड्युटी पगार 20000 संपर्क **9321278125** आणि **8369185580** कुठल्याही प्रकारची फी नाही. {NC253259}

दुकानात काम करण्यासाठी माणूस पाहिजे पत्ता: राजुभाई हरगोविंदास, शॉप नं. 8, रूबी अपार्टमेंट, एम. व्ही. रोड, विशाल हॉलजवळ अंधेरी पूर्व, मुंबई 400069 {NC253257}

अंधेरी मरोळ येथील एका नामांकित शाळेकरिता साफसफाईसाठी महिला पाहिजेत. पगार १३०००+ चहा व जेवण ८ तास ड्युटी. संपर्क **9619206877/ 9920530142** {NC253270}

ऑफसेट प्रिंटींग मशीन फीडरमॅन आणि पंचिंग मशीन ऑपरेटर पाहिजे. पत्ता- डी-१०५/१०६, घाटकोपर इंडस्ट्रियल आर. सिटी मॉलच्या मागे, घाटकोपर (पश्चिम), मुंबई- ८६. फोन- **022 49645056** {NC253288}

कॉटनग्रीनमध्ये प्रिंटिंग प्रेसकरिता 4 कलर मशीन सुपरवाईजर, पंचिंग ऑपरेटर, लॅमिनेशन ऑपरेटर आणि हेल्पर पाहिजेत. (राहण्याची सोय). संपर्कः **7977798755** {NC253301}

भायंदर (ईस्ट) कोरुगेटेड मशीनसाठी मशीन ऑपरेटर, पेस्टींग मशीन आणि पिनींग मशीन ऑपरेटर पाहिजेत. **9619573873.** {NC253302}

दहिसर ईस्ट इमिटेशन कामासाठी मुली पगार 350-450. **9920062894/ 9833006198** {NC253297}

**पाहिजेत**
ऑफसेट प्रिंटींग प्रेससाठी
हेल्पर/डिलिव्हरी बॉईज
२ व्हीलर चालवणाऱ्यास प्राधान्य
सर्व सवलती देण्यात येतील.
बायोडेटा व फोटोसहीत भेटा
**ऑनलुकर प्रेस**
ए-२, भायखळा सर्विस इंडस्ट्रीज, डी. के. रोड, भायखळा (पू), मुंबई-२७.

'ROHIT ALUMINIUM' कॉम्प्युटर ऑपरेटर व इंटेरिअर डिझायनर पाहिजेत. **9820365507 / 9820360842** {NC253343}

## पाहिजेत

प्रिंटिंग प्रेसमध्ये ४ कलर कोमोरी (28x40) आणि २ कलर हेडलवर्क मशीनवर प्रिंटर, बॉयलर, सुपरवाइजर आणि फिडरमॅन पाहिजेत. अनुभव-३ वर्ष. बिग कलर्स इंड्स्ट्रिस, श्री गणेश कंपाउंड, बिल्डिंग-ए/२, गाला-८, दापोडा, भिवंडी. Mobile : **9930774748** (राहण्याची सुविधा आहे) {NC253342}

कॉम्प्युटरची माहिती असलेली महिला अ‍ॅडव्हर्टायझिंग ऑफिससाठी. बांद्रा स्टेशन समोर. **9820587770** {NC243546}

कांदिवली ईस्टमध्ये प्लास्टिक प्रिसिजन प्रोडक्ट्स पॅकिंग करण्यासाठी मुली/मुले पाहिजेत आणि प्लास्टिक इंजिनिअर/ ऑपरेटर पाहिजेत.- शिफ्ट दिवस/ रात्री, पगार+ओव्हर टाइम- **9833256660/ 9452256331/ 9833256661** {NC253338}

मालाड, गोरेगावसाठी डिलिव्हरीबॉईज (बाईकर्स/ नॉन बाईकर्स) पाहिजेत. पगार 20,000/- ते 30,000/- संपर्क- 9920907526 {NC253344}

**पाहिजेत**
**प्रिंटिंग प्रेससाठी बाईंडर, प्रिंटर, फिडरमॅन, बॉयलर आणि ग्राफिक डिझायनर त्वरित पाहिजेत.**
**मालाड (पश्चिम)**
संपर्क
**8909049090**

**अंधेरी(पूर्व) हायवेच्या बाजुला हेल्पर आणि मशीन ऑपरेटींगसाठी स्त्री अथवा पुरुष पाहिजे. (वय ३० ते ४५ चालेल) MOBILE 9820344845 फोन करायची वेळ ३ ते ६** {NC253339}

भांडुप व कोपरखैरणे येथे प्रिंटिंग प्रेसमध्ये बॉयलर, फिडरमन, हेल्पर, वेब मशीनसाठी टीम पाहिजे संपर्क **9820542141 / 9820433552** {NC253337}

कळंबोलीस्थित नामांकित ट्रान्सपोर्ट कंपनीला हवे आहेत अनुभवी, कॉम्प्युटर डेटा-एण्ट्री ऑपरेटर्स, मेकॅनिक, सुपरवायझर, हेल्पर्स आणि हेवी वाहन ड्रायव्हर्स अनुभव व योग्यतेनुसार उत्तमपगार. संपर्कः **9820098300** {NC253336}

मुंबईमध्ये पेशंट केअर ऑफिससाठी महिला टेली कॉलर पाहिजेत वय ३० ते ३५ राहण्याची जेवणाची सोय मुंबईमध्ये मो. **9324774986** {NC253335}

बिस्किट, चॉकलेट, ड्रायफ्रूट्स पॅकिंगसाठी भरती (बस सुविधा).: 19800-23400 : **6205815863** {NC253334}

पाहिजेत काळबादेवी येथे ऑफिस कामासाठी ११ वी-१२ वी पास मुलगी-पगार १० ते १२ हजार. डिलीवरी बॉय-पगार ८ ते १० हजार. संपर्कः 9322245673 {NC253331}

बाहेरच्या कामासाठी तरुण मुले/मुली पाहिजे. कांदिवली चारकोप. नवनीतभाई- **9819593695** {NC253332}

डीलीवरी बॉय पाहिजे. 'करनानी लॅबोरेटरीज लिमिटेड' काळबादेवी : **8097078315** {NC253345}

मुंबई 45 वर्षांवरीलचे लोकांसाठी खास... सरकारमान्य कंपनीसाठी काम करून उत्तम उत्पन्न कमवा. शिक्षण SSC, जास्त **7021767724 / 8779488140 / 9029991060 / 9136060019** {NC253349}

## पाहिजेत

बोरीवली (वेस्ट) 24 तासासाठी अनुभवी महिला केरटेकर पाहिजेत (पगार 15,000/-) **9833985725** {NC253350}.

इमिटेशन कंपनीमध्ये कामासाठी मुली पाहिजेत वय पस्तीसपर्यंत. सांताक्रुझ (पूर्व) स्टेशनजवळ. **9819999006** {NC253347}

सिंगल / टू कलर प्रिंटर, फिडरमन, बॉयलर पाहिजेत लोअर परेल **9833552423** {NC253348}

कांदिवली महावीर नगरसाठी सिक्युरिटी गार्ड्स आणि सुपरवायझर पाहिजेत. 12 तास ड्युटी, पगार 16000/-. संपर्कः अमर जवान सिक्युरिटी- **7028374768.** {NC253351}

कांदिवली (वेस्ट) पेस्ट कंट्रोल कामासाठी अनुभवी /बीनअनुभवी माणूस पाहिजे. **9029181030** {NC253352}

फ्रेशर्स पाहिजेत डेटा अ‍ॅनालिस्ट पदासाठी, कॉमर्स ग्रॅज्युएट घरून काम, पगार-१५०००/- (वयोमर्यादाः २१-३० वर्षे) वॉक-इन टेस्ट/इंटरव्यू- गुरुवार-११ डिसेंबर, सकाळी १०- दुपारी २ पर्यंत आमच्या कार्यालयात होईल. 'इन्फॉर्मिस्ट डेटा अँड ॲनालिटिक्स प्रायव्हेट लिमिटेड'- 701, ए विंग, रहेजा प्लाझा, एलबीएस रोड, घाटकोपर (पश्चिम)- jobs@ informistdata.com {NC253363}

ऑफिस करीता तरुण प्युनची आवश्यकता ३३, प्रॉस्पेक्ट चेंबर्स (अनेक्स) ३ रा माळा पीठा स्ट्रीट, पी.एम.रोड, फोर्ट मुंबई संपर्क वेळ-सकाळी 11 ते संध्या. 6 पर्यंत मोबाईल- **9869658771** {NC253362}

इमिटेशन ज्वेलरीच्या कामासाठी मुलगी पाहिजे. आकर्षक पगार. मालाड- **8779142513** {NC253362}

**घर कामा साठी बाई पाहिजे**
वांद्रे, पाली हिल येथे इस्त्री करणे, धुळ काढणे, चहा देणे इत्यादी सारख्या उच्च कामांसाठी बाई पाहिजे. त्यांनी पूर्वी वांद्रे येथे काम केलेले असावे.
वेळ: संध्याकाळी 5.00 ते 7.00
वय: 30 ते 40 वर्षे, पगार दरमहा 6000 रुपये + प्रवास खर्च.
मराठी / Christian यांना प्राधान्य दिले जाईल.
संपर्क : एन.डी एस इंफोसर्व्ह, ३०१, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रियल इस्टेट , न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई : 400053
022 - 40156805 / 40237035

कांदिवली येथील इंजिनियरिंग कंपनीला अनुभवी टेक्निशियन्स पाहिजे. डिप्लोमा किंवा आयटीआय तसेच या क्षेत्रातील तत्सम अनुभव असलेल्यांनी त्वरित संपर्क साधावा **8369789269 / 7304458349** इमेल unienter010@gmail.com {NC253361}

दुकानामधून (इन शॉप) फूड प्रॉडक्ट्स विक्रीकरिता महिला पाहिजे. विभाग-अंधेरी ते बोरीवली संजयसर- **9833953540** {NC253353}

मीरारोड सीए ऑफिसला कामासाठी बोरिवली- भायंदर राहणारा ऑफिस बॉय पाहिजे- संपर्क- **9773777355 / 9819097842** {NC253357}

## पाहिजेत

बोरीवली (वेस्ट) स्टेशनजवळ ऑप्टीकल कंपनीमध्ये प्युन आणि डिलिवरी कामासाठी मुलगा पाहिजेत. **7738642555** {NC253354}

दादर येथे संध्याकाळी 6 ते 8 पार्ट टाईम ड्रायव्हर ऑटोमेटीक गाडीसाठी पाहिजे. संपर्क - **9892458244 / 9967236997** {NC253355}

**पाहिजेत**
भिवंडी मध्ये मुले पाहिजेत
**मशीन ऑपरेटर (६ nos.)**
**हेल्पर (६ nos.)**
**शिक्षण १०वी ते १२वी**
**वय १८ ते ४५ वर्ष**
पगार : ₹ १६०००/- ते ₹ १८०००/- प्रति महिना.
**संपर्क :**
**ठाकोर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड**
बिल्डींग न . पी १, पी २, श्री राजलक्ष्मी हायटेक टेक्सटाईल पार्क, नासिक बाय पास रोड, सोनाळे विलेज, भिवंडी - ४२१३०२.
**मो . ९६६५५४६४६२ / ८१०४५००९४९.**

कलसी इलेक्ट्रिकला अनुभवी महिला कॉम्प्युटर ऑपरेटर पाहिजे पत्ता 8, मंगल कुंज सोसायटी, अपोझिट मॅकडोनाल्ड अंधेरी ईस्ट संपकक **9870021311/ 7900120764** Kalsi_group@ yahoo.com {NC253360}

विक्रोळी कंपनीमध्ये ऑफिस बॉय आणि ड्रायव्हर पाहिजे. **7039364173** {NC253364}

SORMZ हेडलबर्ग मशीनवर 1 बॉयलर, 1 फिडरमॅन, 1 हेल्पर पाहिजेत. बायोडेटा सहित भेटा. युनियन प्रेस, एच. सी. दीनशा बिल्डिंग, 13, होमजी स्ट्रीट, 16 हॉर्निमल सर्कल, फोर्ट, मुंबई-1, टेलिफोन **46172641 / 48019086** {NC253365}

## पाहिजेत

बँक व्हेरिफिकेशन एजन्सीला फिल्ड कामासाठी मुले पाहिजेत. पगार 12000/- ते 15000/- संपर्क - प्रिसाईस सर्विसेस - **9769108450 / 8369564939** {NC253366}

ड्रायव्हर पाहिजे. अंधेरी ईस्ट घाटकोपर वेस्ट, परेल या ठिकाणी. कंपनीच्या ऑफिससाठी वेतन 28,000. संपर्क - **8652471232** {NC253367}

हेल्पर, फॅब्रिकेटर वेल्डर, कारागीर पाहिजेत. उत्तम वेतन 20,000 ते 30,000 संपर्क - **9324804792** {NC253368}

## Situation Vacant

Req Outdoor Clerk, B.K. Mehta- Dhanur Bldg, 1st Floor, P.M. Road, Fort, Mumbai- 400001. # **9819321410.** {NC253239}

Wanted Courier Boys at Khar. Apply with biodata. Call: **9930011100** {NC253326}

Sales/Godown Manager required for Wine Shop at Wadala West, with Good with addition/ totalling. Contact: **9987285116/** WhatsApp {NC253227}

Required Outdoor Clerk, B1, Dhanur Bldg, 1st Floor, Phirosha Mehta Road, Fort/CST. **9819321410** {NC253333}

Technicians reqd for Dream Dental Lab at Vakola, Santacruz, experience in Denture, Design, Glaze, Ceramic Build-up, Scanner, Plaster & Marketing. Call: **9987015305** {NC253340}

Require Peon Office Boy, Admin, Reception, Clerk, Data Entry. **9769891697** {NC253359}

## व्यवसायविषयक

घरबसल्या द्रोण पेपरडिश बनवा. महिना 30-35 हजार कमवा दोन वर्षाचे अग्रीमेंट - **9028160157** {NC253323}

## व्यवसायविषयक

सुवर्णसंधी! स्वतःचा व्यवसाय करून दिवसा ३०००/- कमविण्याची. अनिरुद्धा ग्रुप दादर- **8652643434 / 9076403434** {NC253268}

## व्यसनमुक्ती

दारू, तंबाखू, सिगारेट सोडवा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार व्यसनमुक्ती केंद्र - (दादर) - **7738770405** {NCC250080}

## वधु-वर मेळावा

वधु-वर मेळावा सर्वजाती देशस्थ, कोकणस्थ, खान्देश कल्याण- **9869868620** {NC253325}

## वर पाहिजे

सुंदर वधु 28, 5.3, 12 वी, ब्युटिपार्लरचे क्लासेस घेते. 9000/- मुलीला आई वडिल नाहीत. काका काकुकडे राहते. निर्व्यसनी, समजुतदार मुलगा हवा. जातीची अट नाही. (त्वरित विवाह) **8446389460** {NC253346}

## शैक्षणिक

टीचर ट्रेनिंग हेल्थवर्कर, सोशल वर्कर बचतगट व्यवस्थापन ई. कोर्सेससाठी, तसेच विविध जॉबसाठी संपर्क- **9004287617** {NC25336}

## सेमिनार

मोफत शिबिर उर्जा-जागृती ध्यानयोग निरा आध्यात्मपीठ तर्फे मुंबईमध्ये आयोजित 14/12/2025 रोजी एक दिवसीय तणावमुक्ति शिबिरः- **9167528575** {NC253358}

**वाचकांना सूचना**
दैनिक 'नवाकाळ' वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातींच्या सत्यतेबाबत दैनिक 'नवाकाळ'ची कोणतीही जबाबदारी नाही. वाचकांनी स्वतः पडताळणी करून स्वतःच्या जबाबदारीने निर्णय घ्यायचा आहे, याची नोंद घ्यावी. - **मॅनेजर, 'नवाकाळ'**

# आजचे राशी भविष्य

बुधवार दि. १० डिसेंबर २०२५

ज्योतिष पंडीत अर्चना तारू

| | |
|---|---|
| मेष | मनात सकारात्मक विचार ठेवा. कामाचा ताण फार घेऊ नका. आरोग्याच्या समस्या उद्भवू शकतात. प्रवासात काळजी घ्या. |
| वृषभ | नोकरीमध्ये नवीन प्रकल्पासाठी तुमचा विचार करतील. घरासंबधीत कामांमध्ये अडचणी येऊ शकतात. जोडीदार सहकार्य करेल. |
| मिथुन | कार्यक्षेत्रात नोकरमाणसांशी पटवून घ्यावे लागेल. नोकरीमध्ये वरिष्ठांची मर्जी राखावी लागेल. जवळच्या प्रवासाचा योग येईल. |
| कर्क | आर्थिक प्राप्ती साधारण राहील. मोठी उलाढाल करण्याचे तूर्तास पुढे ढकला. घरातील ज्येष्ठांच्या आरोग्याची काळजी वाटेल. |
| सिंह | नोकरीनिमित्त प्रवास घडेल. घरासंबंधित कामे मार्गी लागतील. वडिलधाऱ्यांचा आशीर्वाद लाभेल. |
| कन्या | महत्त्वाची कामे घाईघाईने उरकू नका. सरकारी कामांमध्ये नियमांचे पालन आवश्यक. काही मनाविरुद्ध घटना घडतील. |
| तूळ | आधी केलेल्या गुंतवणुकीतून फायदा होईल. नवीन गुंतवणूक करताना खबरदारी घ्यावी. भावंडांचे सौख्य राहील. |
| वृश्चिक | व्यवसायामध्ये काही बदल होऊ शकतात. वडिलधाऱ्यांचा सल्ला उपयोगी ठरेल. नोकरीत वरचढ ठराल. |
| धनु | धार्मिक कार्याचे आयोजन कराल. दानधर्मातून समाधान लाभेल. सरकारी कामांमध्ये नियमांचे पालन करावे लागेल. |
| मकर | योजलेल्या कार्यामध्ये अडचणी येऊ शकतात. आर्थिक स्थिती साधारण राहील. वाहन चालवताना काळजी घेणे आवश्यक. |
| कुंभ | आर्थिक व्यवहार जपून करावेत. योजना सफल होतील. जोडीदाराचा सल्ला महत्त्वाचा ठरेल. सामाजिक क्षेत्रात नावलौकिक वाढेल. |
| मीन | कार्यक्षेत्रात जिद्दीने यश मिळवाल. तुम्ही केलेल्या योजना उघडपणे बोलू नका. व्यावसायिक प्रवास फायदेशीर ठरेल. |

# श्रमिकांच्या संघर्षाला दिशा देणारे प्रेरणास्थान हरपले! कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

■ नागपूर

**ज्येष्ठ** समाजसेवक, कष्टकरी चळवळीचे शिल्पकार आणि सामाजिक समतेचे अग्रणी बाबा आढाव यांच्या जाण्याने कामगार, हमाल, रिक्षाचालक, मजूर आणि असंघटित क्षेत्रातील श्रमिकांच्या संघर्षाला दिशा देणारे एक प्रेरणास्थान हरपले आहे, अशा शब्दात कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी बाबा आढाव यांना श्रद्धांजली अर्पण केली.

कामगार मंत्री फुंडकर आपल्या शोकसंदेशात म्हणतात, बाबा आढाव आपले संपूर्ण आयुष्य वंचित आणि श्रमिक घटकांना न्याय, हक्क, सामाजिक सुरक्षा आणि सन्मान मिळवून देण्यासाठी जगले. हमाल, रिक्षाचालक आणि मजुरांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. 'हमाल पंचायती'ची स्थापना हा त्यांच्या कार्याचा ऐतिहासिक टप्पा ठरला. या उपक्रमातून त्यांनी पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील हजारो हमालांना संघटित करून श्रमिक चळवळीला नवी दिशा दिली. कामगारांच्या सन्मानासाठी त्यांनी घेतलेल्या संघर्षाची परंपरा पुढील पिढ्यांना सदैव मार्गदर्शक ठरणार आहे. समाजातील जातीय विषमतेविरुद्ध लढण्यासाठी त्यांनी पुढाकाराने उभारलेली 'एक गाव, एक पाणवठा' चळवळ ही समानतेच्या लढ्यातील क्रांतिकारी पाऊल होते. सामाजिक न्याय, बंधुता आणि मानवी मूल्ये जपण्याची त्यांनी दाखवलेली जिद्द आणि कार्य समाजासाठी दीपस्तंभासारखे आहे. बाबा आढाव यांचे निधन म्हणजे श्रमिक चळवळ, सामाजिक न्याय आणि मानवी हक्कांच्या लढ्यातील एक मोठी पोकळी आहे.

# सभागृहात मंत्री अनुपस्थित! शशिकांत शिंदे-परब आक्रमक

■ नागपूर

**नागपूर** विधान परिषदेच्या हिवाळी अधिवेशनात विधानपरिषद सभागृहात आज नगरविकास मंत्री अनुपस्थित होते. त्यांच्याऐवजी उद्योगमंत्री उदय सामंत प्रश्नांना उत्तरे दिली. त्यामुळे उबाठा आ. अनिल परब आणि शरद पवार गटाचे आ. शशिकांत शिंदे आक्रमक झाले. आ. अनिल परब म्हणाले की, संबंधित खात्याचे मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नसताना प्रभारी मंत्री उत्तर देऊ शकतात. पण कायमस्वरूपी एकाच मंत्र्यांनी दुसऱ्या खात्याची उत्तरे देणे ही चुकीची प्रथा आहे. मुख्यमंत्र्यांकडे अधिवेशन चालवण्याची जबाबदारी आहे. अध्यक्षांकडे त्याबाबत अधिकार आहेत. सभागृहाचे मुख्यमंत्री, अध्यक्ष आणि विरोधी पक्ष नेते हे तीन मुख्य चेहरे आहेत. परंतु अशी इतर मंत्र्यांकडून उत्तरे ऐकायची की नाही याबाबत अध्यक्षांनी सभागृहाला मार्गदर्शन करावे.

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र गजलक्ष्मी मंगल विकली लॉटरी — सोडत संध्या. 4:45 वाजता

सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 20/- • सोडत दिनांक 09/12/2025

पहिले बक्षिस रु. 10,000/- : **GL-03 : 7438**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 5000/- | 0136 | 0344 | 2366 | 2944 | 5220 महाराजा असोसिएट्स, इचलकरंजी | 5753 बालाजी मार्केटिंग, नागपूर | 7413 | 9267 | 9711 | 9983 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0117 | 1240 | 1548 | 1781 | 3258 | 3803 | 5945 | 7601 | 8041 | 8249 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 0168 | 0912 | 1362 | 3130 | 3715 | 3929 | 5647 | 6557 | 6722 | 9341 |
| पाचवे बक्षिस रु. 200/- | 0160 | 0506 | 1033 | 1478 | 2370 | 4540 | 5572 | 8522 | 8581 | 9942 |

सहावे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1474 | 2179 | 3099 | 3852 | 4764 | 5653 | 6536 | 7478 | 8483 | 9491 |
| | | 1502 | 2215 | 3114 | 3905 | 4769 | 5715 | 6562 | 7507 | 8504 | 9520 |
| 0021 | 0641 | 1530 | 2229 | 3129 | 3934 | 5057 | 5725 | 6570 | 7643 | 8582 | 9526 |
| 0029 | 0675 | 1541 | 2234 | 3145 | 3942 | 5065 | 5739 | 6601 | 7656 | 8594 | 9529 |
| 0061 | 0762 | 1591 | 2241 | 3213 | 3946 | 5131 | 5760 | 6619 | 7743 | 8632 | 9543 |
| 0065 | 0807 | 1631 | 2251 | 3265 | 4031 | 5132 | 5777 | 6623 | 7759 | 8658 | 9584 |
| 0068 | 0817 | 1699 | 2257 | 3273 | 4048 | 5192 | 5825 | 6635 | 7762 | 8680 | 9595 |
| 0071 | 0834 | 1737 | 2271 | 3285 | 4049 | 5227 | 5841 | 6665 | 7763 | 8782 | 9596 |
| 0076 | 0849 | 1776 | 2290 | 3336 | 4092 | 5229 | 5875 | 6731 | 7767 | 8821 | 9629 |
| 0089 | 0850 | 1781 | 2365 | 3338 | 4103 | 5254 | 5927 | 6846 | 7770 | 8838 | 9660 |
| 0106 | 0918 | 1799 | 2422 | 3351 | 4194 | 5351 | 5938 | 6884 | 7796 | 8867 | 9692 |
| 0187 | 0957 | 1808 | 2432 | 3363 | 4377 | 5425 | 5982 | 6916 | 7834 | 8884 | 9708 |
| 0200 | 0960 | 1811 | 2470 | 3389 | 4412 | 5455 | 5986 | 6983 | 7847 | 8893 | 9800 |
| 0209 | 0980 | 1864 | 2578 | 3435 | 4454 | 5467 | 6015 | 7073 | 7979 | 8919 | 9827 |
| 0234 | 1052 | 1933 | 2739 | 3484 | 4463 | 5503 | 6065 | 7123 | 8005 | 9017 | 9881 |
| 0259 | 1085 | 1991 | 2767 | 3485 | 4495 | 5505 | 6124 | 7239 | 8058 | 9058 | 9888 |
| 0284 | 1102 | 2002 | 2850 | 3574 | 4526 | 5521 | 6265 | 7243 | 8108 | 9079 | 9896 |
| 0352 | 1124 | 2005 | 2887 | 3583 | 4548 | 5535 | 6286 | 7257 | 8129 | 9129 | 9898 |
| 0444 | 1182 | 2048 | 2902 | 3596 | 4589 | 5552 | 6363 | 7380 | 8290 | 9149 | 9899 |
| 0479 | 1188 | 2072 | 2926 | 3684 | 4645 | 5555 | 6421 | 7384 | 8328 | 9150 | 9927 |
| 0509 | 1197 | 2078 | 3030 | 3703 | 4694 | 5614 | 6456 | 7435 | 8338 | 9157 | 9970 |
| 0633 | 1441 | 2149 | 3050 | 3730 | 4756 | 5652 | 6490 | 7442 | 8456 | 9193 | 9974 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## शुभ राशी दि. १०/१२/२०२५

| | | |
|---|---|---|
| ६ | २ | ७ |
| ६२ | २३ | ७३ |
| ६७ | २८ | ७८ |
| १६९ | १३८ | १६० |
| २४० | २३७ | २६९ |

## निकाल — महाराष्ट्र राज्य लॉटरी — महाराष्ट्र सह्याद्री — महालक्ष्मी विकली लॉटरी — सोडत सायं. 4:30 वाजता

सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 15/- • सोडत दिनांक 09/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **SM-06 : 4564**

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दुसरे बक्षिस रु. 2000/- | 0182 | 0326 | 0768 | 2081 | 3114 श्री गणेश एन्टरप्रायझेस, दादर, मुंबई | 3333 पवार लॉटरी, ठाणे | 4321 अंबिका एजन्सी, दादर, मुंबई | 6199 | 6507 | 9911 |
| तिसरे बक्षिस रु. 1000/- | 0555 | 0758 | 0845 | 5053 | 6099 | 6721 | 6868 | 7554 | 9180 | 9883 |
| चौथे बक्षिस रु. 500/- | 1237 | 2041 | 3203 | 3605 | 3966 | 5154 | 5946 | 9356 | 9806 | 9960 |

पाचवे बक्षीस रु. 300/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 0480 | 1556 | 2662 | 3923 | 5205 | 6229 | 7476 | 8704 |
| | 0571 | 1663 | 2949 | 4046 | 5357 | 6306 | 7521 | 8781 |
| 0004 | 0733 | 1677 | 3004 | 4160 | 5462 | 6366 | 7718 | 8879 |
| 0023 | 0784 | 1739 | 3018 | 4223 | 5555 | 6390 | 7755 | 8985 |
| 0027 | 1055 | 1865 | 3369 | 4417 | 5572 | 6519 | 7759 | 9309 |
| 0062 | 1112 | 2082 | 3404 | 4424 | 5584 | 6622 | 7803 | 9323 |
| 0072 | 1124 | 2136 | 3637 | 4468 | 5658 | 6630 | 8236 | 9369 |
| 0096 | 1164 | 2211 | 3707 | 4566 | 5717 | 6937 | 8273 | 9392 |
| 0157 | 1189 | 2242 | 3767 | 4662 | 5748 | 6946 | 8320 | 9652 |
| 0207 | 1196 | 2273 | 3836 | 4668 | 5792 | 7016 | 8395 | 9929 |
| 0274 | 1209 | 2288 | 3837 | 4830 | 5953 | 7257 | 8598 | 9935 |
| 0342 | 1396 | 2409 | 3841 | 4965 | 6145 | 7288 | 8655 | 9942 |
| 0352 | 1485 | 2412 | 3855 | 5055 | 6168 | 7320 | 8668 | 9974 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## निकाल — गणेशलक्ष्मी शुभ विकली लॉटरी — सोडत सायं. 5:00 वाजता

सोडत दर मंगळवार • सोडत क्रमांक 49 • तिकिट किं. रु. 10/- • सोडत दिनांक 09/12/2025

पहिले सामायिक बक्षिस रु. 10000/- : **MG-02 : 7083** — जे. पी. एस. लॉटरी सेंटर, डहाणू

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **0571**

तिसरे बक्षिस रु. 2000/- : **5546** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 1526 | 1806 | 1873 | 3551 | 3724 | 3940 | 5507 | 6262 | 6266 | 9598 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0474 | 1884 | 2299 | 2424 | 2630 | 5035 | 5337 | 7773 | 8709 | 9183 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0428 | 1424 | 2416 | 2635 | 3879 | 4716 | 5744 | 6041 | 6606 | 7533 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1112 | 2272 | 3305 | 4321 | 5091 | 5880 | 7078 | 8168 | 9439 |
| | | 1118 | 2321 | 3312 | 4326 | 5095 | 5882 | 7197 | 8200 | 9478 |
| | | 1164 | 2323 | 3321 | 4345 | 5235 | 5888 | 7283 | 8211 | 9497 |
| 0000 | 0553 | 1184 | 2378 | 3353 | 4459 | 5243 | 6098 | 7384 | 8260 | 9551 |
| 0005 | 0627 | 1302 | 2399 | 3386 | 4477 | 5245 | 6209 | 7427 | 8278 | 9583 |
| 0045 | 0660 | 1311 | 2405 | 3430 | 4485 | 5275 | 6212 | 7445 | 8298 | 9595 |
| 0050 | 0664 | 1518 | 2409 | 3433 | 4490 | 5286 | 6246 | 7505 | 8398 | 9670 |
| 0067 | 0701 | 1601 | 2412 | 3534 | 4505 | 5444 | 6296 | 7550 | 8404 | 9705 |
| 0069 | 0705 | 1621 | 2429 | 3714 | 4574 | 5539 | 6297 | 7625 | 8425 | 9708 |
| 0070 | 0706 | 1661 | 2492 | 3718 | 4624 | 5553 | 6346 | 7693 | 8432 | 9729 |
| 0095 | 0708 | 1825 | 2502 | 3736 | 4668 | 5556 | 6460 | 7700 | 8482 | 9748 |
| 0133 | 0753 | 1844 | 2557 | 3769 | 4677 | 5573 | 6601 | 7706 | 8647 | 9790 |
| 0140 | 0895 | 1923 | 2622 | 3802 | 4738 | 5574 | 6635 | 7720 | 8689 | 9842 |
| 0160 | 0901 | 2000 | 2724 | 3899 | 4780 | 5575 | 6678 | 7738 | 8717 | 9863 |
| 0204 | 0907 | 2002 | 2829 | 3932 | 4794 | 5579 | 6742 | 7818 | 8832 | 9879 |
| 0232 | 0918 | 2070 | 2836 | 4034 | 4824 | 5633 | 6761 | 7827 | 8919 | 9887 |
| 0240 | 1025 | 2117 | 2925 | 4145 | 4827 | 5665 | 6886 | 7845 | 9018 | 9906 |
| 0424 | 1054 | 2128 | 2943 | 4146 | 4929 | 5697 | 6963 | 7887 | 9237 | 9909 |
| 0430 | 1058 | 2140 | 3053 | 4193 | 4997 | 5756 | 6967 | 8010 | 9240 | 9917 |
| 0494 | 1089 | 2200 | 3095 | 4232 | 5045 | 5785 | 7008 | 8028 | 9269 | 9989 |
| 0501 | 1101 | 2202 | 3201 | 4257 | 5051 | 5850 | 7074 | 8078 | 9369 | 9994 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

## महाराष्ट्र पद्मीनी विकली लॉटरी

सोडत दर मंगळवारी • तिकीट किंमत रु. 50/- • सोडत क्र. 49 • सोडत दिनांक 09/12/2025

पहिले सामाईक बक्षिस रु. 7 लाख : **PM-01 : 1099** — प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण, प्रिन्स एजन्सी - मुंबई यांचा मार्फत

प्रोत्साहनपर बक्षिस रु. 2500/- (पहिल्या बक्षीसाची विजेता मालिका सोडून इतर सर्व मालिकांसाठी) : **1099**

दुसरे बक्षिस रु. 5000/- : **4805** — ओम गं गणपतेय नमः लॉटरी - पुणे, प्रिन्स लॉटरी सेंटर अँड जनरल स्टोअर्स - कल्याण

सर्व मालिकांसाठी • FOLLOWING NO.'S ARE COMMON TO ALL SERIES • सर्व मालिकांसाठी

| बक्षिस | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तिसरे बक्षिस रु. 2000/- | 0607 | 1112 | 1788 | 2597 | 2842 | 3762 | 5842 | 6502 | 8263 | 9033 |
| चौथे बक्षिस रु. 1000/- | 0771 | 2040 | 2680 | 2815 | 3674 | 4322 | 7603 | 8846 | 9894 | 9898 |
| पाचवे बक्षिस रु. 500/- | 0011 | 2581 | 4878 | 5027 | 6217 | 7155 | 7681 | 7788 | 8096 | 8513 |
| सहावे बक्षिस रु. 200/- | 0500 | 1225 | 2461 | 2576 | 4279 | 4455 | 5626 | 6581 | 8099 | 8608 |

सातवे बक्षीस रु. 100/- (सर्व मालिकांसाठी)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 1080 | 1672 | 2275 | 3123 | 3759 | 4543 | 5495 | 6269 | 6986 | 7773 | 8551 | 9018 |
| | | 1087 | 1675 | 2279 | 3124 | 3803 | 4548 | 5520 | 6280 | 6994 | 7775 | 8601 | 9028 |
| | | 1103 | 1704 | 2282 | 3134 | 3811 | 4587 | 5537 | 6296 | 6998 | 7777 | 8602 | 9057 |
| | | 1104 | 1710 | 2312 | 3137 | 3813 | 4604 | 5557 | 6322 | 7041 | 7778 | 8623 | 9075 |
| | | 1105 | 1715 | 2321 | 3138 | 3836 | 4626 | 5562 | 6347 | 7044 | 7797 | 8659 | 9170 |
| 0000 | 0560 | 1116 | 1721 | 2332 | 3140 | 3842 | 4656 | 5564 | 6360 | 7047 | 7804 | 8684 | 9194 |
| 0001 | 0593 | 1131 | 1736 | 2372 | 3143 | 3867 | 4704 | 5581 | 6407 | 7049 | 7818 | 8688 | 9208 |
| 0005 | 0597 | 1134 | 1765 | 2399 | 3157 | 3879 | 4733 | 5591 | 6420 | 7058 | 7825 | 8717 | 9228 |
| 0015 | 0615 | 1141 | 1807 | 2443 | 3163 | 3956 | 4750 | 5613 | 6432 | 7060 | 7876 | 8733 | 9272 |
| 0016 | 0619 | 1144 | 1833 | 2447 | 3165 | 3982 | 4774 | 5626 | 6434 | 7082 | 7879 | 8769 | 9280 |
| 0019 | 0641 | 1153 | 1842 | 2485 | 3169 | 3993 | 4775 | 5645 | 6477 | 7095 | 7897 | 8772 | 9289 |
| 0030 | 0673 | 1161 | 1885 | 2501 | 3213 | 4097 | 4799 | 5682 | 6508 | 7126 | 7965 | 8778 | 9291 |
| 0040 | 0680 | 1169 | 1912 | 2504 | 3236 | 4128 | 4828 | 5728 | 6518 | 7164 | 7967 | 8786 | 9329 |
| 0049 | 0688 | 1173 | 1915 | 2522 | 3243 | 4139 | 4837 | 5774 | 6520 | 7187 | 7995 | 8801 | 9333 |
| 0061 | 0690 | 1175 | 1916 | 2555 | 3245 | 4144 | 4849 | 5812 | 6536 | 7194 | 8023 | 8809 | 9397 |
| 0072 | 0703 | 1181 | 1933 | 2575 | 3267 | 4146 | 4857 | 5819 | 6548 | 7239 | 8043 | 8816 | 9410 |
| 0091 | 0760 | 1184 | 1981 | 2620 | 3304 | 4174 | 4880 | 5835 | 6549 | 7322 | 8088 | 8824 | 9449 |
| 0105 | 0794 | 1191 | 2016 | 2622 | 3310 | 4196 | 4891 | 5871 | 6572 | 7327 | 8109 | 8827 | 9457 |
| 0131 | 0801 | 1195 | 2030 | 2625 | 3323 | 4242 | 4894 | 5939 | 6610 | 7373 | 8122 | 8833 | 9497 |
| 0180 | 0804 | 1227 | 2040 | 2639 | 3325 | 4244 | 4920 | 5942 | 6633 | 7374 | 8145 | 8838 | 9515 |
| 0202 | 0829 | 1243 | 2042 | 2666 | 3337 | 4256 | 5077 | 5954 | 6638 | 7425 | 8168 | 8853 | 9585 |
| 0224 | 0860 | 1263 | 2046 | 2674 | 3340 | 4275 | 5158 | 5975 | 6648 | 7427 | 8184 | 8856 | 9659 |
| 0270 | 0871 | 1293 | 2053 | 2680 | 3353 | 4290 | 5185 | 5991 | 6651 | 7444 | 8202 | 8869 | 9719 |
| 0285 | 0878 | 1317 | 2061 | 2721 | 3359 | 4294 | 5195 | 6021 | 6671 | 7450 | 8212 | 8883 | 9746 |
| 0292 | 0900 | 1318 | 2082 | 2725 | 3392 | 4336 | 5208 | 6044 | 6673 | 7493 | 8224 | 8889 | 9750 |
| 0333 | 0909 | 1326 | 2086 | 2748 | 3397 | 4338 | 5210 | 6059 | 6683 | 7521 | 8248 | 8892 | 9799 |
| 0404 | 0944 | 1341 | 2092 | 2824 | 3401 | 4340 | 5230 | 6064 | 6690 | 7547 | 8274 | 8899 | 9820 |
| 0419 | 0949 | 1362 | 2111 | 2825 | 3413 | 4341 | 5240 | 6065 | 6694 | 7575 | 8280 | 8905 | 9836 |
| 0426 | 0953 | 1459 | 2124 | 2827 | 3448 | 4388 | 5254 | 6067 | 6699 | 7577 | 8293 | 8912 | 9843 |
| 0444 | 0970 | 1477 | 2129 | 2830 | 3453 | 4427 | 5256 | 6085 | 6722 | 7657 | 8314 | 8916 | 9848 |
| 0448 | 0971 | 1516 | 2137 | 2860 | 3461 | 4428 | 5280 | 6091 | 6726 | 7663 | 8350 | 8918 | 9859 |
| 0449 | 0980 | 1519 | 2160 | 2922 | 3479 | 4433 | 5322 | 6125 | 6806 | 7678 | 8354 | 8923 | 9860 |
| 0469 | 0987 | 1536 | 2170 | 2924 | 3544 | 4434 | 5347 | 6156 | 6826 | 7692 | 8355 | 8934 | 9864 |
| 0478 | 1011 | 1565 | 2172 | 2935 | 3560 | 4451 | 5350 | 6161 | 6832 | 7709 | 8368 | 8945 | 9893 |
| 0499 | 1014 | 1571 | 2190 | 3005 | 3573 | 4452 | 5359 | 6176 | 6846 | 7718 | 8392 | 8959 | 9896 |
| 0505 | 1016 | 1588 | 2201 | 3026 | 3582 | 4454 | 5387 | 6187 | 6852 | 7721 | 8408 | 8962 | 9905 |
| 0510 | 1021 | 1595 | 2209 | 3070 | 3595 | 4469 | 5392 | 6206 | 6856 | 7737 | 8442 | 8964 | 9911 |
| 0516 | 1042 | 1622 | 2224 | 3078 | 3639 | 4484 | 5443 | 6219 | 6858 | 7747 | 8468 | 8989 | 9950 |
| 0539 | 1046 | 1662 | 2230 | 3083 | 3641 | 4487 | 5483 | 6238 | 6864 | 7752 | 8487 | 9012 | 9994 |
| 0541 | 1062 | 1671 | 2273 | 3121 | 3730 | 4488 | 5489 | 6256 | 6928 | 7754 | 8537 | 9015 | 9998 |

छपाईतील कोणत्याही चुकीबद्दल आम्ही जबाबदार नाही. अचुक निकालासाठी अधिकृत गॅझेट पहावे. प्रस्तुतकर्ता: महाराष्ट्र राज्य लॉटरी

# वागातोर आणि आसगावमधील क्लब, ब्युटिक रिसॉर्ट सील

■ म्हापसा

**आवश्यक** सुरक्षा उपायांचा अभाव आढळून आल्याने सरकारच्या आदेशानुसार उत्तर गोव्यातील रोमिओ लेनचा वागातोर येथील क्लब आणि आसगावमधील ब्यूटिक रिसॉर्ट मामलेदार कार्यालयाकडून सील करण्यात आला आहे. दरम्यान नाईट क्लबचा मालक थायलंडला फरार झाल्याची चर्चा आहे. साकवाडी-हडफडे

**हडफडे जळीतकांडानंतर प्रशासनाची कारवाई**

येथील बर्च बाय रोमिओ लेन या नाईट क्लबमध्ये घडलेल्या जळीतकांडाच्या नंतर ही कारवाई केली आहे. या आस्थापनाच्या मालकीच्या वझरात-वागातोर येथील रोमिओ लेन क्लब तसेच आसगाव येथील रोमिओ लेन ब्यूटीक रिसॉर्टची पडताळणी सरकारी यंत्रणांनी केली.

# मस्कच्या स्टारलिंकची भारतात इंटरनेट सेवा! ८ हजारात अमर्याद डेटा

नवी दिल्ली - एलन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीने भारतातील त्यांच्या सॅटेलाईट इंटरनेट सेवा स्टारलिंकच्या किमती जाहीर केल्या. कंपनीच्या स्थानिक प्लॅनसाठी ग्राहकांना अमर्याद डेटासाठी दरमहा ८,६०० रुपये भरावे लागतील. सेवा सुरू करण्यासाठी ३४,००० रुपयांचे सॅटेलाईट डिश हार्डवेअर किट एकदाच विकत घ्यावे लागतील या प्लॅनमध्ये ग्राहकांना अमर्याद डेटा दिला जाईल. कनेक्शन घेण्यापूर्वी ३० दिवसांचा ट्रायल कालावधी दिला आहे. भारतामध्ये ग्रामीण व दुर्गम भागांत इंटरनेटची उपलब्धता कमी असल्याने स्टारलिंकची सेवा तेथे उपयुक्त ठरेल, असा कंपनीचा विश्वास आहे. यावर्षी नोव्हेंबरमध्ये स्टारलिंकने महाराष्ट्र सरकारसोबत भागीदारी जाहीर केली, त्यामुळे महाराष्ट्र हे कंपनीसोबत करार करणारे भारतातील पहिले राज्य ठरले.

# हज यात्रेकरुंसाठी सौदीचे नवे डिजिटल कार्ड

■ रियाध



**सौदी** अरेबियातील मक्का आणि मदिना येथे हज यात्रेदरम्यान वाढत्या गर्दी टाळण्यासाठी आणि अवैध घुसखोरी करणाऱ्या लोकांना रोखण्यासाठी सौदी सरकारने नुसुक उमराह या नावाचे नवे डिजिटल कार्ड लॉन्च केले. या कार्डमुळे हज यात्रेकरुंचा प्रवास अधिक सुखाचा होणार आहे. देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय यात्रेकरुंची एक डिजिटल ओळख तयार केली जाणार आहे. हे कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. नुसुक उमराह कार्ड यात्रेकरुंना प्रवासातील आवश्यक सेवा जलद आणि सुलभतेने मिळतील. हज यात्रेकरुंना शटल आणि बस सेवांबद्दल देखील सहजतेने माहिती उपलब्ध होईल. याशिवाय यात्रेचे व्यवस्थापन करणाऱ्यांना सुरक्षित आणि सुव्यवस्थितपणे लोकांना मदत करता येईल. हे कार्ड वाहनांना इंधनासाठी आधी प्राधान्य दिले जाईल. देशांतर्गत राहण्याची सोय आणि त्यांना जाण्याच्या ठिकाणाची माहिती देखील सहजतेने उपलब्ध होईल. यात्रेकरुंची ओळख डिजिटल होईल आणि त्यातील आरोग्यविषयक तपशिलांमुळे पत्ता आणि इतर डेटामुळे नोंदी सहज उपलब्ध होतील.

देश विदेश

# अजमेर शरीफ दर्ग्यावर बुलडोझर नको दिल्ली उच्च न्यायालयाचा आदेश





■ नवी दिल्ली

**दिल्ली** उच्च न्यायालयाने केंद्राला अजमेर शरीफ दर्ग्यामधील किंवा त्याच्या आसपासच्या इमारतींवर बुलडोझर फिरवण्यास मनाई केली आहे. बाधित व्यक्तींचे म्हणणे प्रथम ऐकून घेण्याचे निर्देश दिल्ली हायकोर्टाने दिले आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, प्रभावित व्यक्तींना सुनावणीची संधी न देता तुम्ही बुलडोझर चालवू शकत नाही.

२२ नोव्हेंबर २०२५ रोजी जारी केलेल्या नोटिशीला आव्हान देणारे दर्ग्याचे खादिम (पुजारी) मेहराज मिया यांनी दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्या. सचिन दत्ता यांच्या खंडपीठाने हे आदेश दिले. केंद्राने पाठवलेल्या नोटीसमध्ये २७ नोव्हेंबरपर्यंत दर्गा परिसरातील कपाटे, पेट्या आणि दुकानांसह कथित अतिक्रमणे हटविण्याचे निर्देश देण्यात आले होते आणि जर निर्धारित वेळेत ती हटवली गेली नाहीत तर दर्गा समिती पुढील कोणत्याही सूचना न देता बांधकामे हटवेल, असा इशारा देण्यात आला होता.

न्यायालयाने असे निरीक्षण नोंदवले की, दर्गा समितीने पुढील सूचना न देता बांधकामे हटविण्याचा इशारा या नोटिशीत दिला होता. परंतु सरकारने अद्याप अशी समिती स्थापन केलेली नाही. त्यानंतर केंद्राला ही समिती लवकरात लवकर स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. न्यायालयाने आपल्या आदेशात म्हटले आहे की, सध्याची परिस्थिती सुधारण्यासाठी केंद्राने शक्य तितक्या लवकर समिती स्थापन करावी. केंद्राचे वकील अमित तिवारी यांनी असा युक्तिवाद केला की, जानेवारीमध्ये होणाऱ्या उत्सवापूर्वी सुरक्षाविषयक चिंतेमुळे इमारती हटवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. अजमेर शरीफ जिथे सुमारे ५००० यात्रेकरू येण्याची अपेक्षा आहे. संबंधित जागेवर बेकायदेशीरपणे अतिक्रमण करण्यात आले आहे. तेथील रहिवाशांकडे कायदेशीर कब्जा सिद्ध करण्यासाठी कोणतीही कागदपत्रे नाहीत. मात्र समिती अद्याप स्थापन झालेली नाही हे त्यांनी मान्य केले.

# इंडोनेशियात इमारतीला आग लागून २० जणांचा मृत्यू

■ जाकार्ता



**इंडोनेशियाची** राजधानी जाकार्ता येथील एका सात मजली इमारतीला भीषण आग लागली. या दुर्घटनेत आतापर्यंत २० लोक मृत्युमुखी पडले आहे. यात पाच पुरुष आणि १५ महिलांचा समावेश आहे. यापैकी काहींचा मृत्यू गुदमरल्याने झाला आहे. या इमारतीत अडकलेल्यांना बाहेर काढण्याचे काम उशिरापर्यंत सुरू होते. आग लागलेल्या इमारतीत टेरा ड्रोन इंडोनेशियाचे कार्यालय आहे. ही कंपनी खाणकाम (मायनिंग) आणि शेती ॲग्रीकल्चर) संबंधित कामांसाठी ड्रोन सर्वेक्षण सेवा पुरवते. पोलिसांनी सांगितले की, पहिल्या मजल्यावर ठेवलेल्या बॅटऱ्यांमध्ये आग लागली होती. यामुळे आग पसरत गेली आणि लवकरच सातव्या मजल्यापर्यंत पोहोचली.

# बांगलादेशातील रंगपुरात हिंदू पती-पत्नीची हत्या

■ ढाका

**बांगलादेशातील** रंगपूर जिल्ह्यात १९७१च्या स्वातंत्र्य संग्रामातील सैनिक, ७५ वर्षीय योगेश चंद्र राय आणि त्यांची पत्नी सुवर्णा राय यांची घरात गळा चिरून हत्या करण्यात आली. दोघांचे मृतदेह त्यांच्या घरातून सापडले. मात्र याप्रकरणी अद्याप पोलिसांत कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही.

सकाळी ७.३० वाजता शेजाऱ्यांनी आणि घरगुती मदतनीसाने अनेक वेळा दरवाजा ठोठावला. पण कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यानंतर त्यांनी शिडी लावून घरात प्रवेश केला. आतमध्ये सुवर्णा राय यांचा मृतदेह स्वयंपाकघरात आणि योगेश राय यांचा मृतदेह जेवणाच्या खोलीत आढळला. दोघांचेही गळे चिरलेले होते. पोलिसांचे म्हणणे आहे की, हल्ला मध्यरात्री सुमारे १ वाजता झाला. हे दाम्पत्य गावातील घरात एकटेच राहत होते. त्यांची दोन मुले शोवेन चंद्र राय आणि राजेश खन्ना चंद्र राय बांगलादेश पोलिसात नोकरी करतात. बांगलादेशात १९ एप्रिल २०२५ रोजी अज्ञात व्यक्तींनी एका मोठ्या हिंदू नेत्याची हत्या केली होती.

# नांदेड - मुंबई विमानसेवा २५ डिसेंबरपासून सुरू होणार

■ नांदेड

**गेल्या** अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेली नांदेड ते मुंबई ही विमानसेवा अखेर २५ डिसेंबरपासून सुरू होत आहे. आठवड्यातून तीन दिवस ही विमानसेवा सुरू राहणार आहे. स्टार एअरने या विमानसेवेसाठी तिकीटविक्री सुरू केली आहे. नांदेडहून मंगळवार, गुरुवार, शनिवारी सायंकाळी ६ वाजून १० मिनिटांनी मुंबईसाठी हे विमान उड्डाण घेईल. त्यानंतर सायंकाळी ७ वाजून २५ मिनिटांनी मुंबईहून नांदेडसाठी हे विमान रवाना होईल. हा एक तासाचा विमान प्रवास आहे.

# गळ्यात कापूस माळा घालून विरोधकांचे पायऱ्यांवर आंदोलन

■ नागपूर



**हिवाळी** अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विधान भवन परिसरात विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सरकारविरोधात आक्रमक भूमिका घेऊन आंदोलन छेडले. विरोधकांनी गळ्यात कापसाच्या माळा घालून कापूस, सोयाबीन तसेच इतर पिकांना हमीभाव न मिळाल्याबद्दल टीका केली. पहिल्या दिवशी विरोधी पक्षनेत्यांच्या निवडीवरून अधिवेशन गाजले. दुसऱ्या दिवशी शेतकरी प्रश्न केंद्रस्थानी राहिला. यावेळी 'सरकार प्रचारात व्यस्त, कांदा उत्पादक शेतकरी मात्र उद्ध्वस्त, शेतकरी द्रोही सरकारचा निषेध असो, कांद्याला भाव मिळालाच पाहिजे, कापसाला भाव मिळालाच पाहिजे,' अशा घोषणांनी विधान भवन परिसर दणाणून गेला. विरोधकांनी फडणवीस सरकारवर 'फडणवीस सरकार' असा आरोप करत बॅनरबाजी केली. 'कर्जमाफी थांबली, वस्तूंचे दर कोसळले, सोयाबीनला नाही भाव, सत्तेसाठी महायुतीची धावाधाव, अर्थमंत्र्यांच्या खिशात पैसाच नाही, फडणवीसांचे पॅकेज फसवंच आहे, सरकार तुपाशी, शेतकरी उपाशी शेतकऱ्यांची परिस्थिती बिकट झाली,' या मुद्यांवर विरोधकांनी सरकारवर ताशेरे ओढले. कर्जमाफी, कापसाला भाव, सोयाबीनसाठी योग्य दर अशी मागणी विरोधकांनी केली. या आंदोलनात आमदार विजय वडेट्टीवार, शशिकांत शिंदे, आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, सुनील प्रभू, सचिन अहिर, सतेज पाटील, अस्लम शेख आदी नेते उपस्थित होते.

# निफाड तालुका गारठला पारा ६.४ अंशांवर घसरला

■ नाशिक

**विदर्भासह,** उत्तर महाराष्ट्रात किमान तापमान घटल्याने थंडीचा कडाका वाढला आहे. पहाटे धुक्याची दुलई पसरत असून, हुडहुडी वाढत आहे. निफाड तालुका गारठून गेला आहे. निफाड तालुक्यातील कुंदेवाडी येथील गहू संशोधन केंद्रात ६.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. यंदाच्या हिवाळी हंगामातील हे आतापर्यंतचे नीचांकी तापमान आहे. निफाडनंतर परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात ६.६ अंश सेल्सिअस तापमान नोंदले गेले.

# करंजा बाजारातील ३०० मच्छीमार बोटी गाळात अडकल्या ! मासेमारी ठप्प

■ उरण

**उरण** तालुक्यातील करंजा मासेमारी बंदरात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने सुमारे ३०० मच्छीमार बोटी गाळात अडकून पडल्या आहेत आणि बंदराचे कामकाज ठप्प झाले आहे. त्यामुळे मच्छिमारांना मोठा आर्थिक फटका बसला आहे. हे बंदर २५६ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीतून उभारले गेले असून, गाळ काढण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे.

गेल्या १५ वर्षांपासून कार्यरत असलेल्या करंजा बंदराच्या उभारणीसाठी केंद्र आणि राज्य सरकारने २५६ कोटी रुपयांचा निधी खर्च केला आहे. या बंदरात एक हजार मच्छीमार बोटी उभ्या करण्याची क्षमता आहे. मात्र, बंदर विभागाच्या निष्क्रिय कारभारामुळे हे बंदर आजही गाळात रुतले असून, या बंदरातील गाळ काढण्यासाठी सुमारे १८३ कोटी खर्चाचा प्रस्ताव सरकारकडे सादर करण्यात आला आहे. त्यामुळे बंदराच्या नियोजनशून्य आणि भ्रष्ट कामाची सखोल चौकशी करण्यात यावी, अशी मागणी कोळी बांधवांकडून करण्यात येत आहे.

# पुरंदर विमानतळ भूसंपादनासाठी शेतकऱ्यांशी जिल्हाधिकाऱ्यांची बैठक

■ पुणे

**पुरंदर** तालुक्यातील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन, भरपाई याबाबत प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची बैठक झाली. या बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या असंख्य हरकती आणि सध्याच्या विस्थापनासंबंधी प्रश्नांचा आढावा घेण्यात आला. या बैठकीला उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे, बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील आणि प्रकल्पग्रस्त शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी सांगितले की, राज्य सरकार प्रकल्पग्रस्त शेतकरी व ग्रामस्थांनी उपस्थित केलेल्या मागण्यांबाबत सकारात्मक आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढील निर्णयावर चर्चा करण्यासाठी शेतकरी शिष्टमंडळासोबत बैठक घेणार आहेत.

# संगीतकार सतिशचंद्र मोरेंचे प्रदीर्घ आजाराने निधन

■ मुंबई



हरहुन्नरी संगीतकार सतिशचंद्र दत्तात्रय मोरे यांचे प्रदीर्घ आजाराने माऊंट मेरी चर्चजवळील 'शांती आवेदना' येथे निधन झाले. ते ५६ वर्षांचे होते. नि:स्वार्थी, दिलखुलास आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून ते संगीतक्षेत्रात ओळखले जात. त्यांच्या निधनाने संगीतविश्वात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांनी विद्रोही कवी पद्मश्री नामदेव ढसाळ यांच्या कवितांना संगीतबद्ध केले होते. वैशाली सामंत, अवधूत गुप्ते, साधना सरगम, सुरेश वाडकर, कैलाश खेर, शान, शंकर महादेवन, स्वरूप खान, आनंदी जोशी आणि नेहा कक्कर व इतर अनेक दिग्गज गायकांसोबत काम केले होते.

# गोवंडी, मानखुर्दकरांसाठी जलवाहिन्या पालिका प्रशासनाचा १५ कोटी खर्च

■ मुंबई

**पालिकेच्या** 'एम-पूर्व' विभागातील गोवंडी व मानखुर्दच्या नागरिकांना आता पुरेसे पाणी मिळणार आहे. कारण पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातर्फे या भागात नवीन जलवाहिन्या टाकणे आणि जुन्या जलवाहिन्यांचा आकार वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू झाली आहे. या कामासाठी पालिका अंदाजे १५ कोटी रुपये खर्च करणार आहे.

'एम-पूर्व' विभागात येणाऱ्या मानखुर्द, गोवंडी, शिवाजीनगर, देवनार, बैंगनवाडी परिसरात कायमच पाणीटंचाई भासत असते. कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना कमी पाणी मिळत आहे. त्यामुळे रहिवाशांना पाण्याच्या टँकरवर अवलंबून राहावे लागत आहे. या भागात बहुतांश झोपडपट्टी असून, येथे सर्वसामान्य व गरीब कुटुंबांची संख्या जास्त आहे. त्यामुळे येथील नागरिकांना दररोज टँकरचे पाणी घेणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही. यामुळे अनेक वेळा स्थानिकांनी रस्त्यावर उतरून आंदोलने केली होती.

# नागपूरात महिला कबड्डीपटूची कीटकनाशक पिऊन आत्महत्या

■ नागपूर

**नागपूरच्या** सावनेर परिसरात राहणारी महिला कबड्डीपटू किरण सूरज दाढेने कीटकनाशक सेवन करून आत्महत्या केली. या घटनेने नागपूरमध्ये खळबळ उडाली आहे. आर्थिक अडचणी, नोकरीच्या आमिषाने फसवणूक, लग्नातील ताणामुळे किरण मानसिक त्रासात होती. या प्रकरणी तिचा नवरा स्वप्निल लांबघरेवर गुन्हा दाखल झाला आहे. स्वप्निल लांबघरेने २०२० मध्ये नोकरी मिळवून देण्याचे आश्वासन देऊन तिच्याशी विवाह केला होता. मात्र, तो नोकरी मिळवून देण्याबाबत टाळाटाळ करत होता आणि किरणला धमक्या व शिवीगाळ करत होता, असा आरोप आहे. या ताणामुळे किरणने कुटुंब न्यायालयात घटस्फोटाची याचिका दाखल केली होती. याच त्रासाला कंटाळून तिने कीटकनाशक प्राशन करून आयुष्य संपवले असल्याचे सांगितले जाते.

# नवज्योत सिंग सिद्धू यांच्या पत्नीची काँग्रेसमधून हकालपट्टी



■ चंडीगड

**काँग्रेसच्या** माजी आमदार आणि माजी क्रिकेटपटू नवज्योतसिंग सिद्धू यांच्या पत्नी नवज्योत कौर सिद्धू यांना पक्षविरोधी वादग्रस्त वक्तव्यांचा फटका बसला आहे. पंजाब प्रदेश काँग्रेस कमिटीने त्यांचे पक्ष सदस्यत्व निलंबित केले आहे. त्यांच्यावर पक्षविरोधी वक्तव्य केल्याचे आणि शिस्तभंगाचे आरोप असल्याने ही कारवाई केल्याचे प्रदेशाध्यक्ष अमरिंदर सिंग राजा वारिंग यांनी स्पष्ट केले.

६ डिसेंबरला राज्यपाल गुलाबचंद कटारिया यांची भेट घेतल्यानंतर नवज्योत कौर म्हणाल्या होत्या की, काँग्रेस पक्षात सद्यस्थितीत मुख्यमंत्रिपदासाठी रस्सीखेच सुरू आहे. यात पक्षाचे नुकसान होत आहे. आमच्याकडे कोणत्याही पक्षाला देण्यासाठी पैसे नाहीत. पण सिद्धू यांना मुख्यमंत्रिपदाचा चेहरा बनवल्यास राजकारणात सक्रिय होऊ. त्यांच्याकडे पंजाबमध्ये सुवर्ण राज्य बनवण्याची क्षमता आहे. पण पंजाब काँग्रेसमध्ये जो कोणी ५०० कोटी रुपयांची सुटकेस देतो, त्याला मुख्यमंत्रिपदाचा चेहरा केले जाते. त्यानंतर एका मुलाखतीत त्यांनी पंजाब काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष राजा वारिंग यांनी नगरसेवकांची तिकिटे ५ कोटींना विकल्याचा आरोप केला होता. तसेच राजा वारिंग, चरणजीत चन्नी, सुखजिंदर रंधावा आणि प्रताप सिंग बाजवा हे सर्व मुख्यमंत्रिपदासाठी स्पर्धा करून काँग्रेसची वाताहात करत आहेत. यावरून गदारोळ झाल्यानंतर सारवासारव करत त्यांनी एक्सवर आपल्या वक्तव्याचा विपर्यास केल्याचे म्हटले.

# सोयाबीन आयात वाढीमुळे शेतकऱ्यांवर हमीभावाचे संकट

■ छत्रपती संभाजीनगर

**लोकसभा** निवडणुकीत सोयाबीनचा दर वाढवण्याचे आश्वासन दिल्यानंतरही मोठ्या प्रमाणावर आयात सुरू आहे. सध्या दक्षिण आफ्रिकेतून एक लाख टन सोयाबीन मराठवाड्यात येणार असून, या आयातीमुळे बाजारभावात घट होण्याची भीती आहे. आयात माल प्रति क्विंटल ४,८७० रुपयांना उपलब्ध होणार असल्याने जाहीर केलेला ५,३२८ रुपयांचा हमीभाव मिळणे शेतकऱ्यांसाठी कठीण झाले आहे. अतिवृष्टीमुळे देशांतर्गत उत्पादनात १० ते १५ टक्क्यांची घट अपेक्षित असली तरी बाजारभावात वाढ न होताच घसरण सुरू आहे. सध्या लातूर बाजारपेठेत शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा सुमारे ८५८ रुपये कमी दर मिळत आहेत. सोयाबीन प्रोसेसर असोसिएशन ऑफ इंडियाचे उपाध्यक्ष नरेश गोयंका यांनी वाणिज्य मंत्रालयाला आयात थांबवण्याची मागणी केली आहे, कारण कमी दरात आयात माल मिळत असल्याने प्रक्रिया उद्योग हेच खरेदी करतील आणि स्थानिक बाजारभाव वाढण्याची शक्यता कमी होईल.

# गोरेगाव-मुलुंड उड्डाणपुलाला विलंबाबद्दल कंत्राटदाराला दंड

■ मुंबई

**गोरेगाव**-मुलुंड लिंक रोडच्या कामात झालेल्या विलंबाबद्दल पालिकेने कंत्राटदार एस. पी. सिंगला २.०९ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. हा पूल जुलै महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित होते. पण आता हा पूल मे २०२६ पर्यंत पूर्ण होणार आहे.

गोरेगाव (पश्चिमेकडील) टोकावरील सहा पदरी उड्डाणपुलाचा मुलुंड भागातील फक्त एक भाग ३१ मे २०२६ रोजी जनतेसाठी खुला केला जाईल, तर उर्वरित भागासाठी आणखी काही महिने लागतील. पूल विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, जुलै आणि ऑगस्टच्या विलंबाचा दंड १९ नोव्हेंबर रोजी वसूल करण्यात आला. गोरेगाव बाजूने जून २०२५ ची अंतिम बांधकामाची मुदत कंत्राटदाराने चुकवली आहे. मुलुंड बाजूचे काम प्रगतीपथावर आहे. परंतु मे २०२६ मध्ये फक्त एकाच भागात वाहतूक सुरू केली जाऊ शकते. एका अधिकाऱ्याने सांगितले की, सोनापूर जंक्शनजवळील सुविधा, पाण्याच्या पाईपलाईन आणि अतिक्रमणांमुळे मुलुंडचा शेवटचा भाग रखडला आहे. मूळ योजना ३१ मे २०२६ पर्यंत पूर्ण मुलुंड उड्डाणपूल उघडण्याची होती. अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजित बांगर यांनी विलंब कायम राहिल्यास पुढील कारवाई केली जाईल, असे म्हटले आहे. ते म्हणाले की, आम्ही मुदत चुकवल्याबद्दल २ कोटी रुपयांचा दंड ठोठावला आहे. कंत्राटदाराने काम जलद न केल्यास अधिक दंड आकारला जाईल. गोरेगाव बाजूसाठी आवश्यक असलेल्या ३१ खांबांपैकी २७ खांब पूर्ण झाले आहेत, तर उर्वरित चार खांबांचे काम सुरू आहे. काम पूर्ण झाल्यावर हा पूल दिंडोशी ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यान आणि फेज ३ चा दुसरा प्रमुख घटक असलेल्या दोन भूमिगत बोगद्यांशी थेट जोडणी देईल. दरम्यान, स्थानिक आमदार मिहिर कोटेचा यांनी सुरक्षा आणि कामात वारंवार त्रुटी असल्याचा आरोप करत कंत्राटदाराचा करार रद्द करण्याची मागणी केली आहे.

# पंढरपुरात शेततळ्यात बुडून पती-पत्नीसह मुलाचा मृत्यू

■ पंढरपूर

**पंढरपुरातील** कोर्टी गावात शेतमजुरी करणाऱ्या विजय लोंढे (३०), प्रियांका लोंढे (२८) आणि ५ वर्षांचा प्रज्ज्वल लोंढे यांचा घराजवळच्या शेततळ्यात बुडून मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना दुपारी साडेबारा वाजता घडली. दुपारच्या सुमारास प्रज्ज्वल शेतात खेळत होता. बराच वेळ झाला तरी तो दिसला नाही, म्हणून त्याला शोधण्यासाठी प्रियंका गेली असता त्यांना तो शेततळ्यात पडल्याचे दिसले. त्याला वाचवण्यासाठी त्या शेततळ्यात उतरल्या, मात्र त्यांनाही पाण्याचा अंदाज न आल्याने त्या बुडल्या. ते दोघेही बराच वेळ आले नाहीत म्हणून विजय यांनी शेतात व शेततळ्याकडे जाऊन पाहिले असता मुलगा व पत्नी शेततळ्यात बुडत असल्याचे दिसले. त्यांना वाचविण्यासाठी त्यांनी शेततळ्यात उडी मारली.मात्र दुर्दैवाने विजय देखील बुडाले.



संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# दावा न केलेल्या दोन लाख कोटींचे काय?

सर्वसामान्य माणसाचे जीवनमान हे त्याला मिळणाऱ्या नोकरीवर, व्यवसायावर, उद्योगावर किंवा अगदी त्याला मिळणाऱ्या रोजंदारीवरच अवलंबून असते. स्वतःचा दैनंदिन किंवा महिन्याचा खर्च भागवत असताना नकळतपणे प्रत्येकाच्या खिशातून कररूपाने काही ना काही पैसे सरकार वसूल करीत असते. आपल्या देशाची एकूण समाजव्यवस्था पाहिली तर जवळपास पन्नास टक्के जनता ही सरकारी किंवा खासगी नोकऱ्या करणारी म्हणजे पगारदार जनता आहे असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. रोजंदारीवर काम करणाऱ्यालासुद्धा आठवडा किंवा महिन्याच्या काठी पैसे दिले जातात. यातल्या जवळपास सत्तर टक्के ठिकाणी पगाराच्या पैशातून वेगवेगळ्या पद्धतीची करकपात होते. पगारदार माणूस असेल तर भविष्यनिर्वाह निधी, ग्रॅच्युएटी, व्यवसाय कर किंवा कमी पगार असणाऱ्यांसाठी एम्प्लाई प्रॉव्हिडंट फंड किंवा कर्मचारी आरोग्य विमा योजनेसाठीसुद्धा पैसे कापून घेतले जातात. सर्वसाधारणपणे निवृत्तीनंतर पेन्शन स्वरूपात अल्प स्वरूपात का असेना महिन्याकाठी काही ना काही रक्कम मिळावी म्हणून जवळपास सगळा पगारदार वर्ग पगारातली ही पेन्शनची वजावट मान्य करतो. शिवाय समाजातला असा एक मोठा वर्ग आहे की, तो बँकांमध्ये ठेवीच्या स्वरूपातही रक्कम गुंतवून त्याच्या व्याजावर मिळणाऱ्या रकमेतून आपला घरखर्च भागवण्याचा प्रयत्न करतो. बऱ्याच वेळेला तर अशिक्षित किंवा अर्धशिक्षित वर्गाकडून बँकांमध्ये खाती उघडली जातात. पण पुरेसा पैसा नसल्याने त्या खात्यांवर व्यवहार होत नाहीत. अनेकवेळेला तर बँकांच्या नियमांचे पालन न होणे किंवा ठेवीदाराच्या मागे कोणताही वारस नसल्याने ठेवींची ही रक्कम वर्षानुवर्षे बँकांमध्ये तशीच पडून राहते. आपल्या देशातले बँकिंग व्यवहार किंवा कार्यपद्धती ही इतकी चाकोरीबद्ध आणि निर्ढावलेली असते की, त्यांच्याकडे वर्षानुवर्षे, सामान्य ठेवीदारांबद्दलही फारशी संवेदनशीलता पाहायला मिळत नाही. जर एखादा ठेवीदार बरीच वर्षे बँकेत फिरकला नाही आणि त्याच्या ठेवी मुदत संपल्यानतंरही पडून राहिल्या तरी त्याचा शोध घेण्याची आणि ठेवी परत करण्याची सरकारी किंवा सहकारी बँकांची मनोवृत्ती नसते.

**बँकांमधील ७८ हजार कोटी**

अलिकडेच थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींनीच सरकारी बँका आणि अन्य ठिकाणी सामान्य माणसाचे परंतु त्याला कोणीच दावेदार नसलेले तब्बल ७८ हजार कोटी रुपये तसेच पडून आहेत. याशिवाय ९ हजार कोटी रुपये हे म्युच्युअल फंड आणि तत्सम ठेवींमधून त्या त्या संस्थांकडे पडून आहेत आणि या रकमेचे वारसदार कोण आहेत हे शोधून काढण्याचे आदेश बँकांना दिले गेलेले आहेत. गेल्या पाच वर्षांत जवळपास पाच हजार कोटी रुपये संबंधित ठेवीदारांना परत केले गेले. ७८ हजारांपैकी केवळ पाच हजार कोटीच परत करता आले. याचा अर्थ बँकांकडून पंतप्रधानांच्या आवाहनालाही कोणताही गतीमान प्रतिसाद मिळालेला नाही हे सिद्ध होते. ही गोष्ट खरी आहे की, बँकांकडे पुरेसा कर्मचारी वर्ग नसतो आणि ठेवीदारांचा शोध घेणे ही तशी कसोटी पाहणारीच प्रक्रिया ठरते. परंतु बँका खाते उघडताना किंवा ठेवी जमा करताना संबंधित व्यक्तीच्या वारसाचाही उल्लेख त्यावर करून घेते. संबंधित ठेवीदाराचे किंवा खातेदाराचे पत्ते बँकांकडे असतात. काहीवेळेला खातेदार आपले स्थलांतर झाले किंवा बदली झाली तरी त्याची कल्पना बँकांना देत नाही. साधारणपणे तीन वर्षांनंतर या ठेवी विनादावेदार म्हणजेच अनक्लेम्ड डिपॉझिट म्हणून बँका स्वतःकडे जमा करून घेतात. आणि अशी ही गेल्या अनेक वर्षांपासून जमा झालेली अनक्लेम्ड डिपॉझिटची रक्कम ७८ हजार कोटींची आहे. त्याच्यावर मिळणाऱ्या व्याजाचा विचार केला तर ती आज नक्कीच सव्वा लाख कोटींवर जाऊन पोहोचते. या रकमेचा इतर कोणताही उपयोग न करता ठेवीदार आज ना उद्या येतील अशा अपक्षेने तशीच पडू दिली जाते. परंतु यात कोणत्याही प्रकारचा शहाणपणा नाही. खरे तर इतकी प्रचंड रक्कम विनादावेदार पडून राहते. ही गोष्ट बँकिंग किंवा अर्थक्षेत्रातील कार्यपद्धतीवर बोट ठेवणारी म्हणावी लागते.

**भविष्यनिर्वाह निधीचे दीड लाख कोटी**

योग्य पद्धतीने या ठेवींची विल्हेवाट लावता येणे शक्य आहे. अशा ठेवी पडून राहू शकतात. याबद्दल गेल्या पन्नास वर्षांचा अनुभव बँकांना आहे. त्यातून धडा घेऊन भविष्यकाळात असा दावा न करणाऱ्या ठेवींची संख्या वाढू नये. दोन-तीन वर्षातच मुदत संपलेल्या या ठेवी संबंधित व्यक्ती किंवा त्याच्या नातेवाईकांना परत करण्याची तत्परता दाखवता येऊ शकते. तशा प्रकारची वेगाने प्रतिसाद देणारी व्यवस्थाही निर्माण करता येऊ शकते. आश्चर्याचा आणि धक्कादायक भाग असा आहे की, सरकारी आणि सहकारी बँकांमध्येदेखील या लाख-सव्वालाख कोटींशिवाय भविष्य निर्वाह निधी कार्यालयात निवृत्ती वेतनासाठी दावा न केलेली किंवा कागदपत्रांची पूर्तता नसल्याचे कारण सांगून निवृत्तीवेतने नाकारलेल्यांची अशीच जवळपास दीड लाख कोटींची रक्कम तशीच पडून आहे. भविष्य निर्वाह निधी कार्यालयातला कारभार इतका अंदाधुंदीचा आहे की, सतत कर्मचाऱ्यांची कमतरता सांगून निवृत्त होऊन आपल्या वेतनासाठी धडपडणाऱ्या म्हणजेच जवळपास साठी उलटलेल्यांनासुद्धा या कार्यालयात माणुसकीची किंवा सौजन्याची वागणूक मिळत नाही. मुंबईच्या वांद्रे इथल्या भविष्य निर्वाह निधी कार्यालयात आपल्या निवृत्ती वेतनासाठी महिनोन्‌महिने खेटा घालणाऱ्यांची रोज गर्दी असते. तासन्‌तास रांगेत उभे राहूनही दहा टक्के लोकांची कामे होत नाहीत. खरे तर यातल्या ७५ टक्के निवृत्तीधारकांची नावे, पत्ते यांचा डेटा त्यांच्याकडे उपलब्ध असतो. परंतु त्यांचा पाठपुरावा करून कर्मचाऱ्यांना घरपोच सेवा देण्याची आवश्यकता आहे. परंतु सरकारनेही याबाबत तशी संवेदनशीलता दाखवलेली नाही.

## सुविचार

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

इंद्रधनुष्य आणि माणूस या दोघांमध्ये एक साम्य आहे. दोघांमध्ये विविध रंग असतात. मात्र इंद्रधनुष्याचे रंग डोळ्याने व माणसाचे रंग अनुभवाने पाहता येतात एवढाच फरक.

## पंचांग

**बुधवार, १० डिसेंबर २०२५**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**
*** मार्गशीर्ष कृष्ण षष्ठी**
*** नक्षत्र : मघा**



**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-०० कर्क**
**०२.२३ ते २४.०० सिंह**

**रवी उदय- ०७-०२**
**रवी अस्त- १८-०१**

मुद्रक, प्रकाशक **श्री. रोहित रमाकांत पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८, जिल्हा-ठाणे, महाराष्ट्र. येथे छापून घेतले व शॉप नं. २०२, अनुपम चेंबर्स, ७३३ सदाशिव पेठ, कुमठेकर रस्ता, पुणे-४११०३० येथे प्रसिद्ध केले.

संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.) संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०, जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९, छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
**REGD. No. MAHMAR/2021/81075**

Printed and Published by **Rohit Ramakant Pande**
On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708, Dist-Thane, Maharashtra. Published at Shop No.202, Anupam Chembers, 733, Sadashiv Peth, Kumthekar Road, Pune-411030.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)




## कच्च्या केळ्याची भजी



★ **साहित्य :-** २ कच्ची केळी, १ चमचा मसाला, १ चमचा हळद, १ चमचा धने पावडर, कोटिंगसाठी -एक मोठी वाटी बेसन, २ चमचे तांदळाचे पीठ, १ चमचा चिली फ्लेक्स, १/२ चमचा हिंग, १/२ चमचा हळद, २ हिरव्या मिरच्या बारीक कापून, थोडी कोथिंबीर, चवीप्रमाणे मीठ, तळण्यासाठी तेल.

★ **कृती :-**१) प्रथम केळी स्वच्छ धुऊन त्याचे साल काढून घ्यावे व त्याचे थोडे क्रॉस असे काप करून पाण्यात ठेवावे. २) दहा मिनिटांनंतर एका ताटात घेऊन त्यात मसाला, हळद, पावडर व थोडे मीठ लावून चांगले मिक्स करून घ्यावे. एका भांड्यात बेसन, तांदळाचे पीठ, हळद, चिली फ्लेक्स, हिंग, हिरवी मिरची, कोथिंबीर व चवीप्रमाणे मीठ घालून घ्यावे.३) बेसनमध्ये थोडे थोडे पाणी घालून कव्हरसाठी मिश्रण तयार करून घेणे. मसाला लावलेले काप त्यात बुडवून कढईत तळून काढणे. ४) गरमागरम केळा भजी तयार. स्पेशली ही भजी केरळमध्ये मिळते.



# १६ डिसेंबर रोजी अबुधाबीत आयपीएलचा मिनी लिलाव! ३५० खेळाडूंचा समावेश



**इंडियन प्रिमियर लीगचा (आयपीएल) मिनी लिलाव येत्या १६ डिसेंबर रोजी अबुधाबी येथे होत आहे.यासाठी भारतीय क्रिकेट नियामक संघटनेने (बीसीसीआय) एक हजारहून अधिक खेळाडूंची यादी कमी करून साडेतीनशे खेळाडूंचा समावेश या लिलावासाठी केला आहे.बीसीसीआयने एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे.**

■ अबुधाबी

या साडेतीनशे खेळाडूंमध्ये २४० भारतीय तर ११० अन्य देशांतील खेळाडू आहेत. नुकतीच एकदिवसीय सामन्यांमधून निवृत्ती स्वीकारलेला दक्षिण आफ्रिकेचा यष्टीरक्षक - फलंदाज क्विंटन डी कॉक याचे नाव या साडेतीनशे खेळाडूंमध्ये आहे.डी कॉकचा समावेश अगदी शेवटच्या क्षणी करण्यात आला आहे.त्याची मूळ किंमत (बेस प्राईझ) १ कोटी रुपये आहे.

यादीत ऑस्ट्रेलियाचा फलंदाज स्टीव्ह स्मिथचा समावेश आहे. त्याची मूळ किंमत २ कोटी रुपये आहे. स्थिथ २०२१ मध्ये आयपीएल खेळला होता.

या मिनी लिलावासाठी १ हजार ३९० खेळाडूंनी आपल्या नावाची नोंदणी केली होती. या यादीत छाटणी करून पहिल्यांदा १ हजार ५ खेळाडूंचा समावेश करण्यात आला. त्यानंतर अंतिम यादीत ३५० खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. जगातील सर्वात मोठी टी-२० स्पर्धा मानल्या जाणाऱ्या या एकोणिसाव्या टी-२० स्पर्धेत दहा संघ आहेत.या संघांमध्ये एकूण ७७ सामने खेळवले जाणार आहेत.

लिलावाच्या पहिल्या फेरीत भारताचे पृथ्वी शॉ आणि सरफराज खान यांचा समावेश आहे. त्यांची मूळ किंमत प्रत्येकी ७५ लाख रुपये ठेवण्यात आली आहे.

ऑस्ट्रेलियाचे कॅरेमन ग्रीन आणि जेक फ्रेझर-मॅकगर्क, न्यूझिलंडचा फलंदाज डेव्होन कॉनवे, दक्षिण आफ्रिकेचा डेव्हिड मिलर यांचा या यादीत समावेश आहे. या सर्वांची मूळ किंमत प्रत्येकी २ कोटी रुपये आहे.इंग्लंडचे गस अटकिन्सन,लियाम लिव्हिंगस्टोन, बेन डकेट आणि जेमी स्मिथ, श्रीलंकेचा वनिंडू हसरंगा, भारताचा व्यंकटेश अय्यर हे प्रत्येकी २ कोटी रुपये मूळ किंमत असलेले खेळाडू या यादीत आहेत.

## व्यंकटेश प्रसाद कर्नाटक क्रिकेट संघटनेचा अध्यक्ष

■ बंगळुरु

**भारतीय** क्रिकेट संघाचा माजी वेगवान गोलंदाज व्यंकटेश प्रसाद याची कर्नाटक राज्य क्रिकेट संघटनेच्या (केएससीए) अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.निवडणुकीच्या माध्यमातून प्रसाद याची ही निवड झाली आहे.

केएससीएच्या निवडणुकीत त्याने अध्यक्षपदासाठी अनुभवी क्रिडा प्रशासक के एन शांतकुमार यांच्यावर ७४९-५५८ अशी मात केली. निवडणुकीत केएससीएच्या १ हजार ३०७ सदस्यांनी मतदानाचा हक्क बजावला. प्रसादला भारतीय संघातील माजी सहकारी फिरकी गोलंदाज अनिल कुंबळे आणि वेगवान गोलंदाज जवागल श्रीनाथ यांचे समर्थन लाभले.

उपाध्यक्ष पदाच्या निवडणुकीत भारतीय संघाचे माजी फलंदाज सुजित सोमसुंदर यांनी डी विनोद शिवप्पा यांच्यावर ७१९-५८८ असा विजय मिळवला. सचिवपदी संतोष मेनन, कोषाध्यक्षपीद बी एन मधुकर यांची निवड झाली.

## प्रबोधन क्रीडा महोत्सवाचा उद्या उत्साहात प्रारंभ

■ मुंबई

**प्रबोधन** गोरेगावचे संस्थापक, माजी मंत्री व शिवसेना नेते सुभाष देसाई यांच्या प्रमख मार्गदर्शनाखाली पश्चिम उपनगरात लोकप्रिय असलेला 'प्रबोधन आंतरशालेय क्रीडा महोत्सव' १० ते १३ डिसेंबर प्रबोधन क्रीडाभवन, गोरेगाव (प) येथे आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे यंदा ४६ वे वर्ष आहे. महोत्सवाचे उद्‌घाटन उद्या १० रोजी सकाळी ८.३० वाजता ''सुप्रिया लाईफस्टाईल'चे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सतीश वाघ यांच्या हस्ते होईल.


या महोत्सवाला ४ दशकांचा इतिहास लाभला असून पश्चिम उपनगरातील वांद्रे ते दहिसरपर्यंतच्या शाळा मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. या महोत्सवात चमकलेल्या खेळाडूंनी राज्य तसेच राष्ट्रीय स्तरावरही आपली छाप सोडलेली आहे असे संस्थेचे कार्यवाह गोविंद गावडे यांनी सांगितले. प्रत्येक खेळात सर्वाधिक गुण कमाई करणा-या शाळांना सांघिक पुरस्कार दिले जातात. एकत्रितरित्या अव्वल ठरणा-या शाळेला 'प्रबोधन ग्रॅन्ड ट्रॉफी' चा बहुमान प्राप्त होतो.

## ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंदला कँडिडेट्स २०२६ मध्ये स्थान

■ नवी दिल्ली

**भारताचा** तरुण बुद्धिबळपटू ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंद याने फिडे सर्किट २०२५ जिंकून कँडिडेट्स -२०२६ मध्ये आपले स्थान निश्चित केले आहे. तो या कँडीडेट्स स्पर्धेत स्थान मिळवणारा तो भारताचा एकमेव पुरुष खेळाडू असेल. या वर्षभरात अनेक मोठ्या स्पर्धांमधील त्याच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्याला ही संधी मिळाली आहे.

१९ वर्षीय प्रज्ञानंदने ग्रँडमास्टर २०२५ मध्ये सातत्याने उत्कृष्ट कामगिरी केली.त्याने वाईक आन जे मास्टर्स, सुपरबेट चेस क्लीसिक रोमानिया, उजचेस कप मास्टर्स आणि लंडन चेस क्लासिक ओपन यांसारख्या मोठ्या स्पर्धा जिंकल्या.त्याचप्रमाणे त्याला स्टेपन अवाग्यान मेमोरियलमध्ये दुसरे स्थान मिळाले.तर सिंकफिल्ड चषक स्पर्धेत तो पहिल्या पंधरामध्ये राहिला.



कँडिडेट्स-२०२६ स्पर्धेत एकूण आठ स्पर्धक असतील. त्यापैकी सात स्पर्धकांची नावे निश्चित झाली आहेत.यामध्ये अनिश गिरी, फेबियानो कारुआना, मॅथियास ब्लूबाउम, जवोखीर सिंदारोव्ह, वेई यी, आंद्रेई एसीपेंको आणि आर प्रज्ञानंद यांचा समावेश आहे.

तर ज्या खेळाडूची ऑगस्ट २०२५ ते जानेवारी २०२६ पर्यंतची सरासरी सर्वाधिक असेल त्याचा समावेश आठवा स्पर्धक म्हणून होईल.त्यासाठी त्या खेळाडूला १ फेब्रुवारी २०२५ ते १ जानेवारी २०२६ दरम्यान किमान ४० सामने खेळणे अनिवार्य आहे.त्यामध्ये ६ महिन्यांत किमान १५ सामने खेळावे लागतील. कँडिडेटस २०२६ हि स्पर्धा २८ मार्च ते १६ एप्रिल २०२६ या कालावधीत पेजिया, सायप्रस येथील कॅप सेंट जॉर्जिस हॉटेल अँड्‌ रिसॉर्टमध्ये खेळवली जाणार आहे.

## कर्णधार सूर्यकुमार यादवला दोन विक्रम करण्याची संधी

■ नवी दिल्ली

**आजपासून** सुरू झालेल्या भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याला दोन विक्रम करण्याची संधी आहे.

सूर्यकुमार या मालिकेत टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत ३ हजार धावा पूर्ण करण्याची संधी आहे. तीन हजार धावांचे लक्ष्य गाठण्यासाठी त्याला फक्त २४६ धावांची आवश्यकता आहे.त्याने हा टप्पा गाठला तर तो रोहित शर्मा आणि विराट कोहलीनंतर टी-२० मध्ये ३ हजार धावा करणारा तिसरा भारतीय फलंदाज ठरेल. दुसरा विक्रम असेल चारशे षटकारांचा. टी-२० मधील आक्रमक फलंदाज अशी ओळख असलेल्या सूर्यकुमारने आतापर्यंत ३९४ षटकार ठोकले आहेत.

## विश्वविजेती स्मृती मंधाना पुन्हा मैदानात उतरण्याच्या तयारीत

■ मुंबई

**भारतीय** महिला क्रिकेट संघाची विश्वविजेती उप कर्णधार स्मृती मंधाना पुन्हा एकदा क्रिकेटच्या मैदानात उतरण्यासाठी सज्ज झाली आहे. गेले काही दिवस लग्नाच्या वृत्तामुळे चर्चेत असलेली स्मृती श्रीलंकेविरुध्दच्या पाच सामन्यांच्या टी-२० स्पर्धेत खेळणार की नाही अशी चर्चा सुरू होती.मात्र नुकताच सोशल मीडियावर तिचा सराव करतानाचा फोटो व्हायरल होताना दिसत आहे.त्यामुळे ती भारतीय संघातील निवडीसाठी उपलब्ध आहे, असे संकेत मिळाले आहेत.



महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेनंतर स्मृती मानधना आणि बॉलिवुडमधील संगीतकार पलाश मुच्छल यांचे लग्न हा चर्चेचा विषय बनला होता. मात्र त्यांच्या लग्नात ऐनवेळी काहीतरी विघ्न आले आणि ते लग्न मोडले. काही दिवस या लग्न मोडण्यावरून उलट सुलट तर्कवितर्क लावले जात होते. अखेर स्मृती आणि पलाश यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून लग्नाचा विषय आपण संपवत असल्याचे स्पष्ट केले.

## राज जाधव, सानिका चाफे महाराष्ट्राचे खो-खो कर्णधार

■ अहिल्यानगर

**राज्य** अजिंक्यपद स्पर्धेतील तेजस्वी कामगिरीच्या बळावर धाराशिवचा राज जाधव व



सांगलीची सानिका चाफे यांची अनुक्रमे कुमार व मुली गटाच्या महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. येत्या ३१ डिसेंबर २०२५ ते ४ जानेवारी २०२६ या कालावधीत कर्नाटकच्या बंगळुरू येथे होणाऱ्या ४४व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत हे दोन्ही संघ महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

अहिल्यानगर येथे पार पडलेल्या ५१ वी कुमार-मुली राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धेत केलेल्या कामगिरीच्या आधारे जाधव व चाफे यांची कर्णधारपदी निवड करण्यात आली आहे. निवड समिती सदस्य श्रीनिवास मेतरी (रायगड), मनोज परदेशी (नंदुरबार), योगेश सोळसे (बीड) व राखी जोशी (पुणे) यांच्या उपस्थितीत निवड झाली.


### संघातील खेळाडू

**कुमार गट :** राज जाधव - कर्णधार, जितेंद्र वसावे, हाराद्या वसावे, सोत्या वळवी, विशाल वसावे (सर्व धाराशिव), शंभूराज चंदनशिव, अरमान शेख, सिद्धार्थ माने-देशमुख (सर्व सोलापूर), श्री दळवी, पार्थ देवकाते (सर्व सांगली), श्री वसावे, आदेश पाटील (सर्व पुणे), तरबेज खान (सातारा), आशिष गौतम (ठाणे), ओमकार चव्हाण (अहिल्यानगर), राखीव : शंकर यादव (पुणे), समर्थ सावंत (मुं. उपनगर), लोकेश जाधव (सातारा), प्रशिक्षक : मोहन राजपूत (सोलापूर), सहा. प्रशिक्षक : सुजित माळी (लातूर), व्यवस्थापक : गणेश वारुळे (अहिल्यानगर)

**मुली गट :** सानिका चाफे - कर्णधार, श्रावणी तामखडे, विद्या तामखडे, सानिया सुतार (सर्व सांगली), धनश्री कंक, प्रणिती जगदाळे, दिक्षा काटेकर, श्रुती चोरमारे (सर्व ठाणे), मैथिली पवार, राही पाटील (सर्व धाराशिव), स्नेहा लामकाणे, प्राजक्ता बनसोडे (सर्व सोलापूर), निलम मोहंडकर (नाशिक), श्वेता नवले (पुणे), दिव्या पायले (रत्नागिरी), राखीव : कल्याणी लामकाणे (सोलापूर), सखुबाई चव्हाण (पुणे), सलोनी भोसले (सातारा), प्रशिक्षक : अभिजित पाटील (धाराशिव), सहा. प्रशिक्षक : ऐश्वर्या सावंत (रत्नागिरी), व्यवस्थापिका : उज्वला चेमटे (अहिल्यानगर)

## दिव्यत्वाची जिथे प्रचिती... तिथे कर माझे जुळती

**डॉ. बाबा आढाव यांचे आज पुण्यामध्ये दिर्घ आजारामुळे निधन झाले आणि वीस वर्षांपूर्वीचा तो दिवस मला आठवला. एसटी कामगार संघटनेचे जनरल सेक्रेटरी हनुमंत ताटे साहेबांसोबत मला सातारा रोडच्या त्यांच्या घरी जाण्याचा योग आला होता.**



**संदीप शिंदे**
अध्यक्ष महाराष्ट्र एसटी कामगार संघटना

**बाबांच्या** पत्नी सौ. शिलाताई घरी होत्या आणि बाबा भवानी पेठेतल्या ऑफीसमधून येणार होते. काही वेळात बाबा आले. त्यांनी पिवळ्या चाफ्याची फुले आम्हाला दिली आणि मग एसटीच्या गप्पांचा चांगला दोन तास फड रंगला. बाबांनी एसटी हमालांच्या काही अडचणी सांगितल्या. भाऊ फाटकांपासून ते किशोर काका पवारांपर्यंत आठवणी जागवत असतानाच हनुमंतराव दौऱ्यात खाण्यापिण्याची काळजी घेत जा, अशा सूचना देतानाच मी मोबाईल वापरत नाही तुम्ही सुद्धा अतिवापर टाळा, अशा सूचना बाबांनी दिल्या आणि मग आम्ही तिथून निघालो. पण मनात येत होतं इतका कष्टकऱ्यांचा व्याप डोक्यात असतानाही इतक्या आपुलकीने बारीक सारीक सूचना देणारे बाबा किती ग्रेट आहेत! नंतरच्या अनेक आंदोलनात मला एसटीच्या वतीने सहभागी होण्याचा योग आला. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर किंवा आरटीओ कार्यालयासमोर रिक्षावर भोंगा लावून आभाळाची आम्ही लेकरं काळी आमुची आई. धर्म वेगळा नाही आम्हा जात वेगळी नाही असं बाबांसोबत गाताना आम्हाला स्फुरण चढायचं. मळकट कपड्यातले हमाल, खाकी डगल्यातले रिक्षावाले, केस विस्कटलेल्या घरकाम करणाऱ्या महिला बाबांच्या आजूबाजूला बसून घोषणा द्यायचे तेव्हा बाबा जणू आषाढीला आलेल्या वारकऱ्यांच्या गर्दितला पांडुरंगच भासायचे.

पुढे अनेकवेळा बाबांची भेट व्हायची मोलाचे मार्गदर्शन मिळायचे आणि सोबत चाफ्याच्या फुलांचा सुगंधही असायचा. मंध्यंतरी एसटी कामगारांचा संप एका अनुभवहिन व्यक्तीने पाच-साडेपाच महिने ताणला. तो संप म्हणजे एक षड्यंत्र होते. पण टीव्ही वरच्या बातम्या बघून बाबांचा जीव कासावीस झाला. बाबांनी फोन करून आम्हा दोघांना घरी बोलावून घेतलं. काय चाललंय? एसटी कामगारांचा गिरणी कामगार करायचाय का? या माणसाला त्यांना भिकेला लावायचंय का? असे खडे बोल सुनावले. मी म्हटलं बाबा लोकं ऐकायला तयार नाहीत आम्हाला संघटना नको संघटना विरहीत संप करायचाय आणि जो मध्ये येईल त्याला लोकं मैदानावर येऊ देत नाहीत. एका भल्या पत्रकारालाही गो बॅक म्हणून काढून दिलंय.. बाबा खूप अस्वस्थ होते नुकतेच त्यांचं कॅन्सरचं निदान झालं होतं आणि केमो शरीराला सूट होत नव्हता अशाही अवस्थेत बाबा म्हटले, मी राणी लक्ष्मीबाईच्या पुतळ्याजवळ उपोषणाला बसतो आणि एसटी कामगारांना आवाहन करतो असे लेकराप्रमाणे सर्व कामगारांवर प्रेम करणारे बाबा किती महान होते. गेल्या १ ऑगस्टला ताटे साहेबांच्या पंच्याहत्तरीचा कार्यक्रम घेण्याचं ठरल्यावर एका डॉक्युमेंटरीसाठी मी आणि सौ. शिलाताई नाईकवाडे त्यांच्या कार्यालयात गेलो दिलखुलास पणे त्यांनी मुलाखत दिली. १ ऑगस्टला पुर्णवेळ कार्यक्रमाला थांबून सुंदर भाषण देखील केलं.

परवा नितीन पवारांचा फोन झाला. बाबांना ॲडमीट केलंय असं सांगीतले. मी आणि ताटे साहेब पुणा हॉस्पिटलला भेटायला गेलो. सौ. शिलाताई बसून होत्या भाई वैद्यांचा नातूच उपचार करतोय पण शरीर साथ देत नाही. एक एक ऑर्गनचं काम मंदावतंय आणि कॅन्सरही स्प्रेड होतोय असं कळल्यावर काळजात धस्स झालं. अन्यायाला परतवून लावणारे बाबा या आजाराला का परतवून लावत नाहीत? मूठ बांधून एक आरोळी ठोकून त्या आजाराला चले जाव का करत नाहीत? असं वाटायचं पण व्यर्थ.

चळवळीच्या या देवाला आम्ही स्पर्श करू शकलो या देवाकडून चळवळ शिकू शकलो हे आम्हा सर्वांचे भाग्यच!

***प्रिय बाबा अखेरचा लाल सलाम!***

***




# मैदानाच्या श्रेयासाठी भाजपा-बविआमध्ये चढाओढ
## एकाच दिवशी दोन्ही पक्षांकडून उद्धघाटन झाले

■ वसई

**पालिका** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांमध्ये विकासकामांचे श्रेय घेण्याची चढाओढ लागली आहे. नालासोपारा येथे पालिकेने तयार केलेल्या मैदानाचे श्रेय घेण्यासाठी एकाच दिवशी भाजप आणि बविआने उद्धघाटन केले.

नालासोपारा पश्चिमेकडील श्रीप्रस्था येथे पालिकेने ३ एकर जागेवर खेळाचे मैदान तयार केले आहे. विकासकांकडून जागा हस्तांतरीत करून हे मैदान तयार करण्यात आले आहे. हे मैदान हस्तांतरीत करण्याचे प्रकरण मागील अनेक वर्षांपासून प्रलंबित होते. त्यामुळे त्याचे उद्धघाटन करण्यापूर्वी भाजपाने जोरदार जाहिरात केली होती. भाजपाने संध्याकाळी उद्धाटनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. मात्र सकाळीच बविआच्या कार्यकर्त्यांनी मैदानाच्या लोकार्पणाचा सोहळा पार पडला. त्यामुळे भाजपाच्या गोटात अस्वस्थता पसरली. संध्याकाळी आमदार राजन नाईक यांनी पुन्हा त्याच खेळाच्या मैदानाचे उद्धाटन केले.

मैदानासाठी आम्ही पाठपुरावा करून विकासकांकडून जागा हस्तांतरीत करून घेतली. मात्र श्रेय घेण्याआधाची बविआने घाईत आमच्या आधी उद्धघाटनाचा देखावा केला असा आरोप भाजपाचे नेते मनोज पाटील यांनी केला. विकासकांनी जागा हस्तांतरीत करताना लाभ घेतला आणि पालिकेला जागा दिली. यात भाजपाचा काहीही संबंध नसताना ते श्रेय घेत आहेत असा दावा माजी नगरसेवक अतुल साळुंखे यांनी केला आहे. एकाच दिवशी झालेले दोन उद्धटना सोहळे आणि राजकीय पक्षांचे आरोप प्रत्यारोप प्रत्यारोपांची चर्चा सध्या चांगलीच रंगली आहे.

# माळशेज रस्त्याची दुरवस्था
## १२ डिसेंबरला धरणे आंदोलन

■ मुरबाड

**कल्याण** मुरबाड माळशेज राष्ट्रीय महामार्ग ६१ चे रुंदीकरण व काँक्रीटीकरण काम सुरू असून माळशेज घाट रस्त्याच्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. या विरोधात सामाजिक कार्यकर्ते रमेश हिंदूराव हे मुरबाड तहसील कार्यालया समोर येत्या १२ डिसेंबर पासून धरणे आंदोलन सुरू करणार आहे.

या महामार्गाचे काम माळशेज घाटा लागत अंत्यत धिम्या गतीने सुरू आहे. संबंधित ठेकेदार व प्रशासनाने ५ कि.मी. पेक्षा जास्त महामार्ग एकाच वेळी दोन्ही बाजू कडुन खोदला आसल्याने प्रवाशांना प्रचंड प्रमाणात त्रास होत आहे. त्यातच चढउतार व वळणाचा रस्ता आसल्याने वाहन चालवतांना चालक वर्गाला कसरत करावी लागत आहे. एकाच वेळी ५ किमी पेक्षा रस्ता खोदण्यास परवानगी कोणी दिली? असा प्रश्न उपस्थित करून मुरबाड बस स्थानकाबाहेर रस्ता पूर्ण रूंद असताना बस स्टॅन्ड समोर रस्त्याची रूंदी कमी करून गटाराचे बांधकाम करण्यात येत आहे यामुळे भविष्यात वाहतूककोंडीचा प्रश्न उपस्थित होईल त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते रमेश हिंदुराव या विरोधात येत्या १२ डिसेंबरला तहसिल कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

# ट्रक- ट्रॅक्टरचा भीषण अपघात
## एका चालकाचा होरपळून मृत्यू

■ पुणे

**जिल्ह्यातील** भिगवण - बारामती महामार्गावर पिंपळे गावच्या हद्दीत उसाने ट्रकने उभ्या ट्रॅक्टरला जोरात धडक दिली. या भीषण अपघातात दोन्ही वाहनाने पेट घेतल्यामुळे ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातातील मृत ट्रॅक्टर चालकाचे नाव अमोल राजू कुराडे असे आहे. तो माळशिरस तालुक्यातील नातेपुते येथील रहिवासी होता. हा अपघात काल रात्री उशिरा घडला. उसाने भरलेला ट्रक भिगवणकडून बारामतीकडे जात असताना रस्त्यावर उभा असलेल्या ट्रॅक्टरला धडकला. यात ट्रॅक्टरची डिझेल टाकी फुटल्याने आग लागली असावी, असा अंदाज आहे. यामुळे दोन्ही वाहनांनी मोठा पेट घेतला. ट्रॅक्टर चालक अडकल्यामुळे त्याला बाहेर पडणे शक्य झाले नाही. त्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातामुळे सुमारे २ तास वाहतूक रखडली. भिगवण पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. आग विझविण्यासाठी दोन अग्निशमन वाहने पाचारण करण्यात आली. अग्निशमन यंत्रणा, पोलीस आणि नागरिकांच्या मदतीने ही आग आटोक्यात आणली.

**जाहीर सूचना**

येथे सर्वसामान्य जनतेस मोठ्या प्रमाणात सूचना देण्यात येत आहे की, माझे अशिल **श्री. चारूदत्त व्ही. वाघ** हे **श्री. दिव्येश सेक्सारिया**, ज्यांचे मालकी हक्क असलेले **फ्लॅट क्र.२०२**, मोजमाप १०८०.९२ चौ.फु. कार्पेट क्षेत्रफळ, २रा मजला, इमारत हिमबिंदू जे जमीन **सीटीएस क्र. २९२ (भाग), २९२/२१ ते ३०, गाव पहाडी गोरेगाव पश्चिम, तालुका बोरिवली, मुंबई उपनगर जिल्हा** यांचा खरेदी करण्याचा मानस आहे.

कोणा व्यक्तिस सदर सदनिकेच्या संदर्भात कोणताही दावा, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, धारणाधिकार, शुल्क, गहाणखत किंवा इतर कोणताही भार असल्यास त्यांनी या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सहाय्यक कागदपत्रांसह लेखी स्वरूपात ते अधोस्वाक्षरीकाराला कळवावे, अन्यथा व्यवहार कोणत्याही अडचणींशिवाय पुढे जाईल.

**विक्रांत के. नारकर**
खरेदीदाराचे वकील
१८/१४१, उन्नत नगर क्र.३, एम. जी. रोड, गोरेगाव (पश्चिम), मुंबई - ४०० १०४.
**९८६९०१४०२१**
दिनांक: ०८.१२.२०२५.

**परिशिष्ट-१६**
**(उपविधी क्र.३४ अंतर्गत)**
सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेमध्ये मयत सदस्याच्या शेअर्सच्या हस्तांतरण आणि हितसंबंधांवर दावे किंवा आक्षेप मागवणारे सूचनेचे स्वरूप.
(सोसायटीच्या सूचना फलकावर प्रदर्शित)

**सूचना**

श्री. विलास रामराव रायकर आणि श्रीमती अनुराधा विलास रायकर हे ग्रीनफिल्ड्स बी' को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडचे सदस्य, त्यांचा पत्ता जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९३ आणि सोसायटीच्या इमारतीत फ्लॅट क्र.बी४-५२ चे धारक, श्री. विलास रामराव रायकर यांचे ०४.११.२०२५ रोजी कोणतेही नामांकन न करता निधन झाले.

सोसायटी याव्दारे, सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाच्या सदर शेअर्स व हितसंबंधाचे हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ही सूचना प्रकाशित झाल्यापासून काही दिवसांच्या आत सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणासाठी त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावा/आक्षेपांच्या पुष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुरावाच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. जर सोसायटीच्या भांडवल/मालमत्तेतील मयत सभासदाच्या शेअर्स व हितसंबंधाच्या हस्तांतरणास काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटीच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीचे कार्यालय/सोसायटीचे सचिव यांच्याकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत सकाळी १० ते सायं.५ पर्यंत उपलब्ध आहेत.

ठिकाण: मुंबई
दिनांक: १०.१२.२०२५
**ग्रीनफिल्ड्स 'बी' को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेडच्या वतीने व करिता**
**अध्यक्ष/मा. सचिव**

# सदाशिव पेठेतील रमेश डाईंग कापड दुकानाला भीषण आग

■ पुणे

**सदाशिव** पेठ परिसरातील प्रसिद्ध कापड आणि रंगकाम दुकान रमेश डाईंगच्या टेरेसवर आज सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमाराला भीषण आग लागली. अग्निशमन दलाच्या चार गाड्या घटनास्थळी तातडीने पोहोचल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली. या आगीत कोणालाही दुखापत झाली नाही. मात्र दुकानांचे मोठे नुकसान झाले.

सदाशिव पेठ हा गजबजलेला भाग आहे. येथे इमारती जवळजवळ एकमेकीला लागून आहेत. त्यामुळे आग पसरण्याचा धोका होता. आग लागल्यानंतर काही वेळातच आगीने अक्राळविक्राळ रूप धारण केले. आगीत गच्चीवर ठेवलेले सामान पूर्णपणे जळून खाक झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी तातडीने आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. आग इतर भागात पसरू नये म्हणून परिसराला वेढा घालण्यात आला आणि रहिवाशांना सुरक्षित अंतरावर ठेवण्यात आले.

# मुंबईच्या हवा प्रदूषणात वाढ
## अनेकांना घशाचे आजार

**मुंबई** - मुंबईत हवेच्या प्रदूषणात वाढ झाल्याने हवेच्या गुणवत्तेची पातळी खालावली आहे. त्यामुळे मुंबईकरांमध्ये विविध आजारांचा त्रास होत आहे. मुंबईकरांच्या घसा आणि त्वचेच्या आजारांमध्ये वाढ झाल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे. प्रदूषणामुळे श्वसनाचा त्रास मुंबईकरांना होत आहेतच. पण हवेची गुणवत्ता वारंवार अत्यंत वाईट श्रेणींमध्ये जात असल्याने, डॉक्टरांकडे विविध तक्रारी घेऊन रुग्ण येत आहेत. हवेतील सूक्ष्म कण, बांधकामातील धूळ आणि वाहनांमधून निघणाऱ्या उत्सर्जनाने भरलेल्या प्रदूषित हवेत दीर्घकाळ राहिल्याने जळजळ होत आहे.

# भाजपाची बविआवर कुरघोडी! साहित्य जल्लोषही रद्द

■ वसई

**वसईतील** सत्ता बदलानंतर भाजपाने बहुजन विकास आघाडीच्या वर्चस्वाला शह देण्यास सुरवात केली आहे. बविआने सुरू केलेले विविध सांस्कृतिक आणि कला क्रिडांचे कार्यक्रम एकापाठोपाठ एक रद्द करण्यात येत आहेत. पालिकेने मॅरेथॉन, दिवाळी पहाट आणि विभागीय कला क्रिडा महोत्सव रद्द केल्यानंतर साहित्य जल्लोषलाही अर्थसहाय्य देण्यास नकार दिल्याने तो रद्द करण्यात आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून वसईत हितेंद्र ठाकूर यांच्या बहुजन विकास आघाडी आणि त्यांच्या संस्थांमार्फत विविध कला क्रिडा आणि साहित्यिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत असते. त्यासाठी महापालिकेचे मोठे अर्थसहाय्य मिळत असते. मात्र मागील वर्षी झालेल्या विधानसभा निवडणूकीत भाजप महायुतीने बविआच्या तिन्ही आमदारांचा पराभव केला. या पराभवामुळे मागील ३५ वर्षांपासून वसई विरार वरील बविआची एकहाती सत्ता संपुष्टात आली होती.

यानंतर भाजपाने महापालिकेला हाताशी धरत बविआला शह देण्यासाठी कुरघोडी करण्यास सुरवात केली आहे. बविआचे कार्यक्रम रद्द करण्यासाठी महापालिकेवर दबाव टाकण्यात येत आहे. त्यामुळे आर्थिक कारण देत मॅरेथॉन स्पर्धा रद्द करण्यात आली. नोव्हेंबर- डिसेंबर या महिन्यात महापालिकेतर्फे शालेय विद्यार्थ्यांसाठी विभागीय कला क्रिडा महोत्सव आयोजित करण्यात येतात. ते देखील रद्द करण्यात आले आहेत.

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that **Mr.Nitesh Prakash Ostwal** Purchased Office No.501 on 5th Floor in Maker Bhavan No.III Comm.Prem.Co.Op.Soc. Ltd., Plot No.19, 21 New Marine Lines, Mumbai-400020 from **Mr. Pranav Veerendra Kadam and Mr. Veerendra Vilasrao Kadam** who have executed Sale Deed Dated: 24-4-2025 but misplaced their original Share certificate No.69 issued by Maker Bhavan III Commercial Premises Society Ltd. of 21, New Marine Lines, Mumbai-400020 with 10 shares bearing distinctive No.441 to 450. The purchaser **Mr.Nitesh Prakash Ostwal** has applied for issuance of a Share Certificate.

Any person or party having any objection to issuance of a fresh Share Certificate in lieu of the lost/misplaced Share Certificate No.69 by way of encumbrance, Gift, partition, inheritance, lien, charge on share nos. 441-450 vide Share Certificate No.69 & / or on office No.501 in Maker Bhavan III for issue of a Duplicate Share Certificate may write to the society within **15 days** from the Publication of the notice failing which fresh Share Certificate will be issued to Mr. Nitesh Prakash Ostwal who is in actual use & possession of office No.501, since date of sale.

**Sd/- Hon.Secretary,**
**Place: Mumbai,** **Add: Office No. 104 on 1st Floor, Maker Bhavan No.3,**
**Date: 10-12-2025.** **Comm.Prem.Co.Op.Soc.Ltd., 21, New Marine Lines, Mumbai-20.**

# नागावमध्ये बिबट्याचा दोन तरुणांवर हल्ला

■ अलिबाग

**अलिबागजवळील** नागाव येथील वाळंज पाडा परिसरात आज सकाळी भरवस्तीत बिबट्याने दोन तरुणांवर हल्ला केला. अमित वर्तक आणि प्रसाद सुतार अशी जखमींची नावे आहेत. त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेची माहिती मिळताच पुणे आणि रोहा येथील वनविभागाची रेस्क्यू पथके नागावला दाखल झाली असून बिबट्याला पकडण्यासाठी सापळा लावण्यात आला आहे. पोलिसांनीही घटनास्थळी पोहोचून परिसरात दक्षता वाढवली आहे. दरम्यान सुरक्षिततेच्या उपाययोजनांतर्गत नागावमधील सर्व शाळांतील विद्यार्थ्यांना घरी सोडण्यात आले आहे. सरपंच हर्षदा मयेकर यांनी ग्रामस्थांना अनावश्यक बाहेर पडू नये, असे आवाहन केले.

# सांगली महापालिकेसाठी आज अंतिम मतदारयादी

■ सांगली

**आगामी** सांगली महापालिका निवडणुकीसाठी उद्या अंतिम मतदारयादी प्रसिद्ध होणार आहे. प्रारूप मतदारयादीवरील सर्व ५,२१३ हरकतींची पडताळणी, स्थळपाहणी झाली आहे. महापालिका प्रशासनस्तरावर मतदारयादी दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे.

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानंतर महापालिका निवडणुकीसाठी प्रशासनाने २० नोव्हेंबर रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिध्द केली होती. या मतदारयादीवर हरकती दाखल करण्यासाठी सुरुवातीला २७ नोव्हेंबरपर्यंत मुदत होती. महापालिकांच्या प्रारूप मतदारयादीत अनेक चुका असल्याच्या तक्रारी मोठ्या संख्येने राज्यभरातून पुढे आल्या. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने हरकती दाखल करण्यासाठी ३ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली.

या कालावधीत सांगली महापालिकेच्या प्रारूप मतदारयादीवर तब्बल ५ हजार २१३ हरकती दाखल झाल्या. यामध्ये मतदारांचे प्रभाग अदलाबदल झाल्याच्या तक्रारी प्रामुख्याने जास्त आहेत. आता दाखल हरकतींवरून स्थळपाहणी, पडताळणी झाली आहे. ज्या मतदारांची नावे अन्य प्रभागात समाविष्ट झाली आहेत, अशांची नावे पुन्हा मूळ प्रभागात ठेवण्यासाठी मतदारयादी दुरुस्तीचे काम अंतिम टप्प्यात आहे. आता उद्या अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. या अंतिम मतदारयादीकडे इच्छुक उमेदवारांचे लक्ष लागले आहे.

# सभागृहाचा- सभापतींचा अपमान
## रोहित पवारांविरोधात हक्कभंग

■ मुंबई

**विधानपरिषदेमध्ये** आज शरद पवार गटाचे नेते रोहित पवार यांच्याविरुद्ध भाजप आ. प्रवीण दरेकर यांनी हक्कभंग प्रस्ताव मांडला. रोहित पवार यांच्या उपस्थितीत त्यांच्या पक्षाचे पदाधिकारी सूर्यकांत मोरे यांनी सभापती आणि सभागृहाचा अवमान करणारे वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला. मोरे यांच्याविरोधातही स्वतंत्र हक्कभंग प्रस्ताव दाखल झाला आहे.

सूर्यकांत मोरेंनी पंचायत समितीच्या सभापतीकडे जे अधिकार आहेत ते विधानपरिषद सभापतींकडेही नाहीत. तसेच तांबड्या बिल्ल्याला कोणी विचारत नाही, हिरव्या बिल्ल्याला लगेच बसा म्हणतात असे विधान केल्याने वाद निर्माण झाला. याबाबत दरेकर म्हणाले की, ही विधाने सभागृह, सभापती आणि सदस्यांचा अवमान करणारी आहेत आणि विधानपरिषदेच्या विशेष हक्कांचा भंग करणारी आहेत. हा प्रकार घडत असताना ठिकाणी रोहित पवार उपस्थित होते, मात्र त्यांनी विरोध करण्याऐवजी मोरे यांच्या वक्तव्याला हसून दाद दिली, हे खेदजनक आहे.

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,**
**पुणे- ४११ ००१, दुरध्वनी क्रमांक ०२० / २६१२१७६५**
Web- www.mahapwd.gov.in & e-mail - integratedpune.ee@mahapwd.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ७० सन २०२५-२०२६**

**कार्यकारी अभियंता, पुणे सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे मध्यवर्ती इमारत आवार पुणे**

१. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत असलेल्या कंत्राटदारांकडून बी-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

वरील निविदा सुचनेची संपुर्ण माहिती खालील संकेत स्थळांवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग, पुणे - १ यांनी राखून ठेवलेला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

1. web - www.mahapwd.gov.in (फक्त निविदा सुचना)
2. http://mahatenders.gov.in (निविदा सूचना व निविदासंच)

सही/-
(अनुराधा रा. भंडारे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम (दक्षिण) विभाग,
पुणे- ४११ ००१.

क्रमांकः आरओसी- २०२५-२६/क्र. ५/C४४४८

**जाहीर नोटीस**

या द्वारे असे सुचित करण्यात येत आहे की, खालील उल्लेखित व्यक्ति या श्री सागर शेजार समिती (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत, पुनर्वसन इमारत क्र. छ. ५, हनुमान नगर, आकुर्ली रोड, कांदिवली पूर्व, मुंबई - ४००१०१. या संस्थेचे सदनिकाधारक सभासद आहेत.

| अ. क्र. | मूळ सभासदाचे नाव | सदनिका क्रमांक | सभासदाचा मृत्यू दिनांक | संस्थेच्या सभासदत्वासाठी अर्ज केलेल्या वारसाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | कै. कमलाकर भिकू पवार | ३२४-सी | १९/८/२०२४ | श्रीमती सुलोचना कमलाकर पवार |
| २ | कै. विरेंद्र सखाराम धुरी | १७१२-बी | २७/२/२०२५ | श्रीमती भाग्यश्री विरेंद्र धुरी |
| ३ | कै. मनोहर पांडुरंग पाटील | १२१७-सी | १६/७/२०२४ | श्रीमती रंजना मनोहर पाटील |
| ४ | कै. विशाल बापूराव कदम | ११६-सी | २६/९/२०१९ | श्रीमती विजया विशाल कदम |
| ५ | कै. पर्शुराम जयराम मोरे | १४१९-सी | ६/८/२०२४ | श्रीमती प्रमिला पर्शुराम मोरे |
| ६ | कै. रामजतन मंगरु मौर्या | गाळा-१८ | १५/३/२०२५ | श्रीमती गीतादेवी रामजतन मौर्या |
| ७ | कै. भगवतीदीन जिताई यादव | गाळा-१६ | ३१/१०/२०२३ | श्रीमती रामराजी भगवतीदीन यादव |
| ८ | कै. वंदना गजानन पंडित | १०१६-सी | २१/४/२०२४ | श्री हितेश गजानन पंडित |

वरील सर्व मूळ सदनिकाधारक वरील संस्थेतील असून ते मयत झाले आहेत त्यांच्या पश्चात त्यांचे अर्जदार वारसांना उपरोक्त संस्थेचे सभासद करुन घ्यावयाचे आहे. तरी सदर बाबत (वारसा हक्क) संबंधी कोणाचीही कोणतीही हरकत असल्यास त्याने/तिने ही जाहीरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत संस्थेच्या नमूद पत्त्यावर संपर्क साधून आपले म्हणणे/आक्षेप/मत लेखी स्वरुपात सादर करावे अन्यथा मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतीचा किंवा आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

**श्री सागर शेजार समिती (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत,**
**दिनांक : ०८/१२/२०२६** **सही/-**
**ठिकाण : मुंबई** **अध्यक्ष / सचिव / कोषाध्यक्ष**

**जाहीर सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, माझे अशिल हे सध्याचे मालक श्री. फ्रेडी डाली मेहता यांच्याकडून दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.२०२, ऑर्किड पॅलेस को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड, प्लॉट क्र.२२, सीटीएस क्र.२८४/१४, मिलिटरी रोड, मरोळ, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०५९, मुंबई उपनगर जिल्ह्यातील गाव मरोळ तालुका अंधेरी येथील जमीन असलेल्या सीटीएस क्र.२८४/१४ (यापुढे उल्लेखित फ्लॅट म्हणून संदर्भित) खरेदी करण्याचा विचार करत आहे.

सध्याच्या मालकाने दिलेल्या माहितीनुसार, २२.०४.१९९२ रोजी मुंबई उपनगर जिल्हा, संयुक्त जिल्हा निबंधक यांच्याकडे रीतसर नोंदणीकृत मूळ करार क्र.२०२४/१९९३ नुसार बिल्डर्स मे.सुप्रीम असोसिएट्स आणि श्रीमती नर्गिश डाली मेहता आणि श्री. फ्रेडी डाली मेहता यांच्यात संयुक्तपणे निष्पादित वरील फ्लॅटचा करार हरवला, गहाळ झाला आहे आणि शोधण्यायोग्य नाही.

श्रीमती नर्गिश डाली मेहता यांचे निधन ०३.१०.२०१२ रोजी झाले आणि त्यांचे पती श्री. डाली डी. मेहता यांचे निधन २४.०९.२००० रोजी झाले, त्यानंतर त्यांचे एकमेव कायदेशीर वारस आणि मुलगा श्री. फ्रेडी डाली मेहता यांनी आईचा ५०% हिस्सा त्यांच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी सोसायटीकडे अर्ज केला आणि त्यानुसार सोसायटीने भाग प्रमाणपत्र त्यांच्या नावावर हस्तांतरित केले.

कोणा व्यक्तिस सदर फ्लॅट विरुद्ध किंवा त्यावर विक्री, करार, कंत्राट, विनिमय, एमओयू, भेटवस्तू, धारणाधिकार, गहाण, कर्ज, शुल्क, भाडेपट्टा, वहिवाट, व्यवसाय, ताबा, सुखसोयी, वारसा, ट्रस्ट, खटला, राहण्याचा हक्क, देखभाल आणि लिजपेंडन्स याद्वारे कोणताही दावा किंवा कोणतेही हितसंबंध असल्यास त्यांनी या तारखेपासून १५ दिवसांच्या आत अधोस्वाक्षरी करणाऱ्यांना सहाय्यक कागदोपत्री पुराव्यांसह लेखी कळवणे आवश्यक आहे.

जर येथे आवश्यकतेनुसार कोणताही दावा प्राप्त झाला नाही किंवा केला गेला नाही, तर असे गृहित धरले जाईल की सदर फ्लॅट मध्ये किंवा त्यावर असा कोणताही दावा माफ केला आहे आणि/किंवा सर्व हेतू आणि उद्देशांकरिता त्याग केला आहे आणि तो माझ्या अशिलांवर बंधनकारक नसेल आणि माझे अशिल सध्याच्या मालकासह खरेदी व्यवहार पूर्ण करेल आणि अशा दाव्याचा कोणताही संदर्भ न घेता सदर व्यवहार पूर्ण केले जाईल आणि जर काही असल्यास ते माफ केले आहे असे समजले जाईल.

**सही/-**
**वकील महावीर के. रांभिया**
वुडलँड क्रेस्ट, पहिला मजला, विजय नगर समोर, पलोती चर्च जवळ मरोळ मरोशी रोड, मरोळ, अंधेरी (पू), मुंबई ४०० ०५९
ठिकाण: मुंबई,
दिनांक: १०.१२.२०२५

## आता ‘थ्री इडियट्स’चाही सिक्वेल येणार


राजकुमार हिरानी दिग्दर्शित ‘थ्री इडियट्स’ या चित्रपटाने भारतीय प्रेक्षकांवर जी छाप उमटवली, ती आज १५ वर्षांनंतरही कायम आहे. अभिनेता आमिर खान, आर. माधवन, शर्मन जोशी आणि अभिनेत्री करिना कपूर यांनी साकारलेल्या व्यक्तिरेखांनी विनोद, भावस्पर्शी क्षण आणि शिक्षणप्रणालीवरील टिप्पणी या सर्वांचा सुंदर मेळ साधला




होता. म्हणूनच हा चित्रपट पिढ्यान्‌पिढ्या पुन्हा पाहिला जातो. आता या कालातीत कथेला पुढील अध्यायाची जोड मिळणार असल्याची माहिती समोर येत असून, चाहत्यांमध्ये याविषयी प्रचंड उत्सुकता दिसून येत आहे. ‘थ्री इडियट्स-२’ ची पटकथा राजकुमार हिरानी यांनी अंतिम केल्याचे वृत्त पिंकविलाने दिले आहे. या चित्रपटाच्या निर्मितीची तयारी २०२६ मध्ये सुरू होणार असून, आमिर खान, करीना कपूर, आर. माधवन आणि शर्मन जोशी हे मूळ चित्रपटातील सर्व प्रमुख कलाकार पुन्हा एकत्र येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे पहिल्या चित्रपटाने जो ठसा उमटवला, त्याची जादू पुन्हा अनुभवता येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते.

या कथेला पुढे नेण्याची राजकुमार हिरानी यांची इच्छा अनेक वर्षांपासून होती. दादासाहेब फाळके यांच्या जीवनावर आधारित जीवनपटाचे काम तात्पुरते थांबल्यानंतर त्यांनी या सिक्वेलच्या संकल्पनेवर पुन्हा लक्ष केंद्रित केले. हिरानी यांच्या मनातील कल्पना आता पूर्ण पटकथेच्या स्वरूपात विकसित झाली आहे. या सिक्वेलचा दर्जा पहिल्या चित्रपटाइतका भक्कम असावा, याबाबत ते आग्रही आहेत. ‘थ्री इडियट्स-२’ ची कथा अद्याप गुप्त ठेवली असली, तरी ती १५ वर्षांनंतरच्या चार मुख्य व्यक्तिरेखांच्या जीवनप्रवासावर आधारलेली असेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. विनोद, आत्म चिंतन आणि जीवनमूल्ये यांचा नेहमीचा हिरानी शैलीतील मिलाफ यात असेल, अशी चाहत्यांची खात्री आहे. रणछोडदास, फरहान, राजू आणि पिया या सर्वांच्या जीवनात घडलेल्या बदलांचा शोध घेण्याची संधी या सिक्वेलमुळे मिळणार आहे.

## ‘फाझला’ची पडद्यामागची गोष्ट




‘धुरंधर’ या चित्रपटातील एका प्रसंगामुळे अभिनेता अक्षय खन्ना पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर अवघ्या एका दिवसात ‘फाझला’ हे गीत समाजमाध्यमांवर प्रचंड लोकप्रिय ठरले. बलुचिस्तानमधील एका उत्सवी सोहळ्यात अभिनेता अक्षय खन्ना यांनी साकारलेल्या रहमान डाकैत या व्यक्तिरेखेची नाट्यमय एन्ट्री आणि त्याचवेळी उमटणारा त्यांचा सहज, वेधक नृत्यभाव या सर्वांनी प्रेक्षकांना अक्षरश: मोहून टाकले. या पार्श्वभूमीवर नृत्यदिग्दर्शक विजय गांगुली यांनी या दृश्याशी संबंधित रोचक तपशील उलगडले आहेत. त्यानुसार, या प्रसंगातील नृत्य मूळ पटकथेत नव्हतेच.

अभिनेता अक्षय खन्ना यांनी केवळ प्रवेश करायचा, नर्तकांच्या मधून चालत जात सिंहासनावर बसायचे, एवढेच ठरलेले होते. मात्र स्थळाची उभारणी, वातावरण, नर्तकांचा सळसळता उत्साह हे सर्व पाहून त्यांनी स्वत: हून या दृश्यात नृत्याची भर घातली. कोणालाही कल्पना नसताना त्यांनी प्रवेशाच्या क्षणीच संपूर्ण दृश्य हातात घेतले आणि सहजपणे, कोणत्याही पूर्वतयारीशिवाय नृत्य सादर केले. दिग्दर्शक आदित्य धर यांनी पाकिस्तानमधील बलुचिस्तानची जागा केंद्रशासित प्रदेश लडाखमध्ये अत्यंत काळजीपूर्वक उभी केली आहे. वायुविजन कमी असलेली आणि उंचीमुळे त्रास देणारी ही भूमी अत्यंत आकर्षक असली, तरी शरीरप्रकृती त्या वातावरणाला साथ देत नाही. अभिनेता अक्षय खन्ना यांनाही याच अतिउंचीवरील वातावरणाचा त्रास झाला. त्यामुळे त्यांना सतत ऑक्सिजन सिलिंडर आणि मास्क सोबत ठेवावे लागले. गांगुली सांगतात की, अक्षय एक छोटा ऑक्सिजन सिलिंडर स्वत: सोबत बाळगत होते. त्या गीताचे चित्रीकरण सुरू असताना त्यांचा ऑक्सिजन स्तर खाली गेला होता. त्यामुळे प्रत्येक शॉटनंतर ते मास्क लावत. मात्र या त्रासाचा जराही परिणाम त्यांच्या कामावर झाला नाही. सीन पूर्ण केला आणि ते थेट घरी परतले. या गीताला मिळणाऱ्या लोकप्रियतेतून अक्षय यांना अभिनयातील समर्पणाची पोचपावती मिळाली आहे.

## ‘धुरंधर’ची कमाई घसरली!

रणवीर सिंहच्या ‘धुरंधर’ या मोठ्या बजेटच्या चित्रपटाने पहिल्या तीन दिवसांत बॉक्स ऑफिसवर जोरदार कामगिरी केली होती. मात्र वीकेंडनंतर बहुतेक चित्रपटांच्या कमाईत घट दिसून येते आणि ‘धुरंधर’ही याला अपवाद ठरला नाही. सोमवारच्या दिवशी चित्रपटाच्या व्यवसायात तब्बल ४६.५१ टक्क्यांची घसरण नोंदवली गेल्यामुळे आगामी काळातील कलेक्शनविषयी चिंता निर्माण झाली आहे. पहिल्या दिवशी या चित्रपटाने २८ कोटी रुपयांची दमदार ओपनिंग घेतली होती. शनिवारी कमाईत १४.२९ टक्क्यांची वाढ दिसून आली आणि



कलेक्शन ३२ कोटी रुपये झाले. रविवारी ही वाढ आणखी वेगवान ठरली आणि ३४.३८ टक्क्यांनी वर जात ४३ कोटी रुपयांचा व्यवसाय नोंदवला गेला. मात्र सोमवारच्या कमाईने चित्रपटाच्या प्रवासाला अचानक ब्रेक लागत २३ कोटी रुपयांवर कलेक्शन थांबले. चार दिवसांच्या एकत्रित कमाईकडे पाहता, ‘धुरंधर’ने भारतीय बॉक्स ऑफिसवर १२६ कोटी रुपयांचा नेट व्यवसाय केला आहे. वर्ल्डवाईल्ड कमाईची आकडेवारी पाहता, चित्रपटाने चौथ्या दिवसापर्यंत १७० कोटी रुपयांचा टप्पा पार केला. ‘धुरंधर’चा एकूण निर्मिती खर्च २८० कोटी रुपये इतका आहे. यापैकी २५० कोटी रुपये प्रॉडक्शनवर तर सुमारे ३० कोटी रुपये प्रिंट आणि जाहिरात यावर खर्च झाले आहेत.

## ‘ब्रेक’ घेण्यास कारण की...

दमदार अभिनयामुळे प्रेक्षकांमध्ये आपली वेगळी ओळख निर्माण केलेले विजय वर्मा काही काळापूर्वीपर्यंत नियमितपणे नवनवीन प्रकल्पांमध्ये दिसत होते. मात्र गेल्या काही महिन्यात ते पडद्यापासून लांब राहिले होते. एका नवीन प्रकल्पाच्या निमित्ताने पुन्हा सक्रिय होताना विजय यांनी या



मध्यंतराविषयीचे कारण स्पष्ट केले आहे. विजय यांनी स्पष्ट केले की त्यांचा ब्रेक हा पूर्णपणे वैयक्तिक कारणांमुळे होता. त्यांनी जवळपास कोणताही संवादमाध्यमाशी संवाद साधला नव्हता. परंतु तरीही त्यांच्याबद्दल निरंतर बातम्या निर्माण होत राहिल्या. विजय म्हणतात, मला शांतता आवडते, पण ती शक्यच नव्हती. मी आयसी-८१४ नंतर कधीही प्रेसशी संवाद साधलेला नाही. एकही मुलाखत दिली नाही, तरीही रोज माझ्याबद्दल चर्चा होत होती. हे काहीही माझ्या नियंत्रणात नव्हते. दररोज एखादा निर्णय, एखादी गोष्ट जीवन अधिक कठीण करत होती. त्यामुळे मला काही काळ एकांत हवा होता, असे विजय यांनी सांगितले. पुढे बोलताना विजय म्हणाले की, सार्वजनिक नातेसंबंध चर्चेत असल्यामुळे निर्माण होणारे दुष्परिणाम म्हणजे प्रेक्षकांचे किंवा माध्यमांचे लक्ष मुख्य कामापासून हटणे. हा एक स्वाभाविक बायप्रॉडक्टच आहे. पण आता मी पुन्हा सक्रिय झालो आहे. मागील वर्षी तमन्ना भाटिया आणि विजय वर्मा यांचे नाते सातत्याने चर्चिले जात होते. पण यंदाच्या मार्चमध्ये त्यांच्या ब्रेकअपच्या बातम्या सामोर आल्या.

## ॲक्शनपटांचे ‘सप्तरंग’

**रणवीर सिंहच्या ‘धुरंधर’ची सध्या प्रेक्षकांमध्ये चर्चा सुरू आहे; पण यानंतर आता प्रेक्षकांच्या नजरा येणाऱ्या काळात प्रदर्शित होणाऱ्या ॲक्शन चित्रपटांकडे लागून राहिल्या आहेत. यामध्ये प्रामुख्याने सात चित्रपटांचा समावेश असून, त्यामधील दोन प्रकल्प हॉलिवूडमधील आहेत.**

**अवतार : फायर ॲण्ड ॲशेस**




दृश्यवैभव आणि आश्चर्यचकित करणारे व्हीएफएक्स यांचा संगम असलेल्या ‘अवतार’चा नवीन भाग १९ डिसेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. आधीचे दोन्ही भाग जगभरात सुपरहिट ठरले असल्याने या सिक्वेलकडूनही प्रेक्षकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत.


**ॲनाकोन्डा :** ॲक्शन दृश्यांना थराराची जोड लाभली तर सिनेमाचा प्रभाव वेगळ्याच पातळीवर जातो. ‘ॲनाकोन्डा’ ही अशीच एक थ्रिलर-ॲक्शन कथा असून २५ डिसेंबर २०२५ रोजी हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.




**द राजा साब :** संजय दत्त आणि प्रभास या दोन दमदार व्यक्तिमत्त्वांनी सजलेला ‘द राजा साब’ टीझर प्रदर्शित झाल्यापासूनच चर्चेत राहिला आहे. ९ जानेवारी २०२६ रोजी हा चित्रपट मोठ्या पडद्यावर येणार असून, त्यातील ॲक्शन आणि स्टार पॉवरमुळे हा प्रकल्प विशेष मानला जात आहे.




**इक्कीस :** ‘इक्कीस’ ही कथा ॲक्शनप्रेमी प्रेक्षकांसाठी एक वेगळा अनुभव ठरणार आहे. हा चित्रपट विशेष चर्चेत असण्याचे कारण म्हणजे यामध्ये दिग्गज कलावंत धर्मेंद्र यांची अंतिम भूमिका पाहायला मिळणार आहे. त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता अधिक वाढली आहे.



**जन नयगन :** दक्षिणेतील सुपरस्टार विजय यांच्या ‘जन नयगन’ मध्येही ॲक्शनचा पुरेपूर आविष्कार पाहायला मिळेल. हा चित्रपट ९ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होत आहे आणि तमिळ चित्रपटसृष्टीत त्याची मोठी चर्चा सुरू आहे.




**बॉर्डर-२ :** भारतातील युद्धपटांपैकी एक लोकप्रिय ठरलेल्या ‘बॉर्डर’च्या दुसऱ्या भागाची प्रतीक्षा वर्षानुवर्षे सुरू होती. आता ती संपली असून, २३ जानेवारी २०२६ रोजी ‘बॉर्डर–२’ प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. पहिल्या भागाच्या ऐतिहासिक यशामुळे या सिक्वेलबाबत कमालीची उत्सुकता दिसून येत आहे.



# जलसंधारण विभागातील प्रकल्पांबाबत प्राप्त तक्रारींची विशेष तपास पथकामार्फत चौकशी

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

■ नागपूर

**जलसंधारण** विभागांतर्गत राज्यात विविध प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या प्रकल्पांमधील काही प्रकल्पांबाबत तक्रार प्राप्त झाल्यानुसार या प्रकरणाशी संबंधित विभागातील अधिकारी सुनील कुशिरे यांची वाल्मी या संस्थेत बदली करण्यात आली असून २००८ ते २०१४ या कालावधीतील प्रकल्पांची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत चौकशी सुरू असल्याची माहिती जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी विधान परिषदेत दिली. यासंदर्भात विधान परिषद सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्यात येईल आणि त्याचा अहवाल दोन महिन्यात सादर केला जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

सदस्य ड. अनिल परब यांनी या संदर्भातील प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेत सदस्य सर्वश्री सतेज पाटील, शशिकांत शिंदे आदींनी सहभाग घेतला. या बाबत अधिक माहिती देताना जलसंधारण मंत्री संजय राठोड म्हणाले, मे. वॉटरफ्रंट कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने निविदा भरताना वाहनाची खोटी शपथपत्रे व इतर बनावट कागदपत्रे, आरसी बुक दाखल केलेली होती. विभागामार्फत रत्नागिरी शहर पोलिस स्टेशन मध्ये फिर्याद दिली होती. सद्यस्थितीत पोलीस तपासाअंती कोर्टात चार्जशिट दाखल करण्यात आले आहे.

# संसदीय अभ्यासवर्गातून लोकशाहीची प्रक्रिया समजून घेण्याची संधी

**५१ व्या संसदीय अभ्यासवर्गाचे उद्‌घाटन**

■ नागपूर

**भारतरत्न** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाची रचना केली. या संविधानात नागरिकांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा पूर्ण करता येईल, अशी व्यवस्था केली. अनेक आव्हानांचा सामना करत आपली लोकशाही, संविधानिक संस्था प्रगल्भ झाल्या. संसदीय लोकशाहीची अतिशय सुंदर अशी रचना देखील संविधानाने केली आहे. संसदीय अभ्यासवर्गातून लोकशाहीची प्रक्रिया समजून घेण्याची संधी मिळते, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवन येथे ५१ व्या संसदीय अभ्यासवर्गाचे मुख्यमंत्र्यांच्याहस्ते उद्घाटन झाले. त्यावेळी ते बोलत होते. विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, संसदीय कामकाज मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री तथा राष्ट्रकुल संसदीय मंडळाचे कोषाध्यक्ष ड.आशिष शेलार, विधानमंडळ सचिव मेघना तळेकर आदी उपस्थित होते.

# गुटखा बंदीसाठी कायदा अधिक कठोर करणार

■ नागपूर

**गुटखा** विक्री करणाऱ्यांवर मकोका लागू करण्याचा प्रस्ताव विधी व न्याय विभागाकडे पाठवण्यात आला होता; कायद्यातील तरतुदींनुसार हार्म आणि हर्ट या दोन्ही घटकांअभावी तो लागू होत नाही. त्यामुळे या कायद्यात बदल करण्यात येऊन गुटखा व्यवसाय करणाऱ्यांवरही मकोका लागू करता येईल, अशा आवश्यक दुरुस्त्या कायद्यात करण्यात येऊन हा कायदा अधिक कठोर करण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली.

विधानसभा सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, अस्लम शेख, अभिमन्यू पवार, रईस शेख, अमीन पटेल यांनी शाळा, महाविद्यालय परिसरात अवैध गुटखा, विक्री व वहन संदर्भात प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नास उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. राज्यात गुटखा बंदी आहे.गुटखा विक्री व वहन संदर्भात राज्यभरात पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर कारवाई केली असून विविध जिल्ह्यांमध्ये एकूण शेकडो गुन्हे दाखल करण्यात आले आहे. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर मोहीम राबवली आहे. यात नवी मुंबईत १,१४४, अहिल्यानगर येथे १८५, जालना ९०, अकोला ३५, नाशिक १३१, चंद्रपूर २३०, सोलापूर १०८, बुलढाणा ६६४ तसेच नागपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांत १,७०६ गुन्हे नोंदवण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. शाळा किंवा महाविद्यालयाच्या १०० मीटर परिसरात गुटखा विक्रीचे प्रकार आढळल्यास त्या परिसरातील टपऱ्या किंवा दुकानांवर संयुक्त कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले आहेत.




राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक शरद पवार १२ डिसेंबर रोजी वयाची ८५ वर्षे पूर्ण करीत आहेत. त्यानिमित्त गुरूकुल कला शाळेतील शिक्षकांनी त्यांना अनोख्या शुभेच्छा दिल्या. (छाया-दीपक साळवी)

# शासकीय कार्यालयांत यूडीआयडी कार्ड सक्ती बोगस प्रमाणपत्रधारकांवर कडक कारवाई सुरू

**मंत्री अतुल सावे**

■ नागपूर

**राज्यातील** सर्व शासकीय कार्यालये व विभागांमध्ये युनिक डिसॅबिलिटी आयडी (यूडीआयडी) कार्ड सादर करणे ९ ऑक्टोबर २०२५ पासून सक्तीचे करण्यात आले असून, याबाबतचा शासन निर्णय सर्व विभागांना कळविण्यात आला आहे. आरक्षण, पदोन्नती, विविध शासकीय सवलती यासाठी यूडीआयडी कार्ड अनिवार्य असून, जानेवारी २०२६ अखेरपर्यंत सर्व शासकीय कार्यालयांना कागदपत्रांची पडताळणी सादर करणे आवश्यक असल्याची माहिती इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

विधानसभा सदस्य बापू पठारे, बबनराव लोणीकर, सुनील प्रभू, विजय वडेट्टीवार, विक्रम पाचपुते, हेमंत उगले यांनी बनावट दिव्यांग प्रमाणपत्र संदर्भात प्रश्न उपस्थित केला, या प्रश्नास उत्तर देताना ते बोलत होते. राज्यात काही ठिकाणी बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांचे प्रकार आढळल्याने त्यावर मोठी कारवाई सुरू आहे. सातारा जिल्ह्यात ५९८ पैकी ७८ जण, पुण्यात ४२८ मधील ४६ जण, लातूरमध्ये २६ जण तर यवतमाळमध्ये २१ कर्मचारी निलंबित करण्यात आले आहेत. नंदुरबारमध्येही दोन कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली आहे. सर्व प्रकरणे संबंधित महसूल, सार्वजनिक बांधकाम तसेच इतर नियुक्ती करणाऱ्या विभागांकडे पाठविण्यात आली असून, तीन महिन्यात कारवाई करणे बंधनकारक करण्यात आले आहे. बोगस दिव्यांग प्रमाणपत्र देणाऱ्या व्यक्तींवर दिव्यांग अधिनियम २०१६ च्या कलम ९१ नुसार दोन वर्षांच्या शिक्षेची तरतूद आहे. शासकीय रुग्णालयांनी दिव्यांग प्रमाणपत्र तपासणीसाठी आठवड्यात किमान दोन दिवस उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचनाही शासनाने दिल्या असल्याचे मंत्री सावे यांनी सांगितले.

# छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल येथे भव्य पुतळा उभारणार

■ नागपूर

**छत्रपती** शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा बसविण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. लोकसभेतील एका लेखी उत्तरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या प्रस्तावाला नकार दर्शविल्याचा उल्लेख काही सदस्यांनी केला होता. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे उत्तर जुना आराखडा लक्षात घेऊन लोकसभेत देण्यात आल्याचे स्पष्ट केले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक हे आपले अभिमानाचे स्थान आहे. याठिकाणी पुतळा उभारण्याची मागणी पूर्वीही करण्यात आली होती.

# महिला व बाल सुधारगृह आणि महिला वसतिगृहातून पलायनाचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न

**महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे**

■ नागपूर

**महिला** व बाल सुधारगृहातून मुली, महिला पळून जाऊ नयेत यासाठी शासन संवेदनशीलपणे काम करत आहे. यासाठी आवश्यक उपाय योजना करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे. याचबरोबर महिला व बाल सुधारगृहातून पळून जाण्याचे प्रमाण कमी करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू असल्याची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधान परिषदेत दिली. सदस्य श्रीमती चित्रा वाघ यांनी राज्यातील महिला व बाल सुधारगृहाच्या सुरक्षा व व्यवस्थापनातील त्रुटींमुळे मुलींनी पलायन केल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. मंत्री श्रीमती तटकरे यांनी सांगितले, महिला व बाल सुधारगृहात तसेच महिला वसतिगृहात असणाऱ्या महिला व बालकांच्या सुरक्षेला अधिक प्राधान्य दिले आहे.

सध्या बाल सुधारगृहातून मुलांचे पलायनाचे प्रमाण ०.२९ टक्के तर महिलांचे तीन टक्के इतके आहे. बाल सुधारगृहातून पलायनाचे प्रमाण शून्य टक्के पर्यंत आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत. यासाठी बाह्ययंत्रणेद्वारे भरलेल्या कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देण्याचे निर्देश देण्यात आले आहे. जी पदे भरण्याची प्रक्रिया प्रलंबित आहेत त्यांची भरती एक महिन्यात करण्याबाबत कार्यवाही केली जाईल. उल्हासनगर येथील शांती सदन वसतिगृहातील घटनेसंदर्भात अधिक माहिती देताना मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले, उल्हासनगर येथील शांती सदन वसतिगृहात घटना घडली त्या दिवशी एकूण १२ महिला प्रवेशित होत्या. त्यापैकी तीन बांगला देशातील, एक बिहार, एक गुजरात, एक पश्चिम बंगाल तसेच सहा महिला महाराष्ट्रातील होत्या. वसतिगृहाची क्षमता १०० असली तरी त्यावेळी केवळ २१ महिला तिथे राहत होत्या.

सुरक्षा व्यवस्थेत एक सुरक्षा रक्षक आणि एक महिला पोलीस कर्मचारी तैनात होते. एफआयआरनुसार प्रवेशित महिलांनी दोन्ही सुरक्षा कर्मचारी यांना मारहाण करून लॉक करून सहा फूट उंच भिंत ओलांडून पलायन केले. ही संपूर्ण घटना सीसीटीव्हीत दिसत आहे.


# फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी सखोल चौकशी

■ नागपूर

**सातारा** जिल्ह्यातील फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या ही दुर्दैवी घटना आहे .या प्रकरणी चौकशीसाठी निवृत्त न्यायाधिशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. राज्यातील महिलांच्या सुरक्षेसाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत सांगितले.

सदस्य अमित साटम यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, फलटण येथील महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी ज्या-ज्या संबंधितांची नावे समोर आली त्यांची चौकशी करण्यात आली आहे. महिलेच्या सुसाईड नोटचे अक्षर हे त्या महिलेचे असल्याचे समोर आले आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींनी संबंधित महिला डॉक्टरचे शोषण व फसवणूक केल्याचे तपासात समोर आले आहे. या विषयी गुन्हा दाखल झाला असून गुन्हेगारांना अनफिट प्रमाणपत्र दिल्याचे प्रकरण होते. हे प्रकरण पाच महिन्यापूर्वीचे असून आत्महत्येविषयी आरोपींनी केलेली फसवणूक हे महत्वाचे कारण समोर आले आहे. तसेच आत्महत्येपूर्वी महिलेला भेटण्यास कोण कोण आले याचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. कोरेगाव पार्क, पुणे येथील विद्यार्थिनी आत्महत्या प्रकरणी ही सखोल चौकशी करण्यात येईल. केंद्र सरकारच्या नवीन तीन कायद्यामध्ये शक्ती कायद्यातील अनेक तरतुदींचा समावेश आहे. काही तरतुदी सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करतात. या सर्व गोष्टीचा अभ्यास करून ज्या तरतुदी करावयाच्या आहेत या विषयी काम सुरू असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. राज्यात संजय गांधी निराधार योजनेचा निधी रोखला नाही. या योजनेचा निधी डीबीटीद्वारे देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. या वेळी सदस्य विजय वडेट्टीवार, प्रकाश सोळंके, ज्योती गायकवाड, सुनील प्रभु, नाना पटोले यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला.

# नवाकाळ शब्दकोडे-१४५६



**आडवे शब्द –**

२. इच्छा बाळगणारा ५. उपयोगी पडणे ९. विधिवत कोनशिला बसवण्याचा कार्यक्रम १०. सीतेने ही रेघ ओलांडल्यावर रावणाने तिचे अपहरण केले १२. भुईसपाट १३. पॉपकॉर्नचे पूर्वरूप १४. त्वचेवर लावण्याचे औषध १६. वर्तुळ, रिंगण १७. सिंह, पंचानन १९. थंडी, शैत्य २२. अंकुर २३. राणा प्रतापचा घोडा २५. भाषण देणारा २६. न समजणारे, दुर्बोध २९. अप्रिय ३०. एक आंबट पालेभाजी ३२. निर्लज्ज ३३. रात्रीचा पाऊस ३५. बगळ्यांची माळ ३७. भूमी, मुलींचे एक नाव ३८. लक्षावधी ४०. नवी पालवी, तारुण्याचा बहर ४२. हेळसांड, दुर्लक्ष ४४. लुच्चा, ठक ४६. एक हजार किलोग्राम ४७. घोड्याची पागा ४९. स्वच्छता ५२. मातीचे पात्र, मुंबईचे एक उपनगर ५७. उंची दर्जाचे ५८. सहावी तिथी ५९. राई, सरसू ६०. दुधाचा घट्ट पदार्थ ६१. पुष्कळ, बक्कळ ६३. निशा, यामिनी ६५. देवांचा राजा, इंद्र ६६. फिरणे ६७. सूर्य ६९. अणुस्फोटासाठी लागणारा महत्त्वाचा घटक ७०. वृक्ष, झाड ७१. कष्ट ७२. टोमणा ७५. खडे सैन्य ७७. करमणूक करणारे ७८. खेप ८०. गाढव ८२. प्रतिष्ठित, संभावित ८४. ढोल, रणभेरी ८६. या लेखणीने लिहिलेला मजकूर रबराने खोडता येतो. ८७. भिक्षा ८८. लगामाची दोरी ९०. चंद्र ९१. खास पाहुणचार ९२. पुन्हा पुन्हा ९४. एक चतुर्थांश ९६. कौरव-पांडवांनी खेळलेला जुगार ९७. ज्वर, त्रास ९८. थंड, गार ९९. अतिशय स्थूल स्त्री १००. कैक

**उभे शब्द –**

१. कलाकृती निर्माण करणारा २. व्यक्ती ३. लेखणी ४. ओंकार ५. भगवे वस्त्र ६. इथपर्यंत ७. सदरा, शर्ट ८. नेहमी, नित्य ९. फाल्गुन महिन्यातला सण ११. विपुलता १२. थोडासा १५. उद्दिष्ट १८. अननुभवी, शिकाऊ २०. मोठा पतंग, अफवा २१. मनोरा २२. देवालय, मंदिर २३. जादूटोणा २४. कोणत्याही एकाच रंगाची गाय २६. उल्का २७. लक्ष्मी २८. उन्हाळ्यात काही झाडांपासून मिळणारे शीतपेय २९. सोन्या-चांदीची जर किंवा बारीक तार ३१. बोलाचाली, शाब्दिक भांडण ३२. मूर्ख ३४. जोराचा वारा, वादळ ३६. नमुना ३९. चिमणीचे घरटे ४१. दत्ताची मुखे ४३. फेट्याचा प्रकार ४५. चारचाकी दणकट वाहन ४८. चारी बाजूंना पाणी असलेली जमीन, द्वीप ४९. सगळी ५०. मैत्री ५१. किंचित, अल्प ५३. शान, वैभव ५४. कौतुक, स्तुती ५५. भारतीय सैनिक ५६. काडेपेटी ५७. हमाल ५९. संदिग्ध ६०. प्रयत्न ६२. घेतलेले रीतसर परत करणे, कर्ज फेडणे ६३. राज्यसुख ६४. फणसातले खाद्यभाग ६५. मेलेला ६६. प्रमाणबद्ध शरीरयष्टी ६८. वर्ष, साल ६९. शक्कल ७१. आमंत्रितांना दिलेला खाना, पार्टी ७३. संताप, चीड ७४. पत, इभ्रत ७६. सोनचाफा ७९. दाटी, गर्दी ८०. एक देशी अत्तर, वाळा ८१. घोड्यावरून मारलेली फेरी ८२. अर्थात ८३. जडजवाहीर, अलंकार ८५. शोभेची कमान, अर्धवर्तुळाकार सजावट ८६. याचे शंभर अपराध भरल्यावर श्रीकृष्णाने याचा वध केला ८८. वखवखलेला, अतृप्त ८९. विस्मय, आश्चर्य ९३. आवेश, आव ९४. हाडांच्या पोकळीतील द्राव ९५. उजेड, प्रकाश •

**नवाकाळ कोडे क्रमांक १४५५ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. जंगी २. चादर ४. सभासद ७. काळोख ९. भांग १०. भारूड ११. अही १२. चिडीचूप १४. जंबूक १६. पेकाट १८. हस्तक २०. दरड २१. दगड २२. कपोलकल्पित २३. थिल्लर २४. खंडा २५. शाप २७. बनेल २९. वाळवी ३१. छापखाना ३५. पालक ३६. बाजा ३७. रांग ३९. पडळ ४०. रामनगरी ४३. जावळ ४५. सुगरण ४६. गाणे ४७. मयत ४८. पितर ५०. नाम ५१. लेखणी ५२. दवाखाना ५४. मालामाल ५५. मद्य ५६. मेखला ५७. भिंग ५८. रकमाला ५९. शिसा ६०. सहनशील ६२. दर्या ६३. वामन ६५. लाफा ६७. तरंग ६९. पाणिग्रहण ७१. रस्सा ७२. चिनी माती ७४. बाण ७५. साधक ७७. शक ७८. शिकस्त ७९. वद्य ८०. धुमारा ८१. परत ८२. समूह ८३. ताठा ८४. सोपान ८६. विरस ८८. वैरी ९०. जबाबदारी ९३. मावशी ९५. फस्त करणे ९८. अद्दल घडवणे ९९. कालहरण

**उभे शब्द :** १. जंग जंग पछाडणे २. चारू ३. दडपे पोहे ४. सही ५. समस्त ६. दिंडीदरवाजा ७. कापड ८. खडखडाट १०. भाक ११. अटकळ १३. चूर १५. बूड १७. काल १८. हतबल १९. कथिल २१. दशा २६. शिखा २८. नेकजात ३०. वीरांगना ३२. पळ ३३. नारायणी ३४. म्यान ३५. पारी ३६. बाळ ३८. गरम मसाला ३९. पगार ४१. मत ४२. गडवा ४४. वरमाला ४७. मखलाशी ४८. पिनाकपाणि ४९. रमारम ५१. लेखन ५२. दगदग ५३. खार ५६. मेहलनी ६१. लत ६३. वाणसामान ६४. नरक ६६. फारकत ६८. रंगकर्मी ६९. पाणवठा ७०. ग्रह ७२. चित्रा ७३. मागमूस ७६. धरा ७७. शरमिंदा ८०. धुपाटणे ८२. सरहद्द ८३. तारीफ ८५. आंबा ८७. सवड ८९. शोक ९०. जहाल ९१. बटर ९२. रीम ९३. माघ ९४. शीव ९६. स्तब्ध ९७. रमी

## १० कंत्राटदारांना फुकट खैरात

पान १ वरून

रक्कम कंत्राटदार अधिकार्याला देताना दिसतो. हे फक्त एका कंत्राटदारांकडून घेतल्याचे उघड झाले आहे. परंतु अशा अनेक कंत्राटदारांकडून हे पैसे घेतले जातात. त्यात कार्यकारी अभियंत्यांचा हिस्सा वेगळा आहे. माझ्याकडे उपअभियंत्यापासून सगळ्यांचे व्हिडिओ आहेत. सार्वजनिक बांधकाम खात्यात भ्रष्टाचाराची पातळी भयावह वाढली आहे. याआधी कामाची फिक्स रक्कम असायची. त्यातून टक्केवारी घेतली जात होती. मात्र आता शासनाकडून पैसे आणायचे पैसे वेगळे , वर्क ऑर्डरचे पैसे वेगळे घेतात . त्यानंतर विभागाकडून काम पूर्ण झाल्यावर जे बिल निघते त्याचेही वेगळे पैसे मागितले जातात, असे कंत्राटदाराने सांगितले. हा भ्रष्टाचार उघडपणे सुरू आहे. या व्हिडिओत अधिकारी म्हणतो की वरच्यांना पैसे द्यायचे आहेत. हे वरचे कोण याचा शोध घ्यायला हवा .



ते पुढे म्हणाले की, शासनाकडून १ कोटी निधी आला तर त्यातून सर्वांची बिले भागवली जात नाहीत. त्यात कंत्राटदारांची बोली लागते. माझे बिल पेमेंट करा, तुम्हाला एवढी रक्कम देईन अशा प्रकारे कंत्राटदारांची बिलांसाठी बोली लावली जाते. अनेक कंत्राटदारांना कामे न करताच बिलाचे पैसे दिले जातात. ज्या कंत्राटदारांनी काही काम केले नाही, अशांची बोली जास्त लागते. कारण त्यांनी कामच केलेले नसते. जवळजवळ दहा कंत्राटदारांची मिळून एकूण पाच कोटींची रक्कम वाटप झाली आहे. त्यातील पसाळकर इन्फ्रा यांचे एकूण बिल ४४ लाख २१ हजार १३५ रूपये होते, त्यांना ४१ लाख १२ हजार ३६३ रुपयांचा चेक दिला आहे. आदर्श विजय निकम यांचे बिल २२ लाख ७५ हजार ६ रुपये होते, त्यांना २१ लाख २० हजार ७० रुपयांचा चेक दिला आहे. साई प्रसाद एंटरप्राइजेस यांचे एकूण बिल २२ लाख ६३ हजार ३५० रुपये होते, त्यांना २१ लाख ६४ हजार ९६ रुपयांचा चेक दिला आहे. असे दहा कंत्राटदार आहेत. हा व्हिडिओ मला एका कंत्राटदारानेच दिला आहे. त्यावर मी त्याला विचारले की, यात तुझे नुकसान होणार नाही का? त्यावर त्याने उत्तर दिले की, आम्ही मेलेली कोबंडी आहोत. सगळीकडून पैसे खाल्ले जात आहेत. आम्ही आता आगीला भीत नाही.

देशपांडे म्हणाले की, आधी लोकांना कोपऱ्यात नेऊन पैसे घ्यायचे, आता ऑफिसच्या ड्रॉवरमध्ये पैसे ठेवले जातात. पीडब्ल्यूडी विभाग भ्रष्टाचाराचा अड्डा बनले आहे. अनेक कंत्राटदारांनी सांगितले की, २० टक्के कार्यकारी अभियंता मागतो. जो जास्त बोली लावतो, त्याचे पेमेंट होते, बाकींच्याचे पेमेंट होत नाही. प्रत्यक्षात काम होत नाही,फक्त कागदावर योजना असतात. आजचा व्हिडिओ वरळी आणि हाफकिन इन्स्टिट्यूटच्या सार्वजनिक बांधकाम शाखेचा आहे. किती निर्लज्जपणे आणि उघडपणे पैसे घेतले जात आहेत, याचे हे उदाहरण आहे. यात अभियंता विनोद धुमाळ हा अभियंता पैसे गोळा करत आहे. त्यात कुणाकुणाचे वाटे आहेत, निधी वाटप करण्यात कुणाचा सहभाग आहे, कोण कोण अधिकारी, मंत्री आणि आमदार हा निधी मंजूर करण्यासाठी सहभागी आहेत याची चौकशी झाली पाहिजे. हा एक व्हिडिओ आज पोस्ट केला, उद्या दुसरा करू, परवा तिसरा करू. जोपर्यंत शासन या प्रकाराची दखल घेत नाही आणि आरोपांना उत्तर देत नाही तोवर आम्ही ही प्रकरणे बाहेर काढत राहू आणि सरकारला जाब विचारू.

या आरोपामुळे खळबळ उडाल्यावर सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले की, देशपांडे यांनी केलेले आरोप गंभीर आहेत. ज्युनिअर इंजिनियर असो किंवा या प्रकरणात जो कोणी सहभागी असेल, त्यांच्यावर १०० टक्के कारवाई करण्यात येईल. त्याला कुणाचे पाठबळ असेल तरी त्याची माहितीही आम्ही घेत आहोत. याबाबत अधिकाऱ्यांना तत्काळ तपास सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र आजच्या अधिवेशनात याची चर्चाही झाली नाही.

## आमदार महेंद्र दळवींकडे नोटांची बंडले

पान १ वरून

किंवा त्यांच्यावर आरोप करण्यासाठी हा व्हिडिओ पोस्ट केलेला नाही. परंतु ५० खोके एकदम ओके असे म्हटल्यावर काही लोकांना राग येत होता. त्यामुळे खोक्यांचे राजकारण सुरू आहे, हे दाखवण्यासाठी हा व्हिडिओ पोस्ट केला. कोणाशी माझे व्यक्तिगत शत्रुत्व नाही. आत्ताचे सत्ताधारी पक्षाचे लोक कशा पद्धतीने जनतेची लूटमार करतात, एवढेच मला दाखवायचे आहे . मी कुणाचा राजीनामा मागितलेला नाही. मला त्या विषयाशी काही देणेघेणेपण नाही. पण या सरकारकडे फक्त शेतकरी कर्जमाफीला पैसा नाही. बाकी सगळे ओक्के आहे!

हा व्हिडिओ राजकीय शत्रुत्वातून अजित पवार गट राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनीच पुरवला असल्याचा आरोप दानवे यांनी फेटाळून लावला. ते म्हणाले की, तटकरे आणि माझे मागील वर्षभरात कधी बोलणे झालेले नाही. मला व्हिडिओ कुठून मिळाला हे सांगण्याची आवश्यकता नाही. संजय शिरसाट यांचादेखील व्हिडिओ असाच व्हायरल झाला होता. त्यांचाही घरातीलच व्हिडिओ होता. मात्र त्यांच्यावर कोणतीही कारवाई केली नाही. आता महेंद्र दळवींवर कारवाई होईल, अशी अपेक्षा आहे.



दानवे यांच्या आरोपावर आमदार महेंद्र दळवी यांनी स्पष्टीकरण दिले. ते म्हणाले की, अंबादास दानवे किती खरे बोलतात किती खोट बोलतात हे त्यांच्या प्रतिक्रियेतून दिसते. वरिष्ठ नेत्याला हे शोभनीय नाही. दानवे यांचा बोलवता धनी वेगळा आहे. दानवेंनी तो व्हिडिओ नीट दाखवावा. मी व्हिडीओत असेन तर मी आमदारकीचा राजीनामा देईन. ब्लॅकमेल करणे हा अंबादास दानवेंचा धंदा आहे. त्यांच्याकडे कोणतेच काम नाही, पद नाही, पक्षात त्यांना कोणी कुत्रे विचारत नाही. या व्हिडिओशी माझा काहीही संबंध नाही. अंबादास दानवे यांनी तो व्हिडिओ समोरच्या व्यक्तीच्या चेहऱ्यासकट दाखवावा. त्यांनी व्हिडिओ कट करून दाखवू नये. मला व्हिडिओबद्दल काहीही माहिती नाही. दानवे यांनी पुरावे देऊन, हा व्हिडिओ माझाच आहे, हे सिद्ध करून दाखवावे. दानवेंनी व्हिडीओ मॉर्फ केला आहे. दानवेंना कोणी सुपारी दिली हे सांगावे. दानवे सुपारीबाज नेता आहे. रायगडमध्ये शिंदे गटाचे वेगळे प्रस्थ आहे. त्यामुळे इकडच्या बड्या नेत्याने आम्हाला बदनाम करण्यासाठी सुपारी दिली. शिंदेसेनेचे रायगड जिल्ह्यातील आणखी एक महेंद्र थोरवे यांनी दळवींचा व्हिडीओ व्हायरल होण्यात सुनील तटकरे यांचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला. ते म्हणाले मला विश्वास आहे की, महेंद्र दळवी असे काही करणार नाहीत. अंबादास दानवे यांनी जाणीवपूर्वक अधिवेशनच्या काळात हा व्हिडिओ व्हायरल केला. रायगडमध्ये ज्या प्रकारचे राजकारण सुरू आहे त्याच्याशी या सगळ्याचा संबंध असावा. सुनील तटकरे हे रायगड जिल्ह्यातील शिंदे सेनेच्या आमदारांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न सातत्याने करतात. ते कुटील नीतीचे राजकारण खेळतात. त्यामुळे सुनील तटकरे आणि अंबादास दानवे यांनी संगनमताने महेंद्र दळवी यांचा व्हिडिओ व्हायरल केला असावा. शिंदेसेनेचे मंत्री भरत गोगावले म्हणाले की, पोस्टमध्ये संपूर्ण चेहरा दाखवायला पाहिजे होता म्हणजे सर्व स्पष्ट झाले असते. भाजपा नेते व मंत्री नितेश राणेंनी यावरून उद्धव ठाकरेंवरच टीका केली. ते म्हणाले की, ठाकरेंच्या कार्यकर्त्यांनी कॅशच्या बाबतीमध्ये काही बोलूच नाही. कर्जतच्या फार्महाऊसवर सर्च ऑपरेशन केले की मग कशी पळापळ होईल ते बघा. उबाठा आमदार आदित्य ठाकरे यावर प्रतिक्रिया देताना म्हणाले की,अंबादास दानवे यांनी पोस्ट केलेला व्हिडिओ सर्वांनी पाहिला. सरकारकडे शेतकरी कर्जमाफीसाठी पैसे नाही. पण सत्ताधारी आमदार असे पैशाच्या बॅगा घेऊन फिरतात. यापूर्वीही असे व्हिडिओ आले होते अजूनही येतील. आता सर्व ठिकाणी हेच सुरू आहे. ते हेलिकॉप्टरमध्ये ज्या बॅगा घेऊन फिरतात आणि 'आनंदाच्या शिधा'चे वाटप सुरू आहे, ते पैसे कुणाचे आहेत? सायंकाळी उशिरा महेंद्र दळवी यांनी दावा केला की सुनील तटकरे लोकसभा अध्यक्ष झाले तेव्हा मी त्यांचे अभिनंदन करणारा माझा व्हिडिओ पोस्ट केला आहे. तो व्हिडीओ मॉर्फ करून हा व्हिडीओ तयार केला आहे. दळवी यांनी आज तो जुना व्हिडीओ पुन्हा पोस्ट केला. यानंतर या आरोप प्रत्यारोपांना कोणते वळण लागते याकडे सर्वांचे लक्ष आहे.

शिंदेंच्या शिवसेनेने या प्रकरणात ज्यांच्यावर आरोप केले, ते राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनीही यावर प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, महेंद्र थोरवे यांनी माझ्यावर बेजाबदारपणे केलेले आरोप आहेत. माझ्या ४० वर्षांच्या राजकीय जीवनात अनेकांशी राजकीय संघर्ष झाला. पण हा संघर्ष राजकीय विचारधारेवर होता. वैचारिक मतभेद असू शकतात. परंतु असे कृत्य करण्याचा विचार माझ्या मनात कधी आला नाही. अंबादास दानवे यांचा आणि माझा मागील १-२ वर्षांपासून भेट किंवा बोलणे नाही. त्यांच्याशी संबंधही नाही.

## सोनिया गांधी यांना कोर्टाची नोटीस

पान १ वरून

पुढील सुनावणी ६ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. त्रिपाठी यांनी याचिकेत म्हटले आहे की सोनिया गांधी यांचे नाव १९८० मध्ये नवी दिल्ली मतदारसंघाच्या मतदारयादीत समाविष्ट करण्यात आले होते. मात्र त्या एप्रिल १९८३ मध्येच भारताच्या नागरिक झाल्या. विशेष म्हणजे, त्यांचे नाव १९८२ मध्ये वगळण्यात आले. नंतर १९८३ मध्ये पुन्हा समाविष्ट करण्यात आले. न्यायाधीश चौरसिया यांनी ही याचिका फेटाळताना म्हटले होते की, याचिकाकर्त्याने मागणी केल्याप्रमाणे न्यायालय चौकशी करू शकत नाही. एखाद्या व्यक्तीच्या नागरिकत्वाशी संबंधित बाबी केंद्र सरकारच्या विशेष अधिकारक्षेत्रात आहेत आणि मतदारयादीत समाविष्ट करण्यासाठी किंवा वगळण्यासाठी एखाद्या व्यक्तीची पात्रता निश्चित करण्याचा अधिकार भारतीय निवडणूक आयोगाचा आहे. या प्रकरणाची चौकशी केल्याने संवैधानिक अधिकाऱ्यांना स्पष्टपणे सोपवलेल्या क्षेत्रात अनधिकृत अतिक्रमण होईल आणि ते भारतीय संविधानाच्या कलम ३२९ चे उल्लंघन ठरेल.

आजच्या सुनावणीत त्रिपाठी यांच्या वतीने युक्तिवाद करताना वरिष्ठ वकील नारंग यांनी आज न्यायालयाला सांगितले की, नागरिकत्व मिळवण्यापूर्वी सोनिया गांधी यांचे नाव नवी दिल्ली संसदीय मतदारसंघाच्या मतदारयादीत होते याचा अर्थ काही कागदपत्रे बनावट असावीत. त्रिपाठी याची चौकशी करण्यासाठी पोलिसांकडे गेले होते, परंतु त्यांनी एफआयआर नोंदवला नाही. मी आरोपपत्र दाखल करण्याचे म्हणत नाही, पण त्याबाबत चौकशी करण्याचा प्रयत्न करा. विशेष न्यायाधीश (पीसी कायदा) विशाल गोगणे यांनी या याचिकेवर वरिष्ठ वकील पवन नारंग यांनी सोनिया गांधी आणि दिल्ली पोलिसांना नोटीस पाठवण्याचे निर्देश दिले.

## तुकाराम मुंढेंचा मुद्दा सभागृहात गाजला

पान १ वरून

यांनी अधिकृत नियुक्ती नसताना नागपूर स्मार्ट सिटी प्रकल्पाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा प्रभार स्वतःकडे घेतला आणि आपल्या पसंतीच्या कंत्राटदारांना तब्बल २० कोटी रुपयांचे नियमबाह्य पेमेंट्स केले. तसेच महिला अधिकाऱ्यांना दमदाटी आणि १७ कर्मचाऱ्यांना विनाकारण निलंबित केले. हे प्रकरण सभागृहात उपस्थित केल्यानंतर मुंढे समर्थकांकडून त्यांना जीवे मारण्याची धमकी मिळाली असून आरोपीला तात्काळ अटक करावी आणि मुंढेंवर कारवाई करावी अशी त्यांनी मागणी केली.

दरम्यान, विजय वडेट्टीवार यांनी मुंढेंची बाजू घेत मुंढेवर स्वार्थासाठी आरोप लावले जात असल्याचा आरोप केला. चूक असेल तर कारवाई करा, पण अधिकारी निर्दोष असतील तर कोणत्याही दबावाखाली कारवाई होऊ नये, असे ते म्हणाले. या वादानंतर मंत्री गिरीश महाजन यांनी हस्तक्षेप करत सांगितले की मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून चौकशी होईल आणि योग्य ती कारवाई केली जाईल. मात्र आमदार असमाधानी राहिल्याने गोंधळ सुरूच राहिला आणि तालिका अध्यक्षांनी कामकाज १० मिनिटांसाठी तहकूब केले.

## सरकारी बँकांचे कर्ज बुडीत खाती

पान १ वरून

त्यांच्या वसुली कारवाईचा पाठपुरावा करत राहतात. ते म्हणाले की, आर्थिक वर्ष २०२२-२३ पासून सरकारने सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये कोणतेही भांडवल ओतलेले नाही. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी आर्थिक कामगिरी लक्षणीयरीत्या सुधारली आहे. त्यांना नफा झाला असून त्यांची भांडवली स्थिती मजबूत झाली. सार्वजनिक क्षेत्रातील बँका आता त्यांच्या भांडवली गरजा पूर्ण करण्यासाठी बाजारातील स्त्रोतांवर व अंतर्गत ठेवींवर अवलंबून आहेत. त्यांनी १ एप्रिल २०२२ पासून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत इक्विटी व बाँड्सद्वारे बाजारातून १.७९ लाख कोटी भांडवल उभारले आहे. १ एप्रिल २०२१ ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत गेल्या साडेचार वर्षांत सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये गमावलेल्या पैशांपैकी फक्त ६.७ टक्के रक्कम वसूल झाली. या कालावधीत सायबर फसवणुकीच्या प्रकरणांमध्ये फक्त २.३९ अब्ज रुपयांची वसुली झाली आहे, तर ३५.८८ अब्ज रुपयांचे नुकसान झाले आहे. गेल्या साडेचार वर्षांत नोंदवलेल्या ५८३,२९१ सायबर फसवणुकीच्या प्रकरणांपैकी ८० टक्क्यांपेक्षा जास्त इंटरनेट बँकिंग फसवणूक व ऑनलाइन क्रेडिट कार्ड घोटाळे आहेत.

## रोहित आर्या दहशतवादी नसताना त्याचे एन्काऊंटर का केले?

पान १ वरून - गोळी का मारली नाही? नेमकी त्याचवेळी एन्काऊंटर स्पेशलिस्ट पोलीस कसा काय तिथे उपलब्ध होता? असे प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केले. या प्रकरणी रोहित आर्या याने वारंवार आंदोलन केले,उपोषण करून पैसे मागितले होते, पण तत्कालीन मंत्री केसरकर यांनी पैसे थकवल्याने ही घटना घडली.या प्रकरणी माजी मंत्र्यांची चौकशी केली का? सरकारकडे पैसे प्रलंबित आहेत का? असा प्रश्न वडेट्टीवर यांनी उपस्थित केला. यावेळी उत्तर देताना मंत्र्यांनी या प्रकरणी चौकशी सुरू असून रोहित आर्यानि लहान मुलांना ओलीस धरले म्हणून पोलिसांनी स्वरक्षणासाठी कारवाई केल्याचे स्पष्ट केले. मानवी हक्क आयोगाने समिती नेमून चौकशी करायला सांगितले त्यानुसार चौकशी सुरू आहे. यातील संबंधितावर कारवाई होईल असे आश्वासन मंत्र्यांनी दिले.


पुणे महानगरपालिका

**पुणे महानगरपालिका, पुणे**

**निविदा प्रक्रिया कक्ष उद्यान विभाग**

**निविदा जाहिरात - नवीन कामे**

विक्री कालावधी दिनांक :- ०९/१२/२०२५ सकाळी ९.०० ते १६/१२/२०२५ दुपारी १२.३० पर्यंत

स्वीकृती दिनांक :- ०९/१२/२०२५ सकाळी ९.०० ते १६/१२/२०२५ दुपारी १२.३० पर्यंत तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक :- १७/१२/२०२५ दु. १२.३०

| निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रु. | अंदाजित पूर्व गणित रक्कम रु | बयाणा रक्कम रु. | कामाची मुदत (महिने) | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/ GARDEN /2025/258 | उद्यान | राजीव गांधी प्राणी संग्रहालय परिसरात विद्युत विषयक कामे करणे. | रु १३५९/- | रु २५४१३६३/- | रु २५४१४/- | ३ | स्वाती नरुटे ८१८०९४४२१८ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामाचे निविदा www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृत सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील

क) ऑनलाईन निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न. पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र.अतिमआ(वि.)/३२ दिनांक २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम इ.सी.एस/आर.टी.जी.एस/एन.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
**Parshuram Anil Bichukale**
टेंडर लिपिक
उद्यान
पुणे महानगरपालिका

सही/-
**Ashok Kedari (Prabhari)**
कार्यकारी अभियंता
उद्यान
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/१४५० दिनांक : ९/१२/२०२५

नवाकाळ

• पुणे | बुधवार १० डिसेंबर, २०२५ • पान -८

# आठव्या वेतन आयोगाची तारीख ठरलेली नाही

**लोकसभेत वित्त मंत्रालयाचे स्पष्टीकरण**

**नवी दिल्ली-** गेल्या काही महिन्यांपासून संपूर्ण देशभर आठव्या वेतन आयोगाची जोरदार चर्चा सुरू आहे. मात्र केंद्रीय मंत्रालयाने स्पष्ट केले आहे की, आठव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीबाबत सरकारने कोणताही निश्चित निर्णय घेतलेला नाही. मात्र या वेतन आयोगाच्या ज्या शिफारशींना सरकार मंजुरी देईल, त्या लागू करण्यासाठी अर्थसंकल्पात पुरेसा निधी उपलब्ध केला आहे. यापूर्वी प्रशासनिक स्तरावर आठवा वेतन आयोग १ जानेवारी २०२६ पासून लागू होणार अशी चर्चा होती. वित्त मंत्रालयानुसार, आठवा वेतन आयोग ३ नोव्हेंबर २०२५ रोजी अधिसूचित करण्यात आला. १८ महिन्यांत याचा अहवाल सादर होणार आहे. पण, कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता आणि निवृत्ती वेतन घेणाऱ्यांचा महागाई भत्ता मूळ वेतनात विलीन करण्याचा कोणताही प्रस्ताव सध्या विचाराधीन नसल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले आहे.



## – खंडणी-गुंडगिरीविरुद्ध लढणाऱ्या –

# सरपंच देशमुख हत्येला वर्ष पूर्ण

**संतोष** देशमुख हे केवळ सरपंच नव्हते. त्यांनी गावाच्या विकासासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले होते. तर गुंडगिरी, खंडणी वसुली आणि भ्रष्टाचाराला आव्हान दिले. हेच धाडस त्यांच्या जीवावर बेतले. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणारी त्यांची मुलगी वैभवी आणि तिचा धाकटा भाऊ विराजने पितृछत्र गमावले. देशमुख कुटुंबाने कर्ता पुरुष आणि मस्साजोग गावाने कर्तव्यनिष्ठ सरपंच गमावला. सरपंच देशमुख यांच्या हत्येनंतर त्यापूर्वी झालेली महादेव मुंडे हत्या आणि इतर गुंडांच्या दहशतीचे बीडचे भयाण वास्तव उघड झाले. या प्रकरणात मुख्य सूत्रधार म्हणून वाल्मिक कराड, सुदर्शन घुले,



सुधीर सांगळे, विष्णू चाटे, जयराम चाटे, महेश केदार, सिद्धार्थ सोनवणे आणि प्रतीक घुले, कृष्णा आंधळे यांचा आरोपी म्हणून समावेश आहे.

बीड जिल्ह्यात आवादा एनर्जीच्या पवनचक्की प्रकल्पाबाबत गुंडगिरी वाढत होती. आवादा कंपनीकडून दोन कोटी रुपयांची खंडणी मागण्यात आली. त्याला विरोध करण्याच्या वादातून ही हत्या झाल्याचा तपासात निष्कर्ष काढण्यात आला आहे. धनंजय मुंडेंचे निकटवर्ती आणि कट्टर समर्थक वाल्मिक कराडने विष्णू चाटेचा मोबाईल वापरून आवादा प्रकल्पाचे प्रकल्प व्यवस्थापक सुनील केंदू शिंदे यांच्याकडे दोन कोटी रुपयांची खंडणी मागितली होती. यातील १५ लाख रुपयांची रक्कम कंपनीने दिली होती. ६ डिसेंबर २०२४ रोजी खंडणी वसुलीसाठी कंपनीच्या सुरक्षा रक्षकावर हल्ला झाला. यावेळी सरपंच संतोष देशमुख यांनी मध्यस्थी करून हल्लेखोरांची हकालपट्टी केली. सुरक्षारक्षक मारहाण प्रकरणी स्थानिक पोलिसांकडे संतोष देशमुख यांनी तक्रार नोंदवण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्या तक्रारीची योग्य दखल घेतली नाही. मात्र आरोपींनी त्यांच्या वसुलीच्या कामात संतोष देशमुख यांनी हस्तक्षेप केल्याने त्यांना धमकी देण्यास सुरुवात केली.

९ डिसेंबरला सरपंच देशमुख आणि सहकारी शिवराज देशमुख केजहून मस्साजोगला परतत होते. त्यावेळी घडलेला घटनाक्रम शिवराज यांनी सांगितला. त्या दिवशी दुपारी अडीच वाजताच्या सुमारास मी संतोष देशमुख यांना केजमधे भेटलो. त्यानंतर दोघे केजमधून त्यांच्या गावाकडे परत येत होते. मी गाडी चालवत होतो, तर संतोष देशमुख शेजारी बसले होते. डोणगावच्या टोलनाक्यावर अचानक एका चारचाकी गाडीने आमच्या गाडीला अडवले. त्या गाडीतून ५-६ तरुण उतरले. आमच्या गाडीवर दगडफेक करू लागले. नंतर त्यांनी संतोष देशमुखांना गाडीतून खाली ओढून काठ्या, लोखंडी रॉड, कोयत्याने मारहाण केली. त्यांना लगेचच त्यांच्या गाडीत टाकून घेऊन गेले. या दगडफेकीत एक दगड गाडीत माझ्या सीटवर पडला. तो काढून गाडीबाहेर येईपर्यंत अपहरणकर्ते सरपंच संतोष देशमुखांना घेऊन गेले होते. या मारहाण करणाऱ्या तरुणांमध्ये सुदर्शन घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, प्रतीक घुले हे ओळखीचे चेहरे होते. मी हा सर्व प्रकार संतोष यांचे बंधू धनंजय देशमुख यांना फोन करून सांगितला. घटनेची माहिती मिळताच धनंजय देशमुख यांनी मला लवकर केज पोलीस ठाण्याला पोहोचायला सांगितले. त्यानंतर साधारणतः १० ते १५ मिनिटांत मी पोलीस ठाण्याला पोहोचलो. यानंतर अपहरणाच्या जवळपास तीन तासांनंतर संतोष देशमुख यांच्या मृत्यूची बातमी त्यांना पोलिसांकडूनच मिळाली.

१० डिसेंबरला त्यांचा मृतदेह दैठना फाटा, नांदूर रोड येथे सापडला. संतप्त ग्रामस्थ आणि त्यांच्या कुटुंबाने या प्रकरणातील दोषींना अटक करण्याची मागणी केली. त्यासाठी त्यांनी सुमारे १२ तास अहमदपूर-अहमदनगर राष्ट्रीय महामार्गावर आंदोलन केले. त्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांच्या मध्यस्थीने आंदोलकांनी माघार घेतली. त्याच दिवशी जयराम चाटे आणि महेश

### कृष्णा आंधळे अजूनही फरार

**९ डिसेंबर २०२४ या दिवसाची नोंद बीड जिल्ह्याच्या इतिहासात काळ्या अक्षरात झाली. केज तालुक्यातील मस्साजोगसारख्या लहान गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येने संपूर्ण राज्याला हादरवून टाकले. या हत्याकांडाला आज एक वर्ष पूर्ण झाले. संतोष देशमुख हत्या प्रकरण न्यायालयीन प्रक्रियेत आहे. १२ डिसेंबरला या प्रकरणाची पुढील सुनावणी होणार आहे. सरपंच देशमुख यांचे कुटुंब आणि मस्साजोग ग्रामस्थांची आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी आणि संतोष देशमुख यांना न्याय मिळावा ही मागणी आहे. तपास यंत्रणा, या हत्येचे राजकीय लागेबांधे या सर्व घडामोडीचा यावर प्रभाव आहे. मुख्य आरोपीपैकी कृष्णा आंधळे वर्षभरानंतरही फरार आहे. या प्रकरणामुळे बीड जिल्ह्यातील गुंडगिरी आणि दडपशाहीचे वास्तव जगासमोर आले. या धक्कादायक प्रकारामुळे बीड जिल्हा बिहार झाला आहे का? अशी चर्चा रंगली.**

केदारला अटक झाली. त्यानंतर संतोष देशमुखांवर अंत्यसंस्कार झाले. देशमुख कुटुंब, मनोज जरांगे आणि ग्रामस्थांच्या मागणीमुळे हत्या प्रकरण सीआयडीकडे चौकशीस सोपवले. यादरम्यान शरदचंद्र पवार पक्षाचे आ. संदीप क्षीरसागर आणि अजित पवार पक्षाचे आ. प्रकाश सोळंके या दोघांनी देशमुख कुटुंबियांची भेट घेतली. यावेळी क्षीरसागर यांनी वाल्मिक कराडवर आरोप केले. त्यानंतर वाल्मिक कराड, अजित पवाराच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा केज तालुका अध्यक्ष विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यावर केज पोलीस ठाण्यात खंडणीचा गुन्हा दाखल झाला. चार आरोपींना अटक झाली. मात्र



सुदर्शन घुले, कृष्णा आंधळे आणि सुधीर सांगळे फरार होते. भाजपा आ. सुरेश धस यांनी या प्रकरणात आका असल्याचा उल्लेख केल्यानंतर धनंजय मुंडे यांचे नाव या प्रकरणात चर्चेत आले. सरकारच्या नागपुरातील हिवाळी अधिवेशनात या प्रकरणाबाबत बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आ. सुरेश धस, संदीप क्षीरसागर, विजयसिंह पंडित, प्रकाश सोळंके, जितेंद्र आव्हाड आणि नमिता मुंदडा यांनी न्यायाची मागणी केली.

धनंजय देशमुख यांनी सांगितले की, केज पोलीस ठाण्यात गेल्यानंतर तेथील पोलीस अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने न घेता तीन तास टाईमपास केला. पोलिसांनी लवकर तक्रार दाखल करून कारवाई सुरू केली असती तर कदाचित संतोष देशमुख यांचा जीव वाचला असता. या घटनेनंतर राज्यात राजकीय वातावरण तापले. ग्रामस्थांनी राज्यभर भव्य मोर्चा काढला. यामध्ये देशमुख कुटुंबासह सर्वपक्षीय नेते, अनेक सामाजिक संघटना सहभागी झाले होते. यावेळी सरकारवर प्रचंड दबाव निर्माण झाला.

१३ डिसेंबरला बीड जिल्ह्यात बंद पुकारला गेला. त्यानंतर सीआयडीचे महासंचालक प्रशांत बुर्डे बीडमध्ये या प्रकरणाच्या चौकशीसाठी दोन दिवस थांबले. १४ डिसेंबरला केज पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले. आरोपी विष्णू चाटेची अजित पवार राष्ट्रवादीतून हकालपट्टी झाली. १८ डिसेंबरला फरार आरोपी विष्णू चाटेला अटक झाली.

तर १९ डिसेंबरला संतोष देशमुखांच्या शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अमानुष मारहाण हे मृत्यूचे कारण स्पष्ट झाले. २० डिसेंबरला बीडचे पोलीस अधिकारी अविनाश बारगळ यांची बदली आणि इतर पोलीस अधिकाऱ्यांवरील कारवाईबाबत मुख्यमंत्र्यांनी सभागृहात माहिती दिली. बीडचे पोलीस निरीक्षक म्हणून नवनीत कॉवत यांची नियुक्ती केली. २१ डिसेंबरला त्यांनी पदभार स्विकारला. फरार आरोपींना ताब्यात घेण्यासाठी विशेष तपास पथकांची नियुक्ती केली.

२४ डिसेंबरला आवादा पवनचक्की खंडणी आणि मारहाण प्रकरणाचा तपास सीआयडीकडे वर्ग करण्यात आला. २८ डिसेंबरला वाल्मिक कराडवर गुन्हा नोंदवून अटक व्हावी या मागणीसाठी सर्वपक्षीय आमदार, खासदारांच्या नेतृत्वात बीडमध्ये मोर्चा झाला. त्यानंतर धनंजय मुंडेंच्या राजीनामा मागणीला जोर वाढला. ३० डिसेंबरला याच कारणासाठी सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन केले.

यादरम्यान २२ दिवस बेपत्ता असलेला वाल्मिक कराडने फेसबुकवर स्वतः निर्दोष असल्याचा व्हिडिओ पोस्ट केला. त्यानंतर वातावरण आणखी तापले. त्यानंतर अत्यंत संशयास्पद आणि नाट्यमय पद्धतीने ३१ डिसेंबरला कराडने पुण्यातील सीआयडी कार्यालयात स्वतःहून शरणागती पत्करली. त्याच दिवशी केज न्यायालयाने त्याला १४ दिवसांसाठी कोठडी दिली. ४ जानेवारीला या प्रकरणातील आरोपी सुदर्शन घुले, सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटक होते. १४ जानेवारीला खंडणीप्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडवर मकोका लावून त्याला १४ दिवसांसाठी न्यायालयीन कोठडी होते. यादरम्यान वाल्मिक कराडच्या समर्थकांनी निदर्शने केली. फेब्रुवारी २०२५ मध्ये धनंजय देशमुख यांच्या मागणीनुसार या प्रकरणात ज्येष्ठ वकील उज्ज्वल निकम आणि सहायक वकील म्हणून बाळासाहेब कोल्हे यांची नियुक्ती राज्य शासनाने केली.

याप्रकरणी सीआयडीने दाखल केलेल्या १४०० पानांच्या चार्जशीटमध्ये १५ भयानक व्हिडिओ, ८ फोटो, लोकेशन डेटा, फोन कॉल रेकॉर्ड, रक्ताचे नमुने, शस्त्रे, फॉरेन्सिक अहवाल, आरोपींचे मोबाईल फोन यांसारखे पुरावे सादर केले. ३ मार्च रोजी या हत्याकांडाचे फोटो, व्हिडिओ जगासमोर आले. या व्हिडिओमध्ये संतोष देशमुख बचावासाठी प्रयत्न करत आहेत, विनवणी करताना दिसतात. मात्र आरोपी त्यांना अपमानजनक वागणूक देऊन मारहाण करत त्याचे चित्रीकरण केल्याचे दिसते. ४ मार्चला धनंजय मुंडे यांनी अन्न व नागरी पुरवठा मंत्रिपदाचा प्रकृतीच्या कारणास्तव राजीनामा दिला.

धनंजय देशमुख यांनी सांगितले की, आरोपींना फाशीची शिक्षा होत नाही तोपर्यंत हा लढा थांबणार नाही. पुढील सुनावणीनंतर ग्रामस्थांसह मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेऊन अटक आरोपींना फाशीची शिक्षा करण्याची मागणी करणार आहोत. या मागणीवर आम्ही ठाम आहोत. तर वैभवी देशमुखने सांगितले की, वडिलांच्या हत्येला १ वर्ष झाले. आजही आम्ही न्यायाच्या अपेक्षेत आहोत. आरोपी आहेत, सर्व पुरावे आहेत तरीही या खटल्यात उशिर का होत आहे? हे समजत नाही. आमची सरकारला विनंती आहे की, लवकरात लवकर न्याय मिळवून द्यावा. समाजाने दिलेली साथ यामुळेच हा लढा उभा राहिला. आठवणींना कोणताही दिवस नसतो. मी वडिलांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न नक्की पूर्ण करीन. पण ते माझ्यासोबत नसतील याचे वाईट वाटते.



# मुंबई ठाण्यासह पालिकेत एकत्र
## शिंदे-फडणवीसांची मध्यरात्री चर्चा

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** आगामी महापालिका निवडणुकांवर महायुतीने मध्यरात्री निर्णायक पाऊल उचलले असून, भाजपा आणि शिंदे गटाने राज्यातील सर्व महापालिका निवडणुका एकत्रितपणे लढवण्याचा अंतिम निर्णय घेतल्याची माहिती आहे. याबाबत काल मध्यरात्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची जवळपास दीड तास दाराआड चर्चा झाली.

काही महापालिकांमध्ये स्वतंत्र लढण्याची चर्चा सुरू असतानाच रात्री उशिरा झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत एकत्र लढण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे. विशेष म्हणजे मुंबई आणि ठाणे या राजकीयदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या महापालिकांमध्येही महायुतीचेच उमेदवार उतरणार हे निश्चित झाले आहे. या दोन्ही पालिकांवर सत्तास्थापन होणे हे आगामी राजकीय समीकरणांसाठी निर्णायक मानले जात असल्यामुळे या निर्णयाचे महत्त्व अधिक वाढले आहे. या चर्चेत निवडणुकीतील संवेदनशील प्रश्न, स्थानिक पातळीवरील समीकरणे, जागावाटपाची प्राथमिक चौकट आणि एकत्रित प्रचार मोहिमेची तयारी यावर सविस्तर मंथन झाल्याचे समजते.

या बैठकीला भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीही उपस्थिती होती. राज्यभर भाजपाचे संघटन मजबूत करताना शिंदे गटासोबत समन्वय साधण्याची जबाबदारी या दोन्ही नेत्यांवर असल्यामुळे आगामी काळात या दोघांची भूमिका निर्णायक राहणार आहे. बैठकीत घेतलेला आणखी एक महत्त्वपूर्ण निर्णय म्हणजे महायुतीतील दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी एकमेकांच्या पक्षात प्रवेश करू नये.दरम्यान, पुढील दोन ते तीन दिवसांत पालिका जागावाटपावर प्राथमिक प्रक्रिया सुरू होईल.

# पालिकेची अंतिम प्रारूप मतदार यादी पुन्हा ५ दिवस उशिराने

■ मुंबई

**आगामी** महापालिका निवडणुकीसाठी प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार याद्यांमध्ये ११ लाख दुबार मतदार आणि अनेक चुका आहेत. कमी वेळेत त्याची पडताळणी, दुरूस्ती करणे पालिका कर्मचाऱ्यांना डोईजड झाले आहे. त्यामुळे अखेर निर्धारित १० डिसेंबर तारखेला पुन्हा मुदतवाढ घेत अंतिम प्रारूप मतदार यादी महापालिका ५ दिवस उशिराने प्रसिद्ध करणार आहे. सुधारित तारखेनुसार येत्या १५ डिसेंबर रोजी ती प्रसिद्ध करू, अशी माहिती महापालिकेने दिली.

एकीकडे पालिका निवडणूक डिसेंबर महिन्यात जाहीर करण्याच्या हालचाली निवडणूक आयोगाकडून सुरू आहेत. त्यासाठी प्रलंबित कामे मार्गी लावण्याचा सपाटा आयोगाने लावला आहे. अशात अंतिम प्रारूप मतदार यादीसाठी आणखी कालावधीची मागणी महापालिकेने केली आहे. राज्यातील २९ पालिकांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम आयोगाने जाहीर केला आहे. मात्र पालिकेकडून दोन वेळा मुदतवाढ मागणी केल्यामुळे हे वेळापत्रक पूर्णपणे विस्कटले आहे.

# पान मसाल्यावर अधिभार
## विधेयकाला संसदेत मंजुरी

■ नवी दिल्ली

**देशातील** पानमसाला उत्पादन करणाऱ्या कंपन्यांवर अधिभार लावण्यासाठीचे विधेयक संसदेत मंजूर झाले. यातून मिळणारा निधी राष्ट्रीय सुरक्षेसाठी आणि नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी वापरला जाणार आहे. अशा हानीकारक वस्तूंचा वापर कमी करायचा सरकारचा मानस असून, आरोग्य हा राज्य सूचीतला विषय असल्याने या अधिभाराची रक्कम राज्यांनाही दिली जाईल, अशी माहिती केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान दिली. ४० टक्के जीएसटीच्या व्यतिरिक्त हा अधिभार लागू होईल. त्यामुळे जीएसटी महसुलावर त्याचा काहीही परिणाम होणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. चर्चेनंतर राज्यसभेने हे विधेयक लोकसभेत परत पाठवले.

# बिल्डर बाथरूममध्ये लपला
## वसंत मोरेंची ऑफिसवर धाड

■ पुणे

**पुण्यातील** नवले ब्रिज परिसरातील वृंदावन रिॲलिटी कंपनीवर फसवणूक झालेल्या गुंतवणूकदारांसह उबाठाचे वसंत मोरे यांनी धाड टाकली. यावेळी त्यांनी बाथरूममध्ये लपलेल्या बिल्डरला बाहेर काढले. पोलिसांना बोलावून त्यांच्यासमोर संपूर्ण गोंधळाचा व्हिडिओही चित्रीत केला.

पोलिसांनी अभिषेक सासवडे व नवनाथ वाघमारे यांच्यासह ४ जणांना ताब्यात घेतले. वसंत मोरे यांनी पोलिसांना सांगितले की, अभिषेक सासवडे यांनी नवले ब्रिज परिसरात ऑफिस उघडले होते. त्यांनी गुगलला फ्लॅट बुकिंगची जाहिरात केली होती. माझ्याकडे तक्रार घेऊन आलेल्या १५ लोकांकडून त्यांनी ६७ लाख रुपये घेतले आहेत.

# २२८ कोटी रुपयांचा बँक घोटाळा
## अनिल अंबानींच्या मुलाविरुद्ध गुन्हा

■ नवी दिल्ली



**युनियन** बँक ऑफ इंडियामध्ये झालेल्या २२८ कोटी रुपयांच्या कथित फसवणुकीच्या प्रकरणात उद्योगपती अनिल अंबानी यांचे पुत्र जय अनमोल अंबानी आणि रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड यांच्याविरुद्ध सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे.

रिलायन्स होम फायनान्स लिमिटेडचे जय अनमोल अनिल अंबानी आणि रवींद्र शरद सुधाकर, संचालक आहेत. त्यांच्याविरुद्ध बँकेने (पूर्वीची आंध्र बँक) दिलेल्या तक्रारीवरून सीबीआयने कारवाई केली. तक्रारीत म्हटले आहे की, कंपनीने व्यवसायासाठी बँकेच्या मुंबईतील एससीएफ शाखेतून ४५० कोटी रुपयांची क्रेडिट मर्यादा घेतली होती. कंपनीने बँकेला हप्ते भरले नाहीत. १ एप्रिल २०१६ ते ३० जून २०१९ या कालावधीत खात्यांची फॉरेन्सिक तपासणी करण्यात आली. त्यामध्ये असे दिसून आले की, कर्ज घेतलेल्या निधीचे चुकीचे वाटप करण्यात आले होते. कर्जदार कंपनीचे माजी प्रवर्तक या नात्याने आरोपींनी खात्यांमध्ये फेरफार करून निधीचा गैरवापर केला.

# मोदी सरकार निवडणूक आयोगाचा वापर करते

**राहुल गांधींची टीका**

■ नवी दिल्ली

**निवडणूक** सुधारणांवरील चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी भाजपावर घणाघाती टीका केली. मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार भारताच्या लोकशाहीचे नुकसान करण्यासाठी निवडणूक आयोगाचा वापर करत आहे आणि संघ सर्व संस्थांवर कब्जा करू इच्छित आहे, असा आरोप त्यांनी केला.

काँग्रेस नेते राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक आयोगाने सत्ताधारी पक्षाचे साधन म्हणून नव्हे तर निवडणुकांचे संवैधानिक रक्षक म्हणून काम केले पाहिजे. मतदार यादीमधील अनियमितता आणि अलिकडे घडलेल्या घडामोडी चिंताजनक आहेत. राहुल गांधींनी सरकारला तीन प्रश्न विचारले आहेत. निवडणूक आयोगाची स्वायत्तता का कमकुवत केली जात आहे आणि तिची स्वतंत्रता पुन्हा प्रस्थापित होणार का? अनेक राज्यांमधून येणाऱ्या तक्रारींमुळे मतदार यादीमध्ये फेरफार रोखण्यासाठी कोणते सुरक्षा उपाय आहेत? आणि निवडणूक आयोगाच्या नियुक्त्या आणि निर्णय राजकीय हितसंबंधांशी अधिकाधिक जुळणारे का दिसतात आणि सरकार पारदर्शक सुधारणांसाठी वचनबद्ध आहे का?

# भटक्या कुत्र्यांवरून विधानसभेत गोंधळ

■ नागपूर

**विधानसभेत** आज भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या उपद्रवावर गंभीर चर्चा झाली. अनेक आमदारांनी नागरिकांना भेडसावत असलेल्या या समस्येबाबत तीव्र नाराजी व्यक्त करत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली. या चर्चेदरम्यान अतुल भातखळकर, महेश लांडगे, सुनील प्रभू, विजय वडेट्टीवार व नाना पटोले यांनी लक्षवेधीद्वारे सभागृहाचे लक्ष या समस्येकडे वेधले. भटक्या कुत्र्यांमुळे नागरिक त्रस्त झाले असून, लहान मुलांवर व विद्यार्थ्यांवर हल्ल्यांच्या घटना वाढल्याचे त्यांनी सांगितले. यावर राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी उत्तर दिले. मात्र त्यांनी दिलेल्या उत्तराने सदस्यांचे समाधान झाले नाही. अखेर मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हस्तक्षेप करत या समस्येवर मंत्रालयात बैठक घेऊन उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

# डॉ. बाबा आढाव यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

■ पुणे

**ज्येष्ठ** समाजवादी नेते डॉ. बाबा आढाव यांच्यावर आज पुण्यात शासकीय इतमामात अंतिम संस्कार करण्यात आले. काल वयाच्या ९५ व्या वर्षी त्यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. गेल्या अनेक दिवसांपासून पूना हॉस्पिटलमध्ये त्यांच्यावर उपचार सुरू होते.

राज्य सरकारने त्यांचे अंत्यसंस्कार शासकीय इतमामात करण्याचा निर्णय घेतल्यानंतर जिल्हाधिकारी आणि पोलीस विभागाने विशेष बंदोबस्त तैनात केला होता. आज त्यांचे पार्थिव हमाल भवन येथे अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी हजारो कामगार, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्या अंत्यदर्शनासाठी उपस्थित होते. त्यांना शासकीय मानवंदना दिल्यानंतर पार्थिव वैकुंठ स्मशानभूमीकडे रवाना झाले.

# नवी मुंबई मेट्रो-८ ला मंजुरी

■ नवी मुंबई

**दोन विमानतळांना जोडणार**

**राज्य** सरकारने छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानळ हे नवी मुंबई विमानतळाशी जोडण्यासाठी सिडकोच्या मदतीने मेट्रो-८ बांधण्याचा निर्णय घेतला आहे. ही




लाईन पहिल्यांदा नवी मुंबईच्या विविध भागांना जोडणार आहे. त्यामुळे शहरांतर्गत मेट्रोने सहज प्रवास करता येईल. या मेट्रो लाईनमध्ये ११ स्थानके असतील. राज्य सरकारकडून मंजुरी मिळाल्यानंतर मेट्रो लाईन-८ चा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला आहे. या अहवालामध्ये या मेट्रोचा मार्ग आणि स्थानकांची माहिती देण्यात आली आहे. मानखुर्दहून वाशी खाडी पूल ओलांडल्यानंतर ही मेट्रो सायन-पनवेल महामार्गाशी जोडली जाईल. तसेच हा मार्ग नेरूळ, सीवूड, उलवे यांसारख्या भागातूनदेखील जाणार आहे. त्यानंतर ही मेट्रो नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचेल. मेट्रो-८ आता एमएमआरडीएच्या ३३७ किमी मेट्रो नेटवर्कमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे.